इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष - ४० ▸ अंक -४ ▸ रविवार,ता.५ मे २०२४ ▸ पाने १२+४=१६ इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

### कार कोसळून पाच ठार

डेहराडून,ता.४–

उत्तराखंडच्या डेहराडूनमध्ये एक मोठा रस्ता अपघात झाला आहे. मसुरी-डेहराडून मार्गावरील झारीपाणीजवळ एका कारचे नियंत्रण सुटल्याने ते डोंगरावरून खालशी कोसळले. या कारमध्ये ४ मुले आणि २ मुली असे एकूण ६ जण प्रवास करत होते, त्यापैकी ५ जणांचा मृत्यू झाला तर १ मुलगी गंभीर जखमी झाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चुनाखाल-झारीपाणी रस्त्यावरील कमल कॉटेजजवळ शनिवारी पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास फोर्ड एंडेव्हर गाडीचे नियंत्रण सुटले आणि ते डोंगरावरून खाली रस्त्यावर पडले.

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव




www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००

# शिरोळकरांनी मताच्या रूपाने दान द्यावे

## जयसिंगपूर येथील सभेत मुख्यमंत्री शिंदे यांचे आवाहन

जयसिंगपूर,ता.४(प्रतिनिधी)–

महायुतीचे सरकार दोन्ही हाताने देणारे आहे. मात्र यापूर्वीचे सरकार देणारे नव्हते तर घेणारे होते. घरात बसून फेसबुकद्वारे सरकार चालत नाही. तर सर्वसामान्य जनतेत मिसळून काम करणारे सरकार असावे लागते. आमचे सरकार सर्वसामान्य जनतेत मिसळून काम करीत आहे. त्यामुळे राज्याचा विकास मोठ्या प्रमाणात होत आहे. या सरकारने शिरोळ तालुक्याला विकासासाठी मोठा निधी दिला आहे. येत्या काळात आपल्या विकास करायचा असेल तर तुम्ही आम्हाला मताच्या रूपाने दान द्या, आम्ही शिरोळ तालुक्यातील विकास कामासाठी निधी कमी पडून देणार नाही, असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.


जयसिंगपूर महायुतीचे उमेदवार खासदार धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शेजारी व्यासपीठावर इतर मान्यवर.

**पेरूचा हार घालून मुख्यमंत्र्यांचा सत्कार**

शिरोळ तालुक्यातील पेरू उत्पादनात अग्रेसर असणाऱ्या उमळवाड गावातील शेतकऱ्यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा पेरूने बनवलेला हार घालून सत्कार केला.

येथील विक्रम सिंह क्रीडांगणावरती महायुतीचे उमेदवार खासदार धैर्यशील माने यांच्या प्रचारासाठी शनिवारी सायंकाळी झालेल्या सभेत (पान २ वर)

# कांद्यावरील निर्यातबंदी हटवली

## निर्यातीवर ४० टक्के शुल्क



नवी दिल्ली,ता.४–

केंद्र सरकारने शुक्रवारी ३ मे रोजी कांदा निर्यातीवरील बंदी मागे घेतली. परंतू,कांदा निर्यातीवर ४० टक्के शुल्क लावले आहे. तसेच ३१ मार्च २०२५ पर्यंत देशी हरभऱ्याला आयातीवरील शुल्कात सुट देण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील नाशिक आणि अहमदनगर या दोन जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कांद्याचे उत्पादन होते. त्यामुळे केंद्र सरकारच्या या निर्णयावर दोन्ही जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये चर्चा सुरू आहे. यासंदर्भात दिंडोरीतील भाजपच्या उमेदवार डॉ. भारती पवार यांनी सांगितले की, विरोधकांना कांदा निर्यातबंदीचा निर्णय मागे घेतला, हे मान्य होत नाही.कांद्याला चांगला दर मिळेल, शेतकऱ्यांच्या खिशात पैसे जातील, हा निर्णय केंद्र सरकार (पान २ वर)

**देशी हरभऱ्याला आयात शुल्कातून सूट**

सरकारने ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत देशी हरभऱ्याला आयात शुल्कातून सूट दिली आहे.त्याचप्रमाणे,पिवळ्या वाटाण्यांवरील आयात शुल्काची सूट ३१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे सर्व बदल ४ मे पासून म्हणजेच आजपासून लागू करण्यात आले आहे.

# इ'करंजीत आज तिनही उमेदवारांकडून पदयात्रा

## मुख्यमंत्री शिंदेंसह मातब्बर नेत्यांचा सहभाग

इचलकरंजी,ता.४–

येत्या मंगळवार ७ मे रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणूकीची सांगता रविवारी (५ मे) रोजी सायंकाळी ६ वाजता होत आहे. प्रचार सांगताच्या निमित्ताने तिन्ही प्रमुख उमेदवारांनी इचलकरंजी शहरात शक्ती प्रदर्शनाची जोरदार तयारी केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अनेक प्रमुख नेते रविवारी इचलकरंजीत असल्याने शहरातील राजकीय वातावरण ढवळून निघणार आहे.

हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील सर्वात मोठे शहर असलेल्या इचलकरंजीकडे सर्वच उमेदवारांनी आपले लक्ष केंद्रीत केले आहे. जास्तीत जास्त मते घेण्यासाठी सुरुवातीपासूनच यंत्रणा कार्यान्वित होती. राष्ट्रीय नेत्यांबरोबरच राज्य पातळीवरील नेत्यांनीदेखील इचलकरंजीत प्रचाराचे रान उठवले होते. आता रविवारी प्रचार समाप्तीच्या निमित्ताने धैर्यशील माने, सत्यजित पाटील-सरुडकर आणि राजू शेट्टी या तिन्ही उमेदवारांनी जोरदार शक्तीप्रदर्शनाची तयारी केली आहे.

हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार धैर्यशील माने यांच्या प्रचाराची सांगता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पदयात्रेने होणार आहे. या पदयात्रेत दहा हजारपेक्षा अधिक कार्यकर्ते सहभागी होतील, अशी माहिती माजी आमदार सुरेश हाळवणकर, शिवसेना जिल्हाप्रमुख रविंद्र माने व डॉ. राहुल आवाडे यांनी महायुतीच्या वतीने आयोजित पत्रकार बैठकीत दिली. हातकणंगले लोकसभा मतदा स घातील महायुतीचे उमेदवार धैर्यशील माने यांच्या प्रचार सांगताप्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे (पान २ वर)

# रेवण्णाला अटक

बेंगळुरू,ता.४–

कर्नाटकातील पेन ड्राइव्ह घोटाळ्यात अडकलेले जेडीएसचे खासदार प्रज्वल रेवन्ना यांचे वडील एचडी रेवन्ना यांना एसआयटीने ताब्यात घेतले आहे. त्याच्यावर म्हैसूरमध्ये अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यांना ताब्यात घेतल्याच्या काही मिनिटांनंतर न्यायालयाने या प्रकरणातील त्यांचा अटकपूर्व जामीन अर्जही फेटाळला.

माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचा मुलगा एचडी रेवन्ना आणि त्यांचा विश्वासू सतीश बबन्ना यांच्याविरुद्ध म्हैसूरमध्ये एका महिलेचे अपहरण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिलेच्या मुलाच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. आमदार पुत्र प्रज्वल रेवन्ना याने आपल्या आईचे लैंगिक शोषण केल्याचा आरोपही मुलाने केला आहे. याप्रकरणी बबन्ना याला यापूर्वीच अटक (पान २ वर)

# कळंबा कारागृहात ८० मोबाईल जप्त

## तुरुंग अधिकाऱ्यांची पोलिसात फिर्याद

कोल्हापूर,ता.४(प्रतिनिधी)–

क्लीन स्वीप मोहिमेंतर्गत कोल्हापुरातील कळंबा मध्यवर्ती कारागृहात तुरुंग अधिकाऱ्यांनी बावीस दिवसात सुमारे ८० मोबाइल जप्त केले होते. या कारवाईत ५८ मोबाईल बेवारस स्थितीत तुरुंग अधिकाऱ्यांना सापडले होते. याबाबत तुरुंग अधिकारी भारत उत्तरेश्वर पाटील यांनी शनिवारी जुना राजवाडा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की,कोल्हापूर (पान २ वर)

## गर्भवती युवतीच्या खून प्रकरणी

# दोघांना फाशीची शिक्षा;पाचजणांना जन्मठेप

विजापूर,ता.४ (प्रतिनिधी)–

विजापूर विशेष न्यायालयाने एका गर्भवती युवतीच्या खूनप्रकरणी दोन आरोपींना फाशीची शिक्षा आणि इतर पाच आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

दि. ३० जून २०१७ रोजी नऊ महिन्यांच्या गर्भवती युवतीला तिच्या नातेवाईकांनी पेटवून दिले होते. या प्रकरणी प्रमुख आरोपी इब्राहिमसाब महमदसाब अत्तार, अकबर महमदसाब अत्तार यांना फाशीची शिक्षा व प्रत्येकी ४९,२५० रूपयांचा दंड ठोठावला. तसेच या प्रकरणात सहभागी असलेल्या रमजानबी महमदसाब अत्तार, दावलबी उर्फ सलमा बंदेनवाज जमादार, जमा जिलानी दखनी, जिलानी अब्दुलखदर दखनी आणि दावलसाब सुभान दन्नुर यांना जन्मठेप आणि प्रत्येकी पंधरा हजार रूपयांचा (पान २ वर)


धैर्यशिल माने यांच्या प्रचारार्थ आयोजित हुपरीतील सभेप्रसंगी उपस्थित जनसुमदायाला हात उंचावून अभिवादन करताना ना.नितीन गडकरी, धैर्यशील माने, आम. प्रकाश आवाडे, सुरेशराव हाळवणकर, मुरलीधर जाधव, डॉ. राहूल आवाडे व इतर मान्यवर. (छाया-अनंतसिंग)

# तेरा गावातून मानेंना मताधिक्य देणार-आवाडे

## देशाच्या भवितव्यासाठी मानेंना निवडून द्या-ना.गडकरी

हुपरी,ता.४ (प्रतिनिधी)–

ही निवडणूक उमेदवारांचे नाही तर देशाचे भवितव्य निर्माण करणारी आहे. जनतेच्या भवितव्याचा आणि भविष्याचा निर्णय करणारी आहे. तेव्हा धैर्यशील मानेना निवडून द्या. हुपरी शहरासाठी चांदीच्या वस्तूंचे डिझाईन सेंटर उभा करु, असे मत केंद्रिय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी मत व्यक्त केले

ते हुतात्मा स्मारकाच्या भव्य मैदानात महायुतीचे उमेदवार धैर्यर्शील माने यांच्या प्रचारार्थ आयोजित प्रचार सभेत बोलत होते अध्यक्षस्थानी माजी आमदार प्रदेशाध्यक्ष सुरेश हाळवणकर होते.

ना. गडकरी म्हणाले पाण्यामुळे शेतकऱ्यांचा विकास होतो प्रधानमंत्री सिंचन योजना व बळीराजा योजना राबविण्यात आली टेंभू म्हैसाळ योजना मार्गी लागली. सांगली, सातारा व कोल्हापूर बहुतांश दुष्काळी भागातील ६ लाख हेक्टर शेती पाण्याखाली आली ४७ सालापासून सिंचनावर भर दिला असता तर जनतेला गावे सोडायची पाळी आली नसती. शाळा, शिक्षण, आरोग्य सुविधा उपलब्ध नव्हत्या. आता आपल्याला प्रत्येक जिल्ह्यात उपलब्ध झालेल्या दिसून येतील. कृषी क्षेत्रात अमुलाग्र बदल होतोय. हे मोदींच्या नेतृत्वाखाली घडत आहे.आमदार प्रकाश आवाडे म्हणाले, ३७० कलम हटविण्यात आले त्यावेळी मी काँग्रेसचा जिल्हाध्यक्ष होतो राजीनामा देऊन मी या महत्त्वपूर्ण भूमिकेचे समर्थन केले त्यावेळी पक्षात केवढा गोंधळ उडाला होता. जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी मोदी सरकारने महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. एक नवीन विकसित भारत गतिमान करण्यासाठी महायुतीचा उमेदवार निवडून देण्याची गरज आहे याकरिता तेरा गावातून साठ टक्के मतदान धैर्यशील माने यांच्या पारड्यात टाकण्याचा संकल्प जाहीर केला. (पान २ वर)



# मोदींना पंतप्रधान करण्यासाठी मानेंना निवडून द्या-ना.मुश्रीफ

■ कबनूर,ता.३-

**देशाच्या उज्वल भविष्यासाठी नरेंद्र मोदींना पुन्हा पंतप्रधान करणे काळाची गरज आहे. मोदींचे हात बळकट करण्यासाठी धैर्यशील माने यांना मतदान करणे अत्यावश्यक आहे. असे प्रतिपादन पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी केले.**

हातकणंगले लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ सभेत श्री मुश्रीफ बोलत होते. श्री.मुश्रीफ म्हणाले,मतदारसंघाचा सर्वांगीण विकास साधण्याची धमक धैर्यशील माने यांची आहे.त्यामुळे धनुष्यबाणला मताधिक्य द्या.

वस्त्रोद्योग महामंडळाचे अध्यक्ष अशोकराव स्वामी म्हणाले,धैर्यशील माने यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मदतीने मतदारसंघात प्रचंड निधी आणला. त्यामुळे श्री. माने यांना मताधिक्य देणे कर्तव्यच आहे.


कबनूर- महायुतीचे उमेदवार धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलताना हसन मुश्रीफ सोबत अशोक स्वामी, विठ्ठल चोपडे आदी.

राहुल कांबळे यांनी स्वागत केले.युवराज पाटील यांनी प्रास्ताविक केले.अशोक स्वामी, विजया पाटील, मधुकर मणेरे, रेश्मा सनदी, प्रमोद पाटील, अशोक पाटील यांची भाषणे झाली. यावेळी जेष्ठ नेते बी.डी.पाटील, सरपंच शोभा पोवार, विठ्ठल चोपडे, विनायक यादव, यासीन मुजावर, तोफिफ मुजावर,बबन इंगळे, रजनी गुरव, सुधाराणी पाटील, रोहिणी स्वामी आदि उपस्थित होते. माजी सरपंच सुधीर पाटील यांनी आभार मानले.

# तेरा गावातून मानेंना मताधिक्य देणार-आवाडे

(पान १ वरून)

धैर्यशील माने म्हणाले, राष्ट्रीय पातळीवर भारताचा दबदबा निर्माण झाला आहे. जगातील पाचवी अर्थव्यवस्था निर्माण करणाऱ्या मोदींच्या नेतृत्वाची देशाला गरज आहे. शिरोली अंकली ८०० कोटींचे रस्ते बांधणीचे काम सुरू झाले आहे. याशिवाय अनेक विकास कामे झाली आहेत. मतदार संघाच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प घेऊनच शिवधनुष्य हाती घेतला असल्याने मला प्रचंड मतांनी निवडून द्यावे असे आवाहन केले.

यावेळी सुरेशराव हाळवणकर, आमदार विनयराव कोरे, रजनीताई मगदूम, भाजपचे नेते हिंदूराव शेळके, वस्त्रोद्योग महामंडळाचे माजी अध्यक्ष पुंडलिक जाधव, भाजपचे नेते उद्योगपती महावीर गाट, पिपल्स रिपब्लिकन पार्टीचे जयदीप जोगेंद्र कवाडे, आरपीआयचे मंगलराव माळगे, जिल्हा सरचिटणीस डॉ.सचिन मेथे, युवा नेते अमित गाट, शिवसेनेचे अजित सुतार, शहराध्यक्ष सुभाष कागले यांसह बहुतांश मान्यवरांनी आपल्या भाषणात महायुतीचे उमेदवार प्रचंड मतांनी निवडून देण्याचा निर्धार केला.

**पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखाने चालवणे म्हणजे हुशार (मेरिट) विद्यार्थ्यांची शाळा आहे. आणि विदर्भातील कारखाने चालवणे म्हणजे नापासांची शाळा आहे असे सांगत पाण्यामुळे काय होऊ शकते याचा लेखाजोखा मांडला व साखर कारखान्यांमध्ये परिसरातील अर्थव्यवस्था बदलण्याचे सामर्थ्य आहे, अशी विशेषणे नमूद करीत मुबलक पाण्याच्या योग्य वापर करण्यावर भाष्य केले. ३७० कलम हटविण्यात आले. त्यावेळी मी काँग्रेसचा जिल्हाध्यक्ष होतो. पक्षात गोंधळ उडाला आणि मी राजीनामा दिला, असे मत आवाडे यांनी व्यक्त केला.**

मनसेचे नेते दौलतराव पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख रविंद्र माने, डॉ.राहुल आवाडे, जवाहर संचालक सूरज बेडगे, अरुणे इंगवले, मच्छिंद्र संकटे, सुरेशदादा पाटील, प्रसाद खोबरे, दिनकरराव ससे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दलितमित्र अशोकराव माने (बापू) यांनी स्वागत केले प्रथम नगराध्यक्षा सौ जयश्री गाट यांनी प्रास्ताविक तर शिवसेनेचे नेते मुरलीधर जाधव यांनी आभार मानले.

✻ ठाणे,ता.४-

**कल्याण गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मोठी कारवाई करीत एका किराणा दुकानातून तब्बल साडे चार कोटी रुपयांचे एमडी ड्रग्ज जप्त केले आहे. या घटनेने अवैध धंदेवाल्यांमध्ये खळबळ उडाली आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.**

# महाराज खासदारपदाला न्याय देऊ शकतील का?

## शौमिका महाडीक यांचा सवाल

■ भोगावती,ता.४(प्रतिनिधी)-

**काँग्रेसचे कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार शाहू महाराज छत्रपती यांचे आज वय ७६-७७ वर्ष असावे. या वयात ते कुणाच्यातरी राजकीय स्वार्थासाठी लोकसभेच्या आखाड्यात उतरले आहेत. महाराजांचे व्यक्तिमत्व, त्यांचा अभ्यास त्यांचे वक्तृत्व पाहता त्यांना खासदारपदाची जबाबदारी पेलणार का? ते खासदार पदाला न्याय देणार का? जनतेच्या अपेक्षांना उतरणार का? असा सवाल जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शौमिका महाडिक यांनी उपस्थित केला आहे.**


महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक यांच्या प्रचारार्थ निगवे येथे आयोजित प्रचार सभेत बोलताना सौ. शौमिका महाडिक.

महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक यांच्या प्रचारात कोल्हापूर दक्षिण मतदार संघातील निगवे येथील प्रचार सभेत त्या बोलत होत्या. सौ. महाडीक म्हणाल्या लोकसभेची ही निवडणूक राजा विरुद्ध सर्व सामान्य अभ्यासू उमेदवार अशी आहे. आपण तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आला आहात. आजवरचे आपले सगळे आयुष्य ऐशोआरामात गेले आहे.आपण राजवाड्यात राहता. ३०० कोटीच्या मालमत्तेचे मालक आहात. पण सर्वसामान्यांच्या जगण्याशी आपला कधीच संबंध आलेला नाही.

सार्वजनिक व्यासपीठावरील त्यांचा वावर एक राजा म्हणूनच राहिला आहे. तेथेही एखाद्या विषयावर ते सुसंगतपणे बोलतात, असे कधी दिसलेले नाही. जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी अभ्यास असावा लागतो. वक्तृत्व लागते. हे आपण जाणताच. केवळ जिल्ह्यातील नव्हेच तर देशपातळीवर आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील समस्यांचाही खासदाराला अभ्यास असावा लागतो. खासदाराला म्हणून नव्हे तर लोकप्रतिनिधी म्हणून जनतेत वावरावे लागते.

कोल्हापूरच्या जनतेच्या नव्या खासदाराकडून खूप अपेक्षा आहेत. त्या पूर्ण करण्यास तुम्ही सक्षम आहात का?

**रात्री-अपरात्री जनतेला कसे उपलब्ध होणार ?**

खासदार हा २४ तास जनतेला उपलब्ध असावा लागतो. आजवरचा आपला सार्वजनिक जीवनातील वावर पाहता, हे शक्य होईल असे वाटत नाही. विजयानंतर वाड्याचा दरवाजा २४ तास उघडा ठेवावा लागेल. आपली परंपरा आहे की सूर्यास्ताला वाड्याचा दरवाजा बंद होतो आणि सूर्योदयानंतर उघडला जातो. आपण ऐनवेळी रात्री जनतेला कसे उपलब्ध होणार हा रास्त प्रश्न आहे.

याचा आपण स्वतःच विचार करा .आपल्या आजवरच्या वाटचालीविषयी आपल्या अंतःकरणात डोकावून पहा. आज आपली होणारी ससेहोलपट आमच्यासारख्या आपल्या हितचिंतकांना क्लेशदायक आहे.

## कापसाचे दर पुन्हा घसरले

**✻ अमरावती,ता.४- खुल्या बाजारात कापसाचे दर वेगाने घसरण्यास सुरुवात झाली आहे. गत आठ दिवसात कापसाच्या दरात क्विंटलमागे ४०० रूपयाची घसरण नोंदविण्यात आली आहे. चांगल्या प्रतीचा कापूस ७०५० रूपये क्विंटल दराने विकला जात आहे. तर फरदड कापूस ५५०० रूपये क्विंटल दराने विकला जात आहे. यामुळे कापसाचे दर वाढतील या आशेवर असणाऱ्या शेतकऱ्यांना जबर आर्थिक फटका बसला आहे.**


इस्लामपूर येथील जाहीर सभेत बोलताना राजू शेट्टी.

# माझी निष्ठा केवळ जनतेशी-राजू शेट्टी

■ इस्लामपूर,ता.४(प्रतिनिधी)-

**माझी निष्ठा कुठल्या पक्षाशी नाही, तर ती जनतेशी आहे. तुमच्या पिकाला भाव देण्यासाठी मी वावरात दगड घेऊन उभा आहे. जो कोणी तुमच्याकडे वाकड्या नजरेने बघेल त्याच्या पाठीत दगड मी घालेन, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी दिला. यावेळी आमदार बच्चू कडू यांची प्रमुख उपस्थिती होती. मागील थकीत शंभर रूपये बिलासाठी यांचे कारखाने पुन्हा बंद पाडू, असा इशाराही शेट्टी यांनी दिला. ते इस्लामपूर येथील यल्लमा चौकात झालेल्या जाहीर सभेत बोलत होते. यावेळी सभेला उच्चांकी गर्दी होती.**

यावेळी बोलताना शेट्टी म्हणाले की, शेती आणि मातीसाठी झगडणारा मी चळवळीतला कार्यकर्ता आहे. ७ मे रोजी तुम्हाला मतदान केंद्रात जाऊन बटण दाबायला केवळ ५ मिनिटेच लागणार आहेत. पण या पाच मिनिटात तुमच्या आमच्या सर्वसामान्य शेतकरी व कष्टकरी लोकांचे भविष्य दडलेले आहे. यावेळी तुम्ही विचार करा, या पाच मिनिटासाठी तुम्हाला माझ्याकडून पुढील पाच वर्षासाठी अहोरात्र झटणारा हाडाचा चळवळीतला माणूस मिळणार आहे. मी संघर्ष करतोय ते तुमच्या साठी, तुम्हाला न्याय मिळावा म्हणूनच मी या प्रस्थापितांसाठी लढतोय. जयंत पाटील यांनी अगोदर मागील शंभर रूपये शेतकऱ्यांचे द्यावेत, मगच त्यांनी सत्यजीत पाटील यांच्यासाठी मते मागावीत. त्यांचा राजारामबापू साखर कारखाना मी बंद पाडला याचे पोटशूळ त्यांना आहे.

आमदार बच्चू कडू म्हणाले, राज्यात शेतकरी व कष्टकरी धोक्यात आहेत. साखर कारखानदार शेतकऱ्यांचा खाल्लेला पैसा निवडणुकीत उडवत आहेत. कोट्यवधी रूपयांचा चुराडा हे साखर कारखानदार करत आहेत. तुमच्या उसाच्या वजनात काटामारी करून तो काळा पैसा या निवडणुकीत काढला जात आहे. अशा साखर कारखानदारांना पाणी पाजा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी प्रा. जालंधर पाटील, सावकर मादनाईक, ॲड. शमशुद्दीन संदे, संदीप राजोबा, पोपट मोरे, प्रकाश बालवडकर, सुर्यभान जाधव, भागवत जाधव, संजय बेले यांच्या शेतकरी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिरोळकरांनी मताच्या रूपाने दान द्यावे-मुख्यमंत्री शिंदे

(पान १ वरून)

ते बोलत होते. यावेळी बोलताना या शिरोळ तालुक्याचे आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर हे कमी बोलतात पण ज्यादा काम करतात. त्यांनी ज्या ज्या गोष्टीला निधी मागितला, त्या-त्या गोष्टीला निधी दिला आहे. यड्रावकरांचे हात बळकट करण्यासाठी या तालुक्यातून माने यांना अधिक मते मिळाली पाहिजेत. तालुक्यात केलेल्या विकास कामाची पोहोच पावती या लोकसभा निवडणुकीत मताच्या रूपाने मिळणार आहे. तालुक्यात यापुढे महापूर येणार नाही. कारण महापुराच्या उपाय योजनेसाठी जागतिक बँकेकडून मदत घेऊन बत्तीशे कोटी रुपयांचा डीपीआर तयार करण्यात आला आहे. पंचगंगा प्रदूषण मुक्त करण्यासाठी या डीपीचे काम अंतिम टप्प्यात असून या पुढील काळामध्ये शिरोळ तालुक्याला कोणत्याही संकटाला सामोरे जावे लागणार नाही. मागील सरकारने ५० ते ६० वर्षांमध्ये जे काही काम करू शकले नाहीत ती कमी नरेंद्र मोदी ने दहा वर्षाच्या कालावधीमध्ये केली आहे. नरेंद्र मोदींना पंतप्रधान करण्यासाठी धैर्यशील माने निवडून येणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी शिरोळ तालुक्यातील जनतेने मोठ्या प्रमाणात मतदान करावे असे आवाहन यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

**विकास कामांना निधी**

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी शिरोळ तालुक्यातील विविध विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधीची मागणी केली. यामध्ये प्रामुख्याने हेरवाडे येथील मंदिरासाठी चार कोटीचा निधी, शिरोळ नगरपालिकेसाठी महसूल खात्याकडे असणारी जुनी इमारत, यासह विविध विकास कामांची यादी दिली होती, ही यादी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे वाचून यामधील प्रत्येक गोष्टीला विकास निधी देण्याचे आश्वासन यावेळी दिले.**

यावेळी झालेल्या प्रचार सभेचे स्वागत व प्रास्ताविक शिरोळ नगरपालिकेचे नगराध्यक्ष अमरसिंह पाटील यांनी केले. शिवसेनेचे प्रवक्ते राजू वाघमारे, भाजपचे जि प सदस्य विजय भोजे, खासदारकीचे उमेदवार धैर्यशील माने यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी आपल्या मनोगतामध्ये शिरोळ तालुक्यामध्ये अडीच वर्षाच्या कालावधीमध्ये सोळाशे कोटी रुपयांचा निधी आणला. एकनाथ शिंदे यांचा प्रचंड मोठा विश्वास असल्यामुळेच आपण या तालुक्यामध्ये विकास कामे मोठ्या प्रमाणात करू शकलो. शिरोळ तालुक्यातील जनता सुज्ञ आहे. जातीपातीचे राजकारणाच्या पलीकडे जाऊन विकास कामावरती मतदान करते. विरोधक जातीपातीचे राजकारण करीत आहेत. मात्र या तालुक्यातील जनतेने त्यांचा डाव ओळखला असून तो हाणून पडल्याशिवाय ही जनता स्वस्त बसणार नाही. तालुक्याचा विकास करण्यासाठी धैर्यशील माने यांना निवडून देणे आवश्यक आहे. त्यामुळे या तालुक्यातील जनतेने मोठ्या प्रमाणात मतदान करावे असे आवाहन केले.

**जयसिंगपूर शहरातील झोपडपट्टी निर्मितीकरण होणार**

**सभा संपल्यानंतर संजय पाटील-यड्रावकर यांनी जयसिंगपूर शहरातील झोपडपट्टीचा प्रश्न मांडला. हे काम अंतिम टप्प्यात असून आचारसंहिता संपल्यानंतर लगेच जयसिंगपूर शहरातील झोपडपट्टीचे नियमितीकरण करून झोपडपट्टी धारकांना प्रॉपर्टी कार्ड देण्याचे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.**

यावेळी माजी खासदार निवेदिता माने, गुरुदत्त शुगरचे माधवराव घाडगे, जयसिंगपूरचे माजी नगराध्यक्ष संजय पाटील याड्रावकर, पंचगंगेच्या माजी अध्यक्ष रजनीताई मगदूम, कुरुंदवाड चे माजी नगराध्यक्ष रामभाऊ डांगे, मनसेचे पुंडलिक जाधव, शिवसेनेचे तालुका उपाध्यक्ष सतीश मलमे, भोला कागले, सुरेश शहापुरे भाजपचे मिलिंद भिडे, राजेंद्र दाईंगडे, जयसिंगपूरचे माजी नगराध्यक्ष बाळासाहेब भांदीगरे धनाजीराव देसाई, प्राध्यापक असलम परास, संभाजी मोरे, शिवाजी कुंभार, संजय नांदणे , राजेंद्र झेले, दादा पाटील चिंचवडकर, राहुल बंडगर, महेश कलगुटकी, यांच्यासह शिरोळ तालुक्यातील कार्यकर्ते पदाधिकारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इ'करंजीत आज तिनही उमेदवारांकडून पदयात्रा

(पान १ वरून)

इचलकरंजीत येत आहे. दुपारी २ वाजता श्री शिवतीर्थ येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास अभिवादन करुन पदयात्रेचा शुभारंभ होईल. मुख्य मार्गावरून ही रॅली महात्मा गांधी पुतळा येथे आल्यानंतर त्याठिकाणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संबोधित करतील. पत्रकार बैठकीला अशोक स्वामी, सुनिल महाजन, पुंडलिकभाऊ जाधव, बाळासाहेब कलागते अहमद मुजावर, श्रीनिवास कांबळे, रवी रजपुते, प्रकाश पाटील यांच्यासह प्रमुख पदाधिकारी, नगरसेवक उपस्थित होते.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उमेदवार माजी खासदार राजू शेट्टी यांनीही जंगी पदयात्रा काढण्याचे नियोजन केले आहे. कबनूर दर्गा चौक येथून दुपारी १२ वाजता सुरु होणारी ही पदयात्रा जवाहरनगर येथील ठाकरे चौक मार्गे जुन्या बसस्थानकापासून शाहू महाराज पुतळा येथे येईल. तेथून मुख्य रस्त्यावरुन शिवतीर्थ ते गांधी पुतळा येथे आल्यानंतर ही पदयात्रा लोकशाहीर आण्णाभाऊ साठे मैदानाकडे जाईल. त्याचठिकाणी राजू शेट्टी हे उपस्थितांना मार्गदर्शन करतील. त्यांनतर सांगता होईल.

महाविकास आघाडीचे उमेदवार सत्यजित पाटील-सरुडकर यांनीही मोटरसायकल रॅलीचे नियोजन केले आहे. काही प्रमुख नेतेमंडळींसह स्वत: उमेदवार सत्यजित पाटील रॅलीत सहभागी होणार आहेत. काँग्रेस कमिटीपासून सुरु होणारी ही रॅली शिवतीर्थ, कॉ मलाबादे चौक, म. गांधी पुतळा, राजवाडा चौक, गुजरी कॉर्नर, तीनबत्ती चौक, बंडगरमाळ, शाहू पुतळा, महानगरपालिका चौक, विक्रमनगर, थोरात चौक, सीईटीपी मार्गे, सांगली नाका, कारंडे मळा येथून शहापूर चौकात आल्यानंतर रॅलीची सांगता होईल.

एकूणच सर्वच प्रमुख उमेदवारांनी रविवारी इचलकरंजी शहरात केलेल्या या जय्यत शक्ती प्रदर्शनाच्या तयारीने पोलिस प्रशासनाची धावपळ उडणार आहे.

# केंद्राने कांद्यावरील निर्यातबंदी हटवली

(पान १ वरून)

घेईल, अशी अपेक्षा विरोधकांना नव्हती. त्यामुळे त्यांचा भ्रमनिरास झाला आहे. कांदा निर्यातीवर प्रति मेट्रिक टन निर्यात शुल्क लावले गेले आहे. तसेच वेगवेगळ्या देशांसाठी वेगवेगळे शुल्क लावले आहे. पण सर्वांत महत्त्वाचे म्हणजे निर्यात खुली झाली आहे,त्याचा सर्व शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन भारती पवार यांनी केले.कांदा निर्यातीवर बंदी घातल्यामुळे शेतकऱ्यांच्या कांद्यांना योग्य दर मिळत नव्हते.अशातच केंद्र सरकारने गेल्या आठवड्यात गुजरातमधील २ हजार मेट्रीक टन पांढरा कांदा निर्यात करण्याला परवानगी दिली.त्यामुळे महाराष्ट्रातील कांद्यांचे काय ? असा सवाल विरोधी पक्षांच्या नेत्यांनी केला होता.त्यानंतर दुसऱ्या दिवशी सरकारने बांगलादेश, यूएई, भूतान, बहरीन, मॉरिशस आणि श्रीलंका या सहा शेजारी देशांना ९९,१५० मेट्रिक टन लाल कांदा निर्यात करण्यास परवानगी दिली होती.

# कळंबा कारागृहात ८० मोबाईल जप्त

(पान १ वरून)

कळंबा मध्यवर्ती कारागृहात काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी संगनमत करून कैद्यांनी त्यांची समांतर यंत्रणा कार्यान्वित केली होती. तसेच कारागृहाच्या भिंतीवरून मोबाइल आणि गांजाची पाकिटे कारागृहात फेकली जात होती.

यातून कैद्यांकडे शंभराहून जास्त मोबाइल पोहोचले होते. कारागृहाची शिस्त बिघडल्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तत्कालीन प्रभारी अधिकाऱ्यांच्या बदल्या करून सातारा जिल्हा कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे यांच्याकडे क्लीन स्वीप मोहिमेची जबाबदारी सोपवली होती. त्यानुसार शेडगे यांनी गेल्या महिनाभरात कारागृहात झडती घेऊन ८० मोबाइल जप्त केले. नूतन प्रभारी अधीक्षक विवेक झेंडे यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर एक ते चार मे दरम्यान घेतलेल्या झडतीत १२ मोबाइल सापडले. गेल्या ३४ दिवसांतील ५८ मोबाइलचे मालक सापडले नाहीत. याबाबत तुरुंग अधिकाऱ्यांनी अज्ञाताविरोधात पोलिसात फिर्याद दिली. क्लीन स्वीप मोहीम यापुढेही सुरू राहणार असल्याची माहिती तुरुंग अधिकाऱ्यांनी दिली.

# रेवण्णाला अटक

(पान १ वरून)

करण्यात आली आहे. प्रज्वलच्या विरोधात साक्ष देऊ नये म्हणून महिलेचे अपहरण करण्यात आल्याचे पोलिस सूत्रांचे म्हणणे आहे.

या प्रकरणात अटकपूर्व जामीन मिळावा यासाठी रेवन्ना यांनी विशेष न्यायालयात धाव घेतली. परंतु, न्यायालयाने त्यांचा जामीन अर्ज फेटाळला. जामीन अर्ज स्वीकारल्यास तो एसआयटीच्या चौकशीत सहभागी होतील असे आश्वासन रेवन्नाच्या वकिलांनी न्यायालयाला दिले. दुसरीकडे, एसआयटीच्या वकिलाकडून जामीन अर्जावर आक्षेप घेण्यात आला. शनिवारी पोलीस अधिकाऱ्यांनी म्हैसूर जिल्ह्यातील कालेनाहल्ली गावात शोध घेतला तेव्हा अपहृत महिला एका फार्महाऊसमध्ये सापडली. हे फार्महाऊस रेवन्नाच्या एका सहकाऱ्याचे असल्याचे सांगण्यात येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाचा तपास करणाऱ्या एसआयटीने मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना सांगितले होते की, प्रज्वल यांच्याविरोधात सीबीआय ब्लू कॉर्नर नोटीस जारी करू शकते. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी एसआयटी अधिकाऱ्यांसोबत महत्त्वाची बैठक घेतली होती, त्यादरम्यान त्यांनी प्रज्वल रेवन्नाला अटक करण्यासाठी तातडीने कारवाई करण्यास सांगितले होते.


# दोघांना फाशीची शिक्षा; पाचजणांना जन्मठेप

(पान १ वरून)

दंड ठोठावला. विजापूर जिल्ह्यातील गुंडकनळ गावातील बानू अत्तार उर्फ बानुबेगमचे त्याच गावातील सायबन्ना उर्फ मडकप्पा कोन्नूर याच्याशी प्रेम जडले आणि २०१७ मध्ये त्यांनी लग्न केले. दरम्यान, युवतीच्या कुटुंबियांनी तिच्या पतीविरोधात तक्रारही दाखल केली होती. तथापि, नंतर युवतीने सांगितले की, ती तिच्या पतीसोबत स्वेच्छेने गेली होती आणि तिला घेऊन जाण्यासाठी जबरदस्ती केली गेली नव्हती असे तिने न्यायालयात स्पष्ट केले. नंतर हे जोडपे दुसऱ्या गावात राहू लागले. युवती गर्भवती राहिल्यानंतर बाळंतपणासाठी पतीच्या घरी आली होती.

हे युवतीच्या नातेवाईकांना समजताच घरची इज्जत गेली असल्याचा राग मनात धरून त्यांनी दि. ३० जून २०१७ रोजी युवतीची आई रमजानबी महमदसाब अत्तार व भाऊ इब्राहिमसाब महमदसाब अत्तार, अकबर महमदसाब अत्तार, नातेवाईक दावलबी उर्फ सलमा बंदेनवाज जमादार, जिलानी अब्दुलखादर दखनी, अजमा जिलानी दखनी, दावलसाब सुभाना दन्नुर यांनी विवाहित युवती व तिचा पतीला मारहाण केली. या मारहाणीत युवती बेशुद्ध झाली. त्यानंतर तिचा खून करून तिला पेटवून दिल्याची तक्रार युवतीचा पती सायबन्ना उर्फ मुदकप्पा शरणप्पा कोन्नूर याने तालिकोट पोलीस ठाण्यात दिली.

त्यानंतर तत्कालीन डीवायएसपी पी.के.पाटील यांनी तपास करून दोषारोपपत्र दाखल केले होते.याबाबत ३२ जणांनी न्यायालयात साक्ष दिली. याप्रकरणी दोन आरोपींना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली असून अन्य पाच जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे.


Wish You
Happy Birthday to
Our Visionary Leader..
Hon.Dr.MLA
Rajendraji Patil (Yadravkar)
(Ex. Minister of State)
With best Compliments from
YADRAVKAR INDUSTRIES PVT. LTD.
CHIPARI
YADRAVKAR INDUSTRIES
PRIVATE LTD, CHIPRI



## डबेवाल्याचा पुतळा हलवू नका

डबेवाल्यांचा गौरव म्हणून ७ वर्षांपूर्वी मुंबईत डबेवाल्याचा हा पुतळा उभारण्यात आला. काही दिवसांपूर्वी लंडनमधील 'डब्बाड्रॉप' नावाची एक कंपनी मुंबईच्या डबेवाल्यांप्रमाणे कापडात गुंडाळलेले स्टीलचे डबे पुरवित असल्याचा व्हिडीओ समाज माध्यमावर तुफान वायरल झाला होता. मुंबईच्या डबेवाल्यांची महती अशी सातासमुद्रापलीकडे पोहोचली असताना मुंबईत त्यांची पुतळारूपी असलेली ओळख पुसण्याचा प्रयत्न दुर्दैवी म्हणावा लागेल. मुंबईतील डबेवाला पुतळा परिसराचे नव्याने सुशोभीकरण करण्याची मागणी मुंबई डबेवाला संघटनेने केली. त्याला दोन दिवस उलटत नाही तोवर, यंदा १ मे रोजी कामगार दिनी पुतळ्याला पुष्पहार अर्पण करायला गेलेल्या डबेवाला संघटनेच्या पदरी निराशा पडली. हा चौक ज्या नव्या कंपनीने देखभालीसाठी घेतला. त्यांना हा पुतळा तेथे नको आहे. खरे तर मुंबईच्या जडणघडणीचे गेल्या शतकभराचे साक्षीदार असलेले आणि 'मुंबईचे डबेवाले' हे दोन शब्दच ज्यांची ओळख पटवून देण्यास पुरेसी आहे.

■ प्रदीप मोरे

# साहित्यिकांचा समाजात मोठा खजिना

## व्यवस्थेला साहित्याची जोड दिली तरच ध्येयापर्यंत पोहोचणे शक्य

समाजात वावरत असताना अनेक वेळा आपल्याला काही गोष्टींचा सामना करावा लागतो. आपल्याला दृढतेने असे वाटू लागते की सर्व गोष्टींमध्ये बदल घडणे अत्यंत गरजेचे आहे. सर्वसाधारण माणूस अशा सुधारणासाठी कधीच गंभीर होताना दिसत नाही. जणू काही सर्व चुकीच्या व्यवस्था त्याने मान्य केल्या आहेत की काय असे वाटू लागते. एक व्यवस्था तयार होताना त्यामध्ये वरच्या घटकापासून सर्वात खालच्या घटकापर्यंत सर्वांना आपापली जबाबदारी दिलेली असते. अशा जबाबदाऱ्यांना पूर्णत्व देण्याची प्रकिया पूर्व नियोजित केलेली असते. जेव्हा एखाद्या पातळीवर ती जबाबदारी पार पडताना कूचराई केली जाते, तेव्हा संपूर्ण व्यवस्था कोलमडून जाते. याचा दुष्परिणाम प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या सर्व समाजावर पडत असतो. एकंदरीत अशा कोणत्या व्यवस्था व त्यांच्याशी सलग्न असणाऱ्या जबाबदाऱ्या असतील याचा विचार केला असता एक नागरिक म्हणून आपण स्वतः, समाज व्यवस्था, अर्थव्यवस्था, राजकीय व्यवस्था आणि न्यायव्यवस्था या सर्व घटकांचा समावेश होतो. एक सुजाण नागरिक म्हणून आपण या देशाविषयी कोणत्या पातळीवर जाऊन विचार करतो हे पण तेवढेच महत्त्वाचे आहे.

मी जर या समाजामध्ये राहतो तर या समाजाबद्दल माझी पण काही बांधिलकी आहे हा विचार मनामध्ये कायम असला पाहिजे. मला समाजाकडून काही अपेक्षा असतील तर मी पण समाजाचे काही देणे लागतो, हा पण विचार केला पाहिजे. अर्थव्यवस्थेकडून मी माझ्याबद्दल काही अपेक्षा ठेवत असेल तर या देशाच्या विकासासाठी मी किती सहकार्य करतो, याचा विचार केला पाहिजे. राजकारणाबद्दल सहसा कोणाचेही संतोषजनक मत नाही. देश योग्यरित्या चालला पाहिजे तर व्यवस्थापन तेवढेच मजबूत हवे. नागरिकांना ही व्यवस्था मजबूत करण्यासाठी मतदानाचा हक्क दिलेला आहे. त्या हक्कामुळे तो मतदान करतो. तरीसुद्धा त्याच्या मनात संकुचितता काय यावी. प्रत्येकजण उदासीन असलेला पाहायला मिळतो. न्यायव्यवस्थेबद्दल अजून तरी कुणाचे दुमत नाही. प्रत्येक नागरिक स्वतःसाठी या सर्व घटकांकडून योग्य ती अपेक्षा ठेवून आपले जीवन जगत असतो.



यापैकी कोणताही घटक आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडत नसेल तर ते समाजापुढे आणण्याचे काम लेखक, कवी, साहित्यिक, शाहीर, समाज सुधारक आणि पत्रकार हे प्रखरतेने आपापले साहित्य प्रकार किंवा त्यांच्या क्षेत्रामधून व्यवस्थेतील चुका समाजापुढे आणण्याचे काम करतात. साहित्य असे माध्यम आहे कि ज्याद्वारे अचूकतेने आजपर्यंत हे कार्य होत आहे. एक लेखक अथवा कवी कधीच प्रसिद्धी हा उद्देश समोर ठेवून लेखनी चालवत नाही तर त्यामागे समाज सुधारणा किंवा चुकीच्या बाबींना वेळीच आरसा दाखवणे हा मूळ उद्देश असतो. जेव्हा साहित्यिक आपल्या साहित्याला जन्म देतो तेव्हा प्रामुख्याने काही गोष्टींवर प्रकाश टाकण्याचे काम करतो. आपण २१ व्या शतकात आहोत हे आपण अभिमानाने सांगतो, आणि स्वतःला सुशिक्षित आणि सामंजस असल्याचे दाखवतो.

परंतु दुसरीकडे प्रसार माध्यमांमध्ये ज्या घटना ऐकायला किंवा पाहायला मिळतात, त्यामध्ये स्त्रीभ्रूण हत्या, शेतकरी आत्महत्या, निर्बल समाज घटकावर होणारा अन्याय व बलात्कार यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे पाहायला मिळते. एक लेखक किंवा कवी ह्या घटनांना समोर ठेवून पीडित घटकांची व्यथा व त्यांच्या अक्रोषातून भविष्यात होणारे दुष्परिणाम आपल्या लिखाणातून समाजासमोर आणण्याचे काम करतो. हे करत असताना पावलोपावली त्याचे अनेक विरोधकही बनतात. याचा विचार करता तो केवळ प्रसिद्धीसाठी लिहीत नाही हे स्पष्ट होते. लिखाणा मागचा हेतू केवळ समाज प्रबोधन आणि मरगळ आलेल्या समाजात नवचैतन्य भरण्याची शुद्ध भावना असते. समाजातील अनेक वाईट चालीरीती रूढी परंपरा यावर प्रखर टिकेने योग्य ते बदल घडवण्याचे कार्य तो निरंतर करत राहतो.

समाजातील जाणते किंवा अजाणते दोन्हीही घटक याद्वारे आपले अधिकार, हक्क व जबाबदाऱ्या समजून घेऊन त्याप्रमाणे जीवनात बदल घडवू शकतात. गरज आहे तेथंपर्यंत आपला आवाज पोहोचवू शकतात. व्यवस्थेतील उणीवा भरून काढण्यासाठी योग्य ती पावले उचलू शकतात. दैनंदिन जीवन जगत असताना सामाजिक अथवा राजकीय क्षेत्रात घडणाऱ्या घटनेबदल सकारात्मक व नकारात्मक जी काही विचारधारा निर्माण होते त्यांना शब्दात मांडून तो व्यक्त होत असतो. मग त्याचे प्रकार अनेक असतील प्रामुख्याने कविता किंवा लेखन हा प्रकार आहे. लिखाणाच्या माध्यमातून चुकीच्या घटकांची कानपिळणी करण्याचे काम साहित्यिक करत असतो. समाजात घडणाऱ्या अहितकारी बाबींविरोधात जेंव्हा लेखन केले जाते तेव्हा नक्कीच समाजापर्यंत सकारात्मक विचार पोहोचतात. त्याचा परिणाम म्हणून एक समृद्ध व सक्षम समाज निर्माण होताना पाहता येतो. समाज म्हणजे नेमके काय यावर थोडं बोलायचं झालं तर अनेक संबंधाचे जाळे म्हणजे समाज होय. माणसाचा जन्म होतो तेव्हापासून त्याला समाजाची गरज पडते आणि स्वतःभोवती तो असेच जाळे निर्माण करत चालतो. या समाजात जेंव्हा तो वावरू लागतो तेव्हा त्याला अनेक गोष्टींचा उलगडा होत जातो. त्याची विचारधारा आणि मानसिक अवस्था त्याद्वारे बनत जाते व तसे जीवन घडत जाते. जीवनात येणाऱ्या अडचणीवर मात करण्यासाठी त्याची विचारसरणीच कार्य करत असते. अशाच मौलिक विचारांचा आधार घेत साहित्यिक घडत असतो आणि समाजपयोगी विचारधारेला शब्दरूप देऊन साहित्य निर्मिती करत असतो. एक लेखक लिहिताना सर्व घटकांच्या चुका समोर ठेवून त्याबद्दल निर्भिड होऊन लिखाण करत राहतो. अनेक वेळा साहित्यकार किंवा पत्रकार यांच्यावर टीका केली जाते व त्यांना नाहक त्रास दिला जातो. तरीही तो लिहिणे थांबवत नाहीत. साहित्य म्हणजे काट्याने भरलेला रस्ता आहे असेच म्हणता येईल. या देशात अनेक साहित्यिक होऊन गेले ज्यांनी या समाजाला खूप मोठा साहित्य खजिना दिला आहे. साहित्य हे समाजात असणाऱ्या दरीला संपवण्यामध्ये अनमोल भूमिका बजावतात.

■ पवन कुसंदल

# प्रतिभावंत कवी : जगदीश खेबुडकर



मराठी चित्रपटसृष्टीचे सोनेरी पान म्हणजेच गीत सम्राट जगदीश खेबुडकर यांचा जन्म हळदी या गावात १० मे १९३२ रोजी झाला. खेबुडकर हे मूळचे कुलकर्णी. कोल्हापूर जिल्ह्यातील खेबवडे गावचे. त्यांचे वडील गोविंदराव बाळकृष्ण खेबुडकर हे वारकरी पंथातले आणि आई राधाबाई याही भक्तीमार्गातील. वडिलांचे स्वतःचे भजनी मंडळ असल्याने मृदंग, टाळ, चिपळ्या, एकतारी, वीणा ही वाद्ये घरातच होती. तथापि, वडील हे शिक्षक असल्याने त्यांचा जन्म आणि बालपण हे बदलीच्या गावी म्हणजे हळदी या ठिकाणी झाले. त्यांना संगीताचे बाळकडू घरातूनच मिळाले तर निसर्गाची लहानपणापासूनच ओढ असल्याने स्वच्छंदपणे रानात भटकणे, झाडावर चढणे, घोडेस्वारी हे छंदही जोपासले. १९३९ ला त्यांचे कुटुंब कोल्हापूरला आले. १९४८ मध्ये म. गांधी यांच्या हत्येनंतर त्याचं राहते घर जाळण्यात आल्याने ते रस्त्यावर आले आणि त्या वेदनेतून जळालेल्या घराच्या राखेच्या ढिगाऱ्याकडे पाहून वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांची पहिली कविता जन्माला आली, 'मानवते, तू विधवा झालीस'. त्यानंतरच त्यांचा कवी आणि गीतकार म्हणून प्रवास सुरू झाला. दरम्यान १९५६ मध्ये ते शिक्षक झाले. एकीकडे शिक्षक तर दुसरीकडे प्रतिभेला बहर असे फुलणे व फुलविणे ही दोन्ही कर्तव्ये ते पार पाडू लागले. १९५६ सालीच त्यांचे पहिले भक्तीगीत आकाशवाणीवर प्रसारित झाले. तर १९६० मध्ये त्यांचे पहिले चित्रगीत आणि पहिली लावणी 'मला हो म्हणत्यात लवंगी मिरची' प्रदर्शित झाली. संगीतकार वसंत पवार यांनी १९६२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'रंगल्या रात्री अशा' या चित्रपटासाठी तीन लावण्या लिहिण्याची त्यांना संधी दिली. 'मला हो म्हणत्यात लवंगी मिरची' या लावणीने ते सर्वसामान्यांचे कवी झाले. 'सोळावं वरीस धोक्याचं गं', 'कसं काय पाटील बरं हाय का' अशा सहजसुंदर अगदी बोलल्यासारख्या लावण्या त्यांनी लिहिल्या. त्यांच्या लावणीचे वैशिष्ठ्य म्हणजे कमीतकमी जोडाक्षरांचा वापर आणि सोपे शब्द आणि छोट्या छोट्या ओळी. तथापि, त्यांच्या लावण्या शृंगारात्मक असत. जसे 'या रावजी बसा भावोजी', ग.दि.मा. यांच्याप्रमाणे लावणी लिहिताना त्यांनी आपल्या कुलीन व संस्कारी लेखणीचा आब व तोल सावरून धरताना आपल्या अभिजात कलात्मकतेच्या स्पर्शाने तिला अधिक उंचीवर नेऊन ठेवले. त्यांच्या लावण्या आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या माध्यमातून घराघरात पोहोचल्या. कधीही तमाशा न बघितलेल्या खेबूडकरांनी एकापेक्षा एक अशा फर्मास लावण्या लिहिल्या हे नवलच आहे.

उत्कट भावभावनांचा सौंदर्यपूर्ण आविष्कार त्यांच्या लेखणीतून साकारला. त्यांनी मराठी गीत संगीत प्रेमीना मोहून टाकले. त्यांच्या बहुरंगी, बहुढंगी गीतांनी रसिकांना अक्षरश: वेड लावले. व्ही.शांताराम यांचा 'पिंजरा' हा चित्रपट राम कदम व खेबूडकर यांच्या कारकिर्दीतील सर्वोच्च बिंदू ठरला. 'पिंजरा' साठी खेबुडकरांनी ११० गाणी लिहिली तर कदम यांनी १३५ चाली बांधल्या होत्या. त्यातून शांतारामबापूंनी ११ गाणी निवडली. खेबुडकरांनी 'देहाची तिजोरी' सारख्या भक्तिगीतापासून ते 'गावात होईल शोभा' अशी गाणी सहजपणे लिहिली. त्यांनी 'धुंदी कळ्यांना धुंदी फुलांना' म्हणत मुक्त भावनांना शब्दरूप दिले. तर कधी 'आत्म्याने जणू परमात्म्याला अर्पण केली कुडी' असं म्हणत द्वैतातून अद्वैतात नेले. सात्विक मनाचं मोहापायी होणारं अध:पतन 'कशी नशिबानं थट्टा आज मांडली' या गाण्यातून प्रभावीपणे व्यक्त केले. सुधीर फडके यांच्याबरोबर 'आम्ही जातो अमुच्या गावा' अशा सामाजिक चित्रपटांना गाणी देताना 'आरं आरं माणसा तू येडा का खुळा रं' अशा भक्तिगीतांपासून प्रार्थना गीतापर्यंत गाणी लिहिली. 'गुरूने दिला ज्ञानरुपी, सत्यम शिवम सुंदरा' अशा त्यांच्या प्रार्थनांना शाळेची प्रार्थना होण्याचंही भाग्य लाभलं. त्यांनी 'गण गवळण' या चित्रपटासाठी सर्वात जास्त १९ गाणी लिहिली. तर दुर्गा आली घरा या चित्रपटातील त्यांचे गाणे सर्वात जास्त वेळ म्हणजे १६ मिनिटांचे आणि १२० ओळींचे होते. या गीतात त्यांनी साडेतीन शक्तिपीठांचे वर्णन केले होते. एक गाव बारा भानगडी या चित्रपटासाठी सर्वाधिक म्हणजे १०० ओळींचा वग लिहिला. सर्वाधिक म्हणजे ३५ दिग्दर्शकांनी खेबुडकरांची गाणी वापरली. तर ३६ गायक आणि गायिकांनी त्यांची गीते गायली. जगदीश खेबुडकर यांना ६० हून अधिक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. राज्य शासनाने त्यांना ११ वेळा सन्मानित केले तर त्यांना मिळालेल्या पुरस्कारांची यादी लांबलचक आणि न संपणारी आहे. तथापि, त्यांना मिळालेल्या गदिमा पुरस्कार, कोल्हापूरभूषण पुरस्कार, फाय फाउंडेशन पुरस्कार, साहित्य सम्राट पुरस्कार, रसरंग फाळके पुरस्कार, शिवाजी सावंत पुरस्कार, व्ही.शांताराम स्मृति जीवनगौरव पुरस्कार, बालगंधर्व स्मारक समितीचा बालगंधर्व पुरस्कार, जीवनगौरव पुरस्कार, शाहू पुरस्कार, करवीर भूषण, दूरदर्शन जीवनगौरव, कुसुमाग्रज साहित्य पुरस्कार, शरद क्रीडा आणि सांस्कृतिक प्रतिष्ठानातर्फे दिलेला राम कदम कलागौरव पुरस्कार यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. अवीट गोडीचा, असंख्य गीतांचा खजिना रसिकांससवेत ठेवून खेबूडकर वयाच्या ८० व्या वर्षी ३ मे २०११ रोजी अनंतात विलीन झाले.

■ विजय कोष्टी

# मतदारांच्या मदतीला निवडणूक आयोगाचे ॲप्स

सध्या देशभरात लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरु आहे. सशक्त लोकशाहीसाठी निवडणूक प्रक्रिया महत्वाची आहे. निवडणुक प्रक्रियेमध्ये मतदार हा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो. मतदारांना निवडणूक प्रक्रियेची सविस्तर माहिती देण्यासाठी तसेच त्यांना विनासायास मतदान करता यावे यासाठी निवडणूक आयोगाच्या वतीने मतदारांच्या मदतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित विविध सोयी सुविधा व ॲप्स उपलब्ध करुन दिले आहेत. आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार दाखल करण्यासाठी, उमेदवारांची माहिती, मतदार यादी, उमेदवार व मतदारांच्या नावांची पाहणी व दुरुस्ती यांसह निवडणूक प्रक्रियेची सविस्तर माहिती घेण्यासाठी तसेच मतदान करणे सोयीचे होण्यासाठी महत्त्वपूर्ण पोर्टल तयार केले आहेत. सिव्हिजिल, केवायसी, व्होटर्स हेल्पलाइन, सक्षम असे विविध ॲप्स व पोर्टल मतदारांना उपयुक्त ठरत आहेत. मतदारांनीही याचा वापर करुन मतदान प्रक्रियेत सहभागी होवून मतदानाचा टक्का वाढवणे आवश्यक आहे. निवडणूक प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक असणाऱ्या मतदारांसाठी निवडणूक आयोगाने विविध ॲप्स व पोर्टल उपलब्ध करुन दिले आहेत. सी-व्हिजील, व्होटर्स सर्विस पोर्टल, व्होटर्स हेल्पलाइन, केवायसी ॲप, सक्षम ॲप अशा ॲप्सचा वापर करुन मतदारांना मतदारसंघ, मतदार यादी, यादी मधील आपले नाव, छायाचित्र, उमेदवारांची सविस्तर माहिती जाणून घेणे सोपे झाले आहे. निवडणूक आयोगाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या पोर्टल व विविध ॲप्सचा वापर करुन मतदारांनी निवडणुकांच्या अनुषंगाने आवश्यक ती माहिती जाणून घ्यावी. तसेच मतदान करुन आपले राष्ट्रीय कर्तव्य बजावावे व लोकशाहीला अधिक बळकट करण्यासाठी हातभार लावावा.

**'सीव्हिजिल सिटीझन ॲप'–** निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास याची तक्रार भारत निवडणूक आयोगाने विकसित केलेल्या 'सीव्हिजिल सिटीझन ॲप' द्वारे थेट निवडणूक आयोगाकडे दाखल करणे सोपे झाले आहे. या ॲपद्वारे नागरिकांनी दाखल केलेल्या तक्रारीवर पहिल्या १०० मिनिटांत पहिली कार्यवाही केली जाते. तसेच तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवण्यात येते. सीव्हिजिल ॲप अँड्रॉइड मोबाईलवर किंवा आयओएस डिव्हाईसवर डाऊनलोड करता येते. आचारसंहिता भंगाच्या किंवा राजकीय गैरव्यवहाराच्या घटनांची तक्रार दाखल करण्यासाठी निवडणूक कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित न राहताही याचा वापर करुन काही मिनिटांतच तक्रार नोंदवता येते.

तक्रार नोंदवण्यासाठी आचारसंहिता उल्लंघनाचा प्रकार, घटनेचा तपशील, ठिकाण, वेळ नोंदवावी लागते. यासोबत आचारसंहिता उल्लंघनाच्या घटनेची छायाचित्रे किंवा व्हिडिओ डाऊनलोड करावा लागतो. हा ॲप जिल्हा नियंत्रण कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी आणि भरारी पथकाशी संबंधित यंत्रणेशी नागरिकांना जोडतो, त्यामुळे तक्रारीवर आवश्यक ती कार्यवाही जलदगतीने होते. तसेच नोंदवलेल्या तक्रारीची माहितीही गोपनीय ठेवली जाते. या बाबींमुळे आचारसंहिता उल्लंघनाच्या घटनांवर अंकुश ठेवणे शक्य आहे.




**केवायसी ॲप–** लोकसभा निवडणुकीतील उमेदवारांची संपूर्ण माहिती मतदारांना होण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने नो युवर कँडिडेट (केवायसी) या ॲपची निर्मिती केली आहे. या ॲपमुळे लोकसभा निवडणुकीतील उमेदवारांची माहिती केवळ एका क्लिकवर मिळते. केवायसी ॲपमध्ये उमेदवाराचे नाव टाईप केल्यानंतर त्या उमेदवाराने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर केलेले नामनिर्देशनपत्र पाहता येते. यामध्ये त्या उमेदवाराची माहिती, संपत्तीचे विवरण, नोंद असणारे गुन्हे आणि यानुषंगाने इतर सविस्तर माहिती दिसते. यामुळे उमेदवारांची इत्तंभूत माहिती मिळणे सोयीचे झाले आहे.

**व्होटर्स सर्व्हिस पोर्टल–** मतदारांना आवश्यक त्या सर्व सेवा देण्याच्या उद्देशाने व्होटर्स सर्व्हिस पोर्टल तयार करण्यात आले आहे. याद्वारे मतदारांना मतदार यादी पाहता येते. मतदार ओळखपत्र मिळवण्यासाठी, ओळखपत्रातील दुरुस्तीसाठी ऑनलाईन अर्ज करता येतो, मतदान केंद्र, मतदारसंघाचा तपशील पाहणे यांसारख्या विविध सेवांचा लाभ या पोर्टलच्या माध्यमातून मतदार घेऊ शकतात. या पोर्टलमुळे पारदर्शकतेबरोबरच मतदारांना एकाच ठिकाणी अनेक दर्जेदार सेवा मिळतात. यामुळे निवडणुकीशी संबंधित माहिती एकत्रित पाहता येते. या पोर्टलद्वारे माहिती शोधण्यासाठी आपले नाव, जन्मतारीख, वय, राज्य, मतदारसंघ यासारखा तपशील भरुन अथवा ईपिक कार्ड क्रमांक भरुन माहिती शोधता येते. मतदार यादीतील आपले नाव शोधता येते, नवीन मतदार म्हणून नोंदणीसाठी ऑनलाइन अर्ज करता येतो. नोंदींमध्ये सुधारणा करता येते तसेच पत्ता बदलता येतो. मतदार माहिती स्लिप मिळवता येते.

मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ), निवडणूक नोंदणी अधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांचे नाव व संपर्क क्रमांकही या पोर्टलद्वारे मिळतात. त्याचबरोबर आपला मतदारसंघ, भाग, केंद्राचा तपशील मिळवतो.

**सक्षम ॲप–** देशातील दिव्यांग मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा तसेच मतदान केंद्रावर पोहोचून त्यांना मतदान करणे सोपे आणि सोयीचे होण्यासाठी सक्षम ॲप तयार करण्यात आला आहे. हा ॲप दिव्यांगांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांच्यासाठी अनुकूल पद्धतीने बनवण्यात आला आहे. गूगल स्टोअरवरुन आणि आयओएस वरुन सक्षम ॲप डाउनलोड करता येतो. या ॲपद्वारे दिव्यांग मतदारांना त्यांचे यादीतील नाव तपासता येते, मतदान केंद्राचे ठिकाण शोधता येते, बूथपर्यंत पोहोचण्यासाठी व्हीलचेअरची मागणीही करता येते. तसेच दिव्यांग व्यक्ती नवीन मतदार म्हणून स्वतःच्या नावाची नोंदही करु शकतात. मतदार ओळखपत्रात दुरुस्तीची विनंती करणे, मतदार कार्ड आधारशी लिंक करणे तसेच निवडणूक प्रक्रियेशी संबंधित इतर प्रकारच्या सेवा व निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची माहिती या ॲपद्वारे मिळू शकते. याबरोबरच दिव्यांग मतदारांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होताना येणाऱ्या समस्येबद्दल तक्रार नोंदवण्याची सोय या ॲपवर आहे. तसेच यावर मतदान केंद्रांबद्दल माहिती, मतदान केंद्राचे स्थळ, मतदान केंद्रावर उपलब्ध प्रवेश योग्यता, मतदान अधिकाऱ्यांचां संपर्क तपशील मिळतो. निवडणुकांशी संबंधित सविस्तर माहिती व लेख या सक्षम ॲपवर उपलब्ध आहेत. लोकसभा निवडणुकीत सक्षम ॲपचा वापर करुन दिव्यांग व्यक्ती निवडणुकांशी संबंधित विविध सेवांचा लाभ घेत आहेत. या ॲपच्या माध्यमातून माहिती व सुविधा घेऊन दिव्यांग मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा.

**व्होटर्स हेल्पलाइन–** मतदार यादीमध्ये नाव शोधण्यासाठी, मतदार नोंदणी करण्यासाठी, मतदारांच्या नावात व छायाचित्रात बदल करण्यासाठी, ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी आयोगाच्या वतीने व्होटर्स हेल्पलाइन ॲप तयार करण्यात आला आहे. ऑनलाईन तक्रार दाखल करण्यासाठी, उमेदवारांची माहिती शोधण्यासाठी तसेच मतदार स्लिप डाउनलोड करण्यासाठीही याचा उपयोग होतो. व्होटर्स सर्विस पोर्टलद्वारे नवीन मतदार नोंदणी, मतदार यादी मध्ये वैयक्तिक माहिती भरणे, मतदार संघ किंवा माहितीचा तपशील बदलणे किंवा आवश्यक अर्ज ऑनलाईन भरणे, उमेदवारांचे प्रोफाइल, शपथपत्रे व अन्य माहिती या ॲपद्वारे पाहता येते.

■ वृषाली पाटील
माहिती अधिकारी, कोल्हापूर

# राज्यात लव्ह जिहाद विरोधी कायदा लागू करावा

मुंबईतील एकामागोमाग एक उघड होणाऱ्या लव्ह जिहादच्या घटना मन विषिन्न करत आहेत. केवळ मुंबईतच नव्हे तर राज्यासह देशातील अनेक भागांत हे रॅकेट सर्रासपणे सुरु आहे. या षड्यंत्राची भयावहता दर्शवणारा केरला स्टोरीज नावाचा चित्रपटही मध्यंतरी येऊन गेला. तरीही हिंदू मुली आज जिहाद्यांच्या फसवणुकीला बळी पडत आहेत.

स्वतःची ओळख लपवून हिंदू मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढणे, त्यांच्याशी जवळीक साधून त्यांचे आक्षेपार्ह फोटो आणि व्हिडीओ बनववणे त्यांना ब्लॅकमेल करणे, त्यांच्याशी निकाह करण्यासाठी त्यांचे धर्मपरिवर्तन करणे, त्यांचा उपभोग घेऊन त्यांना वाऱ्यावर सोडणे, त्यांना देहविक्रय करण्यास भाग पाडणे, त्यांच्यापासून झालेल्या अपत्यांची विक्री करणे, लव्ह जिहादला बळी पडलेल्या मुलींची आखाती देशांत विक्री करणे आदी असंख्य प्रकार लव्ह जिहादच्या माध्यमातून घडत असल्याचे आता सप्रमाण सिद्ध झाले आहे.


या षड्यंत्राविरोधात कठोर कायदा करण्यात यावा अशी मागणी आज अनेक संघटनांकडून आणि पक्षांकडून केली जात आहे. राज्याच्या सत्तेत दोन हिंदुत्ववादी विचारसरणीचे पक्ष बहुमतात असताना या कायद्याला विलंब तरी का होत आहे?

पोटच्या मुलीला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपावे, तिला शिकवावे, तिचे सर्व हट्ट पुरवावे आणि वयात आल्यावर तिच्यासाठी सुयोग्य वर शोधून तिचे कन्यादान करावे अशी प्रत्येक आई वडिलांची माफक इच्छा असते. अशी लाडाप्रेमाने वाढवलेली मुलगी कोणाच्या तरी फसव्या प्रलोभनांना फसते.

आई वडिलांना झुगारून धर्मपरिवर्तन करते हे कोणत्याही आई वडिलांच्या काळजावर घाव करणारेच आहे. मुलीने स्वत:च्या मनाने निवडलेला जोडीदार तिला सुखाने नांदवणारा आहे हे कळल्यावर पालकांचा राग उणावतोही; मात्र आपली लाडकी मुलगी एका जिहादी संकटाला बळी पडली असून तिच्या आयुष्याची पुरती फरफट झाल्याचे ऐकून त्या आईबापाचे हृदय किती पिळवटून निघत असेल याचा विचार कोणी केला आहे का? आजतागायत अशा लाखो मुली या षडयंत्राला बळी पडल्या आहेत. गेल्या काही दिवसांत उघड होणाऱ्या घटनांमधून हे षडयंत्र आता भयावह स्वरूप धारण करत असल्याचे दिसत आहे. या पीडित मुलींच्या आणि त्यांच्या आई वडिलांच्या वेदनांकडे सरकार लक्ष देणार आहे की नाही? मुलींच्या उठलेले लव्ह जिहादविरोधी कायदा राज्यात प्राधान्याने लागू करावा.

■ नरेश घरत

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**रविवार,ता.५.५.२०२४** विक्रम संवत २०८०, शिवशक ३५०, शालिवहन शके १९४६, क्रोधी नाम संवत्सरे, उत्तरायणे, वसंत ऋतो, चैत्र मासे, कृष्ण पक्षे, द्वादशी तिथी, २०.४० नंतर त्रयोदशी तिथी उत्तरा भाद्रपदा नक्षत्र, १९.५८ नंतर रेवती नक्षत्र, मीन रास वैधृति योग, ७.३७ नंतर विष्कंभ योग, २८.०४ पर्यंत कौलव करण, ७.१२ नंतर तैतिल करण, १७.४३ नंतर गरज करण, २८.१२ पर्यंत दिनमान १२.४० सुर्योदय ६.१०, सुर्यास्त १८.५० (कोल्हापूरचे) राहू काळ सायं ४.३० ते ६ प्रदोष मध्यम दिवस सकाळी ९.३० नंतर व्यापार नविन दुकान घालणेस, संतश्रेष्ठ गोरोबा काका कुंभार समाधी सोहळा, खरसुंडी यात्रा, ज्योतिर्लिंग यात्रा खोडशी, शुक्रास्त.

**ज्यो:केशव पेटकर महाराज–९६०४७०९१५९**

## * राशीभविष्य

**मेष–**नको ते विचार मनात घोळतील. शारीरिक व्यायाम करा कारण रिकामे डोके हे सैतानाचे घर असते. कमिशन,लाभांश किंवा मानधन याद्वारे फायदे मिळतील.

**वृषभ–**अचानक पैसा आल्याने तुमची प्रलंबित बिले आणि ताबडतोब करावयाचे खर्च भागतील.मुलांच्या यशस्वी होण्यामुळे तुम्हाला अभिमान वाटेल.

**मिथून–**गरजेच्या कामाला वेळ न देणे आणि व्यर्थ कामात वेळ घालवणे आज तुमच्यासाठी घातक सिद्ध होऊ शकते. एकटेपण्याला आपल्यावर वरचढ होऊ देऊ नका.

**कर्क–**आपल्या मुलांच्या कामाचा तुम्हाला अपरिमित आनंद होईल.कमिशन–लाभांश– किंवा मानधन याद्वारे फायदे मिळतील. ध्यानधारणा आराम मिळवून देईल.

**सिंह–** आपल्या संभाषणाबाबत, बोलण्याबाबत कायम स्पष्ट असावे, अन्यथा अशा गोष्टी आपला कोणताही ठावठिकाणा ठेवणार नाहीत.

**कन्या–**आज तुम्ही एकमेकांना एकमेकांविषयी वाटणाऱ्या भावना समजून घ्याल. कुठून तरी उधार परत मिळू शकते ज्यामुळे तुमच्या काही आर्थिक समस्या दूर होतील.

**तुळ–**आज शांत राहा–तणावमुक्त राहाल.अचानक पैसा आल्याने तुमची प्रलंबित बिले आणि ताबडतोब करावयाचे खर्च भागतील.धनलाभ होण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक–**तणावाकडे दुर्लक्ष करू नका. कामाच्या ठिकाणी ज्याचे तुमच्याशी फार जुळत नव्हते .आज त्या व्यक्तीशी तुमचा सुसंवाद होईल.

**धनु–**आपल्या भावाला परिस्थिती नियंत्रणाखाली ठेवण्यासाठी मदत करा. संघर्षाला विनाकारण हवा देऊ नका, त्याऐवजी खेळीमेळीने प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करा.

**मकर–**ज्यांच्या घरातील व्यक्ती तक्रार करतात की, ते कुटुंबाला पर्याप्त वेळ देत नाही. ते आज कुटुंबियांना वेळ देण्याच्या बाबतीत विचार करू शकतात.

**कुंभ–**स्वत:मध्ये प्रगती करणारे प्रकल्प हाती घेतलेत तर त्याचा दुहेरी फायदा होईल . तुम्हाला चांगले वाटेल आणि तुम्ही अधिक आत्मविश्वास बाळगू शकाल.

**मीन–**घरातील सणांचे उत्सवाचे वातावरण तुमच्यावरील दडपण कमी करेल. तुम्ही केवळ बघ्याची भूमिका न बजावता त्या कार्यक्रमात जरूर सहभागी व्हा.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.* कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# भ्रष्टाचारी काँग्रेसला विकासाशी देणे–घेणे नाही–नरके

## हळदीमध्ये मंडलिक यांच्या प्रचारार्थ सभा



राशिवडे,ता.४(प्रतिनिधी)–

**काँग्रेस विकासाच्या मुद्द्यावर बोलत नाही. खरे तर देशाच्या प्रश्नावर ही निवडणूक व्हायला हवी. आपल्या सत्ता काळात भ्रष्टाचाराची मालिका अखंड चालू ठेवणाऱ्या काँग्रेसला देशाच्या विकासाशी काही देणं–घेणं नाही.' अशी टीका माजी आमदार चंद्रदीप नरके यांनी केली. हळदी (ता. करवीर) येथे महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक यांच्या प्रचार सभेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी हळदीच्या सरपंच प्रज्ञा पाटील होत्या.**

श्री. नरके म्हणाले, ' भ्रष्टाचाराची मालिका जपणाऱ्या काँग्रेसला देश हिताचे काही पडलेले नाही. याउलट मोदींनी अनेक योजनांद्वारे सामान्य लोकांचे जीवन सुसह्य बनवण्याचे काम केले आहे. विरोधकांच्या भूलथापांना बळी न पडता सुज्ञ जनता संजय मंडलिक यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करेल. असा विश्वास चंद्रदीप नरके यांनी व्यक्त केला.

खासदार धनंजय महाडिक म्हणाले, दहा वर्षात भ्रष्टाचाराचा आरोप नसणारे पंतप्रधान मोदी यांना देश महासत्ता बनण्यासाठी साथ द्या. भारतीय जनता पक्षाच्या दहा वर्षाच्या काळात २५ कोटी लोक गरीब रेषेच्यावर आले आहेत. दहा कोटी घरात गॅस सिलेंडर पोचले आहे. नागरिकांना मोफत अन्नधान्य, आयुष्यमान भारत, किसान सन्मान योजनेतून दरवर्षी १२ हजार रुपये, राष्ट्र सन्मानासाठी राम मंदिराची बांधणी, चांद्रयानउड्डाण अशी विकासाची कामे भाजपने केली. भारतीय अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावर आली आहे. भावनेच्या प्रचाराला बळी न पडता विकासाच्या मुद्द्यावर मतदान करून संजय मंडलिक यांना विजयी करा, असे आवाहन महाडिक यांनी केले.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे उत्तम कांबळे म्हणाले, काँग्रेसने ६५ वर्षात राज्यघटनेचा सन्मान केला नाही, ते आता संविधानाचे रक्षण करतो म्हणत आहेत. हे हास्यास्पद आहे. भाजपचे मुख्य समन्वयक हंबीरराव पाटील म्हणाले, बाबासाहेब आंबेडकरांचा दोन वेळा पराभव करणाऱ्या काँग्रेसचे संविधानाचे रक्षण करण्याचे वक्तव्य हा ढोंगीपणा आहे. शिवसेनेचे उपाध्यक्ष अजित पाटील म्हणाले, वारसा हा निवडणुकीचा मुद्दा होऊ शकत नाही. विकासाच्या मुद्यावर ही निवडणूक लढवली जावी. यावेळी राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष बाबासाहेब पाटील आसुर्लेकर, आरपीआयचे बाळासाहेब वाशीकर, सर्जेराव पाटील यांची भाषणे झाली.

यावेळी गोकुळचे संचालक अजित नरके,राष्ट्रवादीचे मधुकर जांभळे, भगवान काटे, शिवाजी देसाई, भाजपचे तालुका प्रमुख दत्ता मेडसिंगे, शिवसेनेचे कृष्णात पवार, किसान सेल अध्यक्ष गणेश बेगडे, देवराज नरके ,सुयोग पाटील, यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नामदेवराव पाटील यांनी आभार मानले.

# बेळगावात मतदार ओळखपत्रांचे वाटप

बेळगाव,ता.४(प्रतिनिधी)–

**येत्या ता.७ मे रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी नितेश पाटील यांनी शहरात घरोघरी जाऊन मतदार ओळखपत्रांचे वाटप केले.**

बेळगाव उत्तर विधानसभा मतदार संघांतर्गत गोंधळी गल्लीत घरोघरी भेट देऊन मतदार स्लिप वितरित केल्या. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी नितेश पाटील म्हणाले, मतदारांना मतदार ओळखपत्रावर त्यांच्या नावासह मतदान केंद्र ओळखता येणार आहे. मतदान केंद्राची अचूक माहिती मिळणार असल्याने मतदानाच्या दिवशी मतदान केंद्र शोधण्यात कोणताही गोंधळ होणार नाही, असे त्यांनी सांगितले.

तसेच मतदारांची सोय व्हावी आणि मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी संबंधित विधानसभा मतदारसंघात बीएलओची स्थापना करण्यात आली आहे. ते घरोघरी जाऊन मतदार ओळखपत्रांचे वाटप करणार आहेत. जनतेने आपले मतदार ओळखपत्र घेऊन निश्चित केलेल्या मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी प्रोबेशनरी आयएएस अधिकारी शुभम शुक्ला, बेळगाव उत्तर विधानसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा महापालिका आयुक्त पी.एन.लोकेश आदी उपस्थित होते.

# सांगलीत लष्कराच्या हेलिकॉप्टरचे इमर्जन्सी लँण्डींग

## तीन जवानांसह पायलट सुखरूप

सांगली,ता.४–

**भारतीय लष्कराच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे शनिवारी सांगलीत इमर्जन्सी लँण्डींग करावे लागले. हे हेलिकॉप्टर नाशिकहून कर्नाटकच्या बंगळूरूला चालले होते.दरम्यान या हेलिकॉप्टरमध्ये असलेले सैन्याचे तीन जवान व पायलट सुखरूप आहेत.**

भारतीय लष्कराच्या हेलिकॉप्टरमध्ये शनिवारी अचानक बिघाड झाला. सदरचे हेलिकॉप्टर नाशिकहून बंगळूरूला जात होते.यावेळी हेलिकॉप्टरमध्ये काही तांत्रिक दोष पायलटच्या लक्षात आला.यानंतर, सदरचे हेलिकॉप्टर सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील एरंडोली गावातील एका शेतात तातडीने उतरवण्यात आले.या हेलिकॉप्टरमध्ये पायलटसह भारतीय लष्कराचे तीन जवानही होते. भारतीय लष्कराचे हेलिकॉप्टर अचानक शेतात उतरल्याचे पाहून गावकऱ्यांनी हेलिकॉप्टरला घेराव घातला. हेलिकॉप्टर पाहण्यासाठी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. सदरची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी तात्काळ गावकऱ्यांना पांगवले. हेलिकॉप्टरमधील बिघाड दुरुस्त करण्यासाठी लष्कराचे पथक नाशिकहून रवाना झाले आहे.




यासंदर्भात लष्कराच्या अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, लष्कराच्या जवानांना वैद्यकीय साहित्यासह रसद पुरवण्यासाठी हेलिकॉप्टर नाशिकहून बंगळूरूला जात होते.यादरम्यान अचानक हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाला. यानंतर सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमाराला शेतात आपत्कालीन स्थितीत उतरवण्यात आले. सध्या या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## मुरगूडचा मंगळवारचा आठवडी बाजार बंद

मुरगूड,ता.४(प्रतिनिधी)–

**मुरगूड येथे दर आठवड्याला मंगळवारी भरणारा आठवडी बाजार ता.७ मे रोजी लोकसभेची निवडणुकीचे मतदान असल्याने त्या दिवशी भरणार नसल्याची माहिती नगरपालिकेने प्रसिध्दी पत्रकातून दिली आहे.**

मुरगूड नगरपरिषद हद्दीतील तसेच परिसरातील शेतकरी, व्यापारी व नागरिकांना कळविण्यात येते की, ४७ कोल्हापूर लोकसभा मतदार संघामध्ये मंगळवार ता.७ मे २०२४ रोजी मतदान असलेने मा.अपर जिल्हादंडाधिकारीसो कोल्हापूर यांचे सूचनेनुसार मुरगूड शहरामध्ये दर मंगळवारी भरण्यात येणारा आठवडी बाजार व जनावर बाजार बंद राहणार आहे.



कौलगुड्ड येथे प्रचारसभेत बोलताना बसवप्रसाद जोल्ले, सोबत इतर प्रमुख मान्यवर.

# चिकोडीतून अण्णासाहेब जोल्ले यांना विजयी करावे-बसवप्रसाद जोल्ले

निपाणी,ता.४(प्रतिनिधी)–

**भाजप पक्ष आणि नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व भारतात पुन्हा प्रस्थापित करून देशाची अर्थव्यवस्था विकसित करून सर्वांगीण मोहीम सुरू केली पाहिजे. त्यामुळे चिकोडीतून अण्णासाहेब जोल्ले यांना प्रचंड बहुमताने विजयी करावे, असे आवाहन बसवज्योती युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष बसवप्रसाद जोल्ले यांनी केले.**

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ कागवाड विधानसभा मतदारसंघातील कौलगुड्ड आणि सिद्देवाडी गावात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या प्रचारसभेत ते बोलत होते. यावेळी स्थानिक नेते, मान्यवर आणि पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### उगारखुर्द आणि केंपवाड येथे प्रचार


कागवाड विधानसभा मतदारसंघातील उगारखुर्द आणि केंपवाड गावात बसवप्रसाद जोल्ले यांनी प्रचार सभा घेऊन उपस्थितांना मार्गदर्शन केले. देशाच्या वैभवाची पताका जागतिक स्तरावर नेणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी ता.७ मे रोजी क्रमांक १ 'कमळ'च्या चिन्हावर सर्वात मौल्यवान मत देऊन सर्वाधिक मताधिक्याने विजयी करा, असे आवाहन केले.

# शिराळ्यात महायोगी श्री गोरक्षनाथ यात्रेस प्रारंभ

## शेकडो भाविक दाखल; गर्दीने परिसर फुलला

शिराळा,ता.४(वार्ताहर)–

**शिराळा येथील महायोगी श्री गोरक्षनाथ यात्रेसाठी महाराष्ट्र व कर्नाटकमधून हजारो वारकरी दाखल झाले आहेत. गोरक्षनाथ मंदिर परिसर टाळ मृदुंगाच्या गजराने दुमदुमला असून भक्तीमय वातावरणात गोरक्षनाथ यात्रा सुरू झाली आहे. गोरक्षनाथ मठ परिसरात भाविकांमध्ये प्रचंड उत्साह आहे. भक्तीमय परिसर भारावून गेला आहे. यात्रेनिमित्त श्री गोरक्षनाथांची**



**पूजा पृथ्वीसिंह नाईक यांच्या हस्ते करण्यात आली. यात्रा पुढील सहा–सात दिवस भरणार आहे. ही यात्रा**




दर्शनासाठी भाविकांनी केलेली गर्दी.

**शनिवार एकादशी दिवशी सुरू झाली असून ही यात्रा अक्षय तृतीया पर्यात सुरू राहणार आहे. तोरणा–मोरणा नदीच्या संगमावर यात्रा भरली आहे. गोरक्षनाथांच्या दर्शनासाठी पहाटे पासून भक्तांनी गर्दी केली होती. मंदिर परिसरात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. वाहतूक व्यवस्था सुरळीत होईल या दृष्टीने पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे. दर्शनासाठी रांगेची व्यवस्था केली आहे.**

मंदिर परिसर सुशोभित करण्यात आला असून मिठाई वाले, पाळने, खेळणी दुकानदार, यांच्या जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. विद्युत खेळणी, पाळणे, मिठाई दुकाने, मनोरंजन करणारी खेळणी दाखल झाली आहेत. शिराळा नगरपंचायतीने मुख्याधिकारी नितीन गाढवे, मठाधिपती पीर पारसनाथ महाराज व आनंदनाथ महाराज यांनी वारकरी संप्रदायातील भाविक वारकरी, यात्रेनिमित्त आलेले भक्तांची व्यवस्था केली आहे. पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे. यात्रेनिमित्त शिराळा युवक संघटना शिराळाचे संस्थापक माजी सरपंच देवेंद्र पाटील, माजी उपनगराध्यक्ष किर्तीकुमार पाटील यांनी गोरक्षनाथ भाविकांचे स्वागतासाठी भव्य स्वागत कमान उभी केली आहे. भाविकांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी गोरक्षनाथ रोडवर कै. वसंतराव नाईक बाबा स्मृती प्रतिष्ठानतर्फे पाणीपोईची सोय केली आहे. शिराळा आगारातून जादा बस गाडया गोरक्षनाथ यात्रेसाठी सोडण्यात आल्या आहेत. मोठ्या प्रमाणात भाविक दाखल झाले आहेत. गोरक्षनाथ मंदिर परिसरात भजन व किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.

**गोरक्षनाथ यात्रेनिमित्त शिराळा युवक संघटना शिराळा यांचे संस्थापक सरपंच देवेंद्र पाटील व उपनगराध्यक्ष किर्तीकुमार पाटील यांनी येणाऱ्या सर्व भाविकांचे स्वागतासाठी भव्य स्वागत कमान उभी केली आहे.**





















## पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत

### * खरेदी विक्री *

**स्विफ्ट डिझायर** २०१९ VXI सिंगल ओनर पेट्रोल एअरबॅग नवीन टायर नवीन बॅटरी, MH09 मो. ९८५०६२१४६७

**इचलकरंजीपासून** जवळच शमणेवाडी (बेडकीहाळ) सर्कलमध्ये ६ एकर शेती, रोडटच विकणे आहे. संपर्क–७०२८४१००२७

**नवीन डॅमेज** कुलर कमी किंमतीत मिळतील. सर्व ब्रॅण्डेड कंपन्यांचे (कमी स्टॉक) भारत इलेक्ट्रॉनिक्स, स्टेडियम गाळा नं. ११, इचलकरंजी ७५१७९६९६८०

**रो हाऊस** बंगला विकणे आहे– यड्राव फाटा म्हसोबा मंदिर पाठीमागे, गैबान रेसिडेन्सी. फोन–९२२६१०५४१०

**जवाहरनगर येथे** २१ एअरजेट लुम बसतील असे कारखाना शेड विकणे आहे. संपर्क–९८९०२२२५५२, ९७६५६५५७०५

**माणकापूर येथे** हुडा चौक महादेव मंदिराजवळ अंदाजे ८००० स्क्वे. फूट शेडसहित बिलींग विकणे आहे. संपर्क–९८२२०५८८९१

**15 KAV** किर्लोस्कर कं.चा २००५ मॉडेल चालू स्थितीतील जनरेटर विकणे आहे. मो. ९४२२४१३४३७

**कबनूर दत्तनगरमध्ये** ६ गुंठे, रामलिंग रोडलगत ४ एकर, कोरोचीमध्ये १०० गुंठे कलेक्टर एनए, तहसिलदार एनए, डांबरी रस्ता, गटार, टीपी ले आऊट, पाणी, लाईट, सोयीसह ८००, १०००, १५०० स्के. फुटाचे प्लॅट विकणे आहेत. संपर्क–८१४९९६५६९९, ९०२८७०७१०९

**सर्व कंपन्याचे** कुलर, फॅन, फ्रिज, एलईडी, टिव्ही, होमथिएटर, रिमोट स्वस्त मिळतील. भारत इलेक्ट्रॉनिक्स एसटी स्टॅंडजवळ, स्टेट बँकेसमोर, इचलकरंजी. फोन–७५१७९६९६८०

**विकणे आहे–** १३६० जागेमध्ये १० स्के. फूट शेड, २ रूम खोली व १ बीएचके सर्व सोयीनियुक्त शाहूनगर, गल्ली नं.९, चंदूर–७८२२९०१९८८

**२ बीएचके** डिसेंट फ्लॅट अर्जंट विकणे. लिफ्ट व पार्किंगची सोय. संपर्क– ९६७३२९९६५५, ७०३०७६००५६

**सुपारी कटिंग** मशिन करारासहित विकणे आहे. संपर्क–८७६७२२९७९३

**बोरगाव मिनी** टेक्स्टाईल पार्कमध्ये २ प्लॉट विकणे आहेत. संपर्क–९५९५२०४१४४

**For Sale-** 2BHK, Decent Renewed Flat at Kapad Market Housing Complex. Contact-9370134149

**कलेक्टर NA**प्लॉट विकणे जागा २४७६ स्के. फूट आहे. दर १५०० रू. स्के. फूट आहे. पत्ता– एकता कॉलनी, इस्कॉन टेम्पलजवळ, इचलकरंजी. ९८५०६१८०८३, ९६५७०२१२३४

**१ बीएचके** प्रशस्त फ्लॅट ६७५ स्के. फूट विकणे आहे. गावभाग, इचलकरंजी. फोन–९८५०११४२४९.

**घर विकणे आहे–** कबनूर. फोन–९९२१४८४९५३

**वाहन कर्ज –** बोलेरो, मॅक्सी, पिकअप, दोस्त, छोटा हत्ती, महिंद्रा जितो, सुपर कॅरीसाठी कर्ज उपलब्ध. मो. ८९७५७५२४९८.

**कार लोन –** जुन्या कारसाठी २०१२ पासून पुढील मॉडेल्सवर कमीत कमी कागदपत्रात कर्ज मंजूरी. मो. ८९७५७५२४९८.

### शैक्षणिक विषयक

**श्री साई स्वामी** मजले २ व्हीलर, ट्रेनिंग खास लेडीज/मुलींसाठी घरपोच सेवा (सुट्टीमध्ये–टू व्हिलर–फोर व्हिलर शिका) संपर्क–७०५८९९१५६३

**Tax Consulting** Course शिका Income Tax, GST Business Accounting, online ची सर्व कामे उत्तम मार्गदर्शन अनुभवी CA, CS द्वारा प्रशिक्षण सरकारी प्रमाणपत्र. संपर्क–८०१०२८०२७५

### * नोकरी विषयक *

**सेल्स एक्झीक्युटीव्ह** पाहिजे– टू व्हिलर गाड्यांच्या शोरूमकरीता सेल्स एक्झीक्युटीव्ह पाहिजे. शिकाऊ/अनुभवींना प्राधान्य. संपर्क–बोरगावे टीव्हीएस, शाहू पुतळाजवळ, इचलकरंजी

**लॉज कामासाठी** पार्ट टाईम/फुल टाईम मुले पाहिजेत. संपर्क–८६६८२१९७६३, ९८६०५७०४०४

**वॉशिंग व ग्रिसींगसाठी** अनुभवी कामगार पाहिजे. टू व्हिलर/फोर व्हिलर. संपर्क–९९२२४९९२३२

**मोफत संगणक** प्रशिक्षण– शिका कोणताही कोर्स केवळ ५०० रू. CCA, TALLY PRIME, BCA, DTP AUTOCAD, PROGRAMMING नोकरी व व्यवसायिक मार्गदर्शन शासनमान्य सर्टिफिकेट मर्यादित जागा. संपर्क–मॅडक्राफ्ट कॉम्प्युटर्स ८०१०२८०२७५

**ड्रायव्हर पाहिजे–** मोस्ट ड्रायव्हिंग ट्रेनिंग स्कूलकरीता पूर्णवेळ लेडीज क्लार्क पाहिजे. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. संपर्क– ओम मोटर ट्रेनिंग स्कूल, शाहू पुतळानजीक, इचलकरंजी.

**हॉस्टेलसाठी रेक्टर नेमणे आहेत.**

**श्री. ए. आर. तांबे सर संचलित, श्रद्धा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, इचलकरंजी मध्ये हॉस्टेल साठी पुरुष व महिला रेक्टर नेमणेचे आहेत. इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा.**

**रिक्रिएशन हॉल जवळ, गांधी पुतळा, इचलकरंजी.**

**संपर्क : 9175505557**

**अनुभवी वॉचमन** पाहिजे– समक्ष भेटा. बाळकृष्ण सायझिंग, गणेशनगर, ६ वी गल्ली, इचलकरंजी

**सेल्स मॅनेजर–** ग्रॅज्युएट किंवा एमबीए झालेला, सेल्समधील किमान २ ते ३ वर्षांचा अनुभव, उत्तम संभाषण कौशल्य असलेला नामवंत कंपनीमध्ये सेल्स मॅनेजर पाहिजे. संपर्क–९४२११०५४४४

**बॅटरी दुकानासाठी** कामगार पाहिजे. वय २० ते ३०, पगार–९०००/–, इचलकरंजी. मो. ९४२०४९३८३४

**कामगार पाहिजे–** रचना ॲल्युमिनीयम येथे ॲल्युमिनीयम वींडो तयार करण्यासाठी हेल्पर, कामाकरीता शिकाऊ, अनुभवी. संपर्क–९८८१६५८६९०

**पाहिजे–** कापड दुकानात कामासाठी शिकाऊ/अनुभवी सेल्समन पाहिजते. भेटा– सजावट, HDFC, बँकजवळ, राधाकृष्ण चौक, इचलकरंजी.

**पॅकिंग व हेल्पर** कामासाठी महिला कामगार त्वरीत भरणे आहे. संपर्क–माऊली गारमेंट, भोने माळ, इचलकरंजी. फोन. ९९७५२८२३७४, ९१५६०५७६२६

**पाहिजे–** रेडियम व बोर्ड कामासाठी दुकानात मुलगा पाहिजे. १० वी, १२ वी पास. शिवकुमार रेडियम आर्टस्, विक्रमनगर, इचलकरंजी.९७६३६०११७७

**नामांकित इंटरनॅशनल** स्कूल अतिग्रे येथे सिक्युरिटी सुपरवायझर व गार्ड त्वरीत नेमणे आहेत. रहाणे/जेवणाची सोय. संपर्क–८००३०९३७७१, ९९२२०३१६८३

**ग्रे पेढीवर डिस्पॅच,** स्टॉक इनवर्ड/आऊटवर्डसाठी कामगार अनुभवी दिवाणजी पाहिजे. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. संपर्क–९४२१०३७१०१

**हॉटेलमध्ये भांडीवाली** मावशी पाहिजे. दुपारी व संध्याकाळी. पत्ता–राजवाडा, सेवाभारती रोड, इचलकरंजी.९०७५८५८७९१

**VACANCY**for Male Freshers Graduate for Industrial oil Marketing. Gandhar Oil. Contact-9422043313. Salary+Incentive+Perks

**नाष्टा सेंटरसाठी** नवीन लोखंडी गाडा भाड्याने देणे व पार्टटाईम ५ ते १० प्लेट लावणेसाठी कामगार पाहिजे. संपर्क–९८८१४४७८०६

**सिक्युरिटी गार्डस** पाहिजेत– (डे/नाईट) १२ तास ड्युटी, आकर्षक पगार, शहापूर. संपर्क–९३०९१८१७७१

**प्रसिध्द केक शॉप** करीता सेल्सगर्ल/सेल्समन पाहिजे.कांऊटर व किचन को ऑर्डीनेटर कामाकरीता (पार्टटाईम संध्या. ५ ते १०) संपर्क–९७६४४६४७५५ (फोन वेळ–११ ते ६)

**बिन्स पॅराडाईस** कॉफी शॉपमध्ये अनुभवी हॉटेल मॅनेजमेंट कोर्स केलेला कामगार पाहिजे. संपर्क–९०२१००८७३१, ८६००६४३१०२

**घोडावत पेट्रोल** पंप, मजले (हातकणंगले) येथे कॅशियर व ऑफिसबॉय पाहिजे. संपर्क–८६५७७५३३३३

**जयसिंगपूर येथील** ओल्ड मुंबई आईस्क्रीममध्ये शॉपमध्ये कामाकरीता जेंटस/लेडीज पाहिजेत. संपर्क–८६५७७५३३३३

**भेळशॉपमध्ये** भेळ बनवणेचे कामाकरीता जेंटस/लेडीज पाहिजे. संपर्क–८६५७७५३३३३, घोडावत पेट्रोल पंप, मजले (हातकणंगले)

**अकौटंट पाहिजे–** टॅली ईआरपी अनुभव आवश्यक लेडीज/जेन्टस फुल टाईम. संपर्क–९४२११००५५५

**पाहिजेत–** स्पिनिंग मिल युनिटसाठी एचआर आणि सुपरवायझर पदासाठी जागा भरणे आहे. इचलकरंजीपासून ठराविक अंतरावर. संपर्क–९९७०७०७०७३

**ऑफिस कामासाठी** मुलगी पाहिजे. कॉम्प्युटर नॉलेज. संपूर्ण आवश्यक भेटण्याची वेळ स. १० ते ६.००. ९१३०६९००१०

**वेटर पाहिजेत–** बारमध्ये वेटर पाहिजेत. आकर्षक पगार दिला जाईल. पत्ता–हॉटेल समाधान (बार) सावली सोसायटी पाठीमागील रोड,शहापूर. मो. ७९७२१८३६२९

**अनुभवी ॲटो** गाडीवर ड्रायव्हर पाहिजे. संपर्क–९५५२०८३८९६, ८८०५२४२६७८

**डोअर्स आणि विंडोच्या** मार्केटिंगसाठी सेल्स एक्झीक्युटीव्ह नेमणे आहे. आकर्षक पगार, फंड, इएसआयसीची सोय. संपर्क–९३२२९५०१८८, ९२०९७७१२७७

**Mechanical Design** Engineer Required- Iti Draftsman/diploma/b.e. Mech. Fresher/experienced In Fixture Design/spm Design. Carlinetechnologeis @gmail.com 8087870870

**कामगार पाहिजे–** १२ माग, १२ तास मलमल विलायती क्वालिटीवर पाळी करणेसाठी तसेच ५० मागासाठी अनुभवी जॉबर पाहिजे. संपर्क–डी–मार्टमागे. ८००७७०९२२३, ९९२१५५११५९

**होलसेल किराणा** दुकानात कामगार पाहिजे. संपर्क– संस्कार ट्रेडर्स. ९९७५२३४५५१, ९८६०८०७५५८

**चप्पल दुकानात** जेंटस कामगार पाहिजे. न्यु बालाजी शु वर्ल्ड, हरमनचहा शेजारी, गांधी पुतळा, इचलकरंजी.८७८८६४०५६०

**अनुभवी ''सेल्स एक्झीक्युटिव्ह''** नेमणे आहेत. पत्ता–पार्वती इंडस्ट्रियल इस्टेट, यड्राव, इचलकरंजी. ९९२३०३४००६, ८२०८६३७७४६

**पाहिजेत–** मंडप डेकोरेशन शोरूम कामासाठी स्टोअर किपर व हेल्पर पाहिजे. गोकूळ टेंट सप्लायर, इचलकरंजी. ९३६००४०६००

**शै. क्षेत्रात काम** करणेसाठी मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह पाहिजेत. पार्टटाईम (फुलटाईम) कामाची वेळ ४ ते ९, पगार–१००००+इन्सेन्टीव. मो. ९९२२३१४३०९, ९१७५७४४३०६

**नामांकित कंपनीत** कामगार भरती वेल्डर, फिटर, हेल्पर त्वरीत भरणे आहे. SIT Collage जवळ, इचलकरंजी. मो.नं. ८२६५०७४४९७, ९८६०१६१४४८

**कुशन कामासाठी** कारागीर पाहिजे. सोफा, चेअर, यांचे कुशन करण्यासाठी अनुभवी व शिकाऊ कारागीर पाहिजे. वर्षभर अंगावर कामाची खात्री. ESI-PF सुविधा उपलब्ध. संपर्क– विनसर वर्क, जवाहरनगर, इचलकरंजी. ९८२२५४३९४३

**नामांकित कंपनीसाठी** मार्केटिंग प्रतिनिधी पाहिजे. संपर्क–९५५२७३७०६४

**कॉम्प्युटर ऑपरेटर** पाहिजे– मराठी, इंग्रजी टायपिंग येणारे. संपर्क–९५५२७३७०६४

**डाईंग/शर्टींग** गोडावूनसाठी अनुभवी दिवाणजी पाहिजे. संपर्क–७०३०००८८८९

**कॉम्प्युटर ऑपरेटर** पाहिजे– गरजू, प्रामाणिक, फक्त बिलींगकरीता. संपर्क–बाळासाहेब पु. वडगावे, सोनपावली मारूती मंदिरजवळ, सुतारमळा, चौक–इचलकरंजी

**मेडीकल्समध्ये** अनुभवी व शिकाऊ मुले व मुली पाहिजेत. मो.९८६०८२४६३५

**पाहिजेत–** इचलकरंजीस्थित नामांकित कंपनीत १. ड्रायव्हर ट्रान्सपोर्ट लायसन्सधारक २. लोडर १०वी/१२ वी पास/नापास ३. हाऊस किपिंगसाठी (स्त्री/पुरूष) शिक्षणाची अट नाही. नियमानुसार पगार, दुप्पट ओव्हर टाईम, पीएफ, ईएसआयसीचा लाभ व इतर लाभ संपर्क–७७६७८१४३०७, ९६८९१७५११०

**एअर कंडिशनर** आणि कोल्ड स्टोरेज मेंटेनन्स व इंस्टॉलेशन कामासाठी शिकावू व होतकरू मुले पाहिजेत. संपर्क–९६५७००७८६९७

**व्हीएमसी** ऑपरेटर पाहिजे. आकर्षक पगार. संपर्क– जयटेक इंजिनिअर, गणेशनगर, ७ वी गल्ली. मो. ९४२३०४१०२०, ९४२१२०६४४४

**रेडीमेड कपड्याच्या** दुकानमध्ये हुशार गरजू सेल्समन पाहिजे. संपर्क– श्री नटराज ड्रेसेस, १४, शॉपिंग सेंटर, इचलकरंजी–८५५२००३२६४

**मेडिकलमध्ये विवाहीत** लेडीज/जेंटस फार्मासिस्ट पाहिजे. संपर्क–दि सुखरूप औषधालय, उत्तम–प्रकाश टॉकीजजवळ, इचलकरंजी. मो. ९७३००८६०००

**दिवाणजी पाहिजे–** धर्मनगर, निमशिरगाव फाटा येथील फॅक्टरीमध्ये दिवाणजी पाहिजे. परिसरातील लोकांना प्राधान्य. संपर्क–९८२३६९९६९६

**सेल्समन मुले व महिला** (विवाहीत) पाहिजेत. शोरूमध्ये कामासाठी वेळ सकाळी ९.३० ते ७.३० पगार व इन्सेटिव्ह १२०००+ भेटा. सुशीतो इंटरप्राईजेस, कोल्हापूर रोड, मॉडर्न हायस्कूलसमोर, इचलकरंजी. फोन.८४८४९६३०४०

**विजय कृषी अवजारे** या नामांकित कंपनीमध्ये मार्केटींग इक्झीक्युटीव्ह या पदाकरीता उमेदवार भरणेचे आहेत. जागा ४, महाराष्ट्र, कर्नाटक, ओडिसा आणि तेलंगणा अनुभवी व्यक्तीस प्राधान्य. संपर्क–९०११९५३०२५, ९६५७७२१२२८

**पाहिजेत–** इचलकरंजीस्थित नामांकित बेकरीकरीता १) टेलिफोन ऑपरेटर/ऑर्डर घेणेसाठी १२ वी/पदवीधर+बेसिक कॉम्प्युटर ज्ञान पुरूष/महिला ३) हाऊसकिपींगसाठी पुरूष/महिला शिक्षणाची अट नाही. संपर्क–९६९९०१७८४९, ७७६७९०६३६३

**पेट्रोल पंपावर** शिकाऊ/अनुभवी जेंटस/लेडीज कामगार पाहिजेत. संपर्क–८०८७०४१००१, ८०५५१४२८८८

**कबनूर येथे** हॉटेलमध्ये कामासाठी रोटीवाला पाहिजे. संपर्क–८३२९९११५२४

**कामगार पाहिजेत**–लेडीज/जेंटस पत्ता–मेट्रो इंड. पार्वती इंड. इस्टेट, यड्राव–७८८८००६४०६

**प्लास्टिक कंपनीत** १२ तास कामासाठी हेल्पर कामगार पाहिजे. विक्रमनगर, इचलकरंजी. संपर्क–कांबुरे प्लास्टिक–८३८०८०६८६८

### * भाड्याने देणे *

**३ बेडरूम हॉल** किचन सर्व सोयीनियक्त गहाणवट देणे आहे. बंडगर माळ परिसर. संपर्क–८९९९९२७७२७

**महासत्ता चौकापासून** जवळ शांत व प्रसन्न वातावरणतील १ RK रूम भाड्याने देणेचे आहे. संपर्क– श्री. सहदेव कदम (सर) आमराई रोड, शिक्षक कॉलनी. मो. ७६२०३४१८४२, ७६२०३५१०९८

**घर भाड्याने देणे–** १ बीएचके हेड पोस्ट ऑफिससमोर, पोवार गल्ली, म्हसोबा मंदिरशेजारी, इचलकरंजी. ८०८७६३२७६२

**नवीन दुकानगाळा** प्रशस्त, मोक्याच्या जागी शोरूमकरिता भाड्याने देणे. (१२ ३७ फूट) मेन रोड, सांगली नाक्याजवळ, इचलकरंजी. ९८२२६६९८८९, ९४२३८६०१०५

**सिंगल व डबलरूम** भाड्याने देणे आहे. थोरात चौक व कबनूर परिसर. संपर्क–९८५०६१५७२९, ९५९५९९२५९९

**रविंद्रनाथ टागोर** वाचनालयासमोर विकली मार्केटजवळ ४०० स्क्वे. फुटाचा गाळा तसेच दुसऱ्या मजल्यावरील १००० स्क्वे. फुटाचा हॉल भाड्याने देणे. संपर्क–९८९०६७५३८८,९९७०६४७९२४

**भाड्याने देणे–** सर्वसोयीनियुक्त १ बीएचके (शाकाहारी कुटूंबासाठी) व सिंगल रूम (विद्यार्थी व नोकरदारांसाठी) राजराजेश्वरी नगर, इचलकरंजी. ९६५७८३३९४९, ९३२५४३०८८३

**रूम भाड्याने देणे–** १ बीएचके सर्व सोयीनियुक्त, भारतमाता हौसिंग सोसायटी, पंचगंगा पेट्रोल पंपासमोर, इचलकरंजी. फोन–७५८८९५३८५१

**२ बीएचके–** आरसीसी घर फोर व्हीलर पार्कींगसह रहाणेसाठी/व्यवसायासाठी भाड्याने देणे. संपर्क–सांगली मळा, आमराई रोड, इचलकरंजी. फोन–९४२१२०७३१३, ९०२८४८०८३६

**संगमनगर, तारदाळ** रोडटच १००० स्के. फूट गोडावून भाड्याने देणे आहे. तसेच १२० स्के. फूट दुकानगाळा भाड्याने देणे आहे व १ रूम किचन एटॅच संडास, बाथरूम सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. संपर्क– ८६६८८४१३५६

**दुकानगाळा भाड्याने** देणे– रिंग रोड, कलानगर, राधाकृष्ण अपार्टमेंट, पोलिस कॉलनीसमोर, इचलकरंजी. ९०११४४२०८३

**चौकातील आरसीसी** दुकानगाळे त्वरीत भाड्याने देणे. भोने माळ, इचलकरंजी. फोन–९११५६५६९७३९, ७०५७५८२९६३

**शेड भाड्याने देणे–** २५X७०, १० एचपी इंडस्ट्रीयल लाईट, डेक्कन मिल, व्यंकटेश कॉलनीजवळ, जवाहरनगर, इचलकरंजी. ९७६४४०५८८९

**भाड्याने देणे–** मध्यवस्तीमध्ये वेताळ मंदिरजवळ, २ रे मजल्यावरती किचन हॉल, बेडरूम स्के. सोयीनियुक्त भाड्याने देणे. टीडी कुंभार, इचलकरंजी. ७०२०७०२१४९

**दुकानगाळा** भाड्याने देणे– टिळक रोड, गुजरी कॉर्नर, इचलकरंजी. संपर्क–गाताडे ९७६२८१५३५८

**कापड मार्केट** परिसरात विद्यार्थ्यांच्या अभ्यासिकेसाठी १००० स्के. फूट हॉलची आवश्यकता आहे. आरसीसी बांधकाम, पार्किंगची सुविधा आवश्यक. संपर्क–९६२३६५४१२७

**गांधी कॅम्प पद्माकर** कोल्ड्रींकशेजारी १४०० स्के. फूटाचे ३ गाळे बँक पतसंस्था, ऑफिससाठी भाड्याने देणे आहे. संपर्क–९४२२५८१६३२, ९११२६९०५७०

**घर भाड्याने देणे–** मध्यवस्तीत आरसीसी २ रूम सर्वसोयीनीयुक्त इंदिरा हौसिंग सोसायटीमध्ये कबनूर. संपर्क–९४२३२८४७८३

**आरसीसी गाळा** भाड्याने देणे आहे–पत्ता–जुना डॉ. अरूण पाटील हॉस्पिटलशेजारी, स्वामी अपार्टमेंट रोड, (मेन रोड) इचलकरंजी. फोन–७७६८९९११२३, ९०२२२५६६८७

**२५०० स्क्वे.** फूटाची आरसीसी शेड भाड्याने देणे. २ ऑफिस बोअरची सोय. संपर्क–८६००८८०८९२

**५१X३०** चे शेड भाड्याने देणे आहे. लोकमान्यनगर कोरोची. संपर्क–९४२२८८५७२८, ९०२२०३३२७४

**सरस्वती हायस्कूलजवळ** २ बीएचके घर शाकाहारी कुटूंबासाठी भाड्याने देणे आहे. तसेच तारदाळ येथे प्राईडजवळ ८४०० फूट बिगरशेती प्लॉट विकणे आहे. संपर्क–७०२०३११०५०

**भाड्याने देणे–** ४७X५५ चे आरसीसी शेड सर्वसोयीनियुक्त १९ एचपी लाईटसह खंजीरे इस्टेट, पाण्याच्या टाकीजवळ, इचल. ८८८८९९७९७६, ९८५०९०९१४६

**भाड्याने देणे–** सरस्वती को.ऑप हौसिंग सोसायटीमधील २ बीएचके भाड्याने देणे आहे. जवाहरनगर हायस्कूलजवळ, इचलकरंजी. ८४११०३७२५५

**आरसीसी रूम** भाड्याने देणे/विकणे सिध्दीविनायक हॉलजवळ, लक्ष्मीमंदिर रोड, नदीवेस, इचलकरंजी.९७६५०२३०५४, ८६२६०४२५२५

**मेनरोड जनता** बँकरोडवर पतसंस्था इन्सुरन्स, क्लासेससाठी, डॉक्टरांसाठी १००० फूट हॉल भाड्याने देणे–९३२६६९७७३५, ९०९६३३४००५

**भाड्याने देणे**– लहान कुटूंबासाठी आरसीसी २ रूम भाड्याने देणे. कोल्हापूर रोड, भाजी मार्केटसमोर, नारळ चौक, इचलकरंजी. मो. ९८५०४४९२८४, ८४२१७६३७०८

**१ बीएचके** फ्लॅट भाड्याने देणे–सर्वसोयीनियुक्त इचलकरंजी शहराच्या मध्यवस्तीत, ॲकॅडमीची मुले–पालक/सरकारी नोकरदारांसाठी. संपर्क–७०२०१८२३३१

**२४ तास पाणी,** डबल रूम भाड्याने – २०००/–, २५००/– कोल्हापूर रोड, रूई फाट्याजवळ, कबनूर–९६२३४२८०२५

**शहापूर परिसरात** २ बीएचके घर पाहिजे. फॅमिलीसाठी सर्वसोयीनियुक्त भाड्याने किंवा गहाणवट. संपर्क–९३७२३३०१७१

**गोडावून भाड्याने** पाहिजे. स्टॅंडपासून अंदाजे १ किमी. एरियामध्ये २००० ते २५०० स्क्वे. फूट जागा पाहिजे. ९४२११०५४४४

**भाड्याने देणे–** जनता बँकेपासून जवळ मेनरोडवर १ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे. सेकंड फ्लोअर, नवनाळे बिल्डींग, संपर्क–८६२४८३४९१२

**सर्व सोयीनियुक्त** १ बीएचके घर फॅमिली विद्यार्थीसाठी भाड्याने देणे. ८७८८६७०००२. सांगली रोड, जयदत्त ग्लासजवळ, इचलकरंजी.

**२५० स्क्वे.** फूट आरसीसी फुल फर्निश्ड गाळा भाड्याने देणे. कापड मार्केट हौसिंग सोसायटीसमोर, व्यंकटेश्वरा बँकेलगत, राधाकृष्ण चौक, इचलकरंजी.७२४९४९३०९९

**प्राईम लोकेशन** शोरूमकरीता दुकानगाळे भाड्याने देणे. शरद कॉलेजजवळ, इचलकरंजी. ९८५०६१८०८३, ९६५७०२१२३४

**२ बीएचके** २ फ्लॅट भाड्याने देणे– ११ वी, १२ व अकॅडमी मुलांकरीता शाहू कॉर्नर. संपर्क–९४२०४३२७७७

**सर्व सोयीनियुक्त** शेड भाड्याने मिळेल. कोल्हापूर रोड, व्यंकटेश्वरा इंग्लिश स्कूलमागे, पाटील मळा, कबनूर. संपर्क–९४२०४५४२२२

**विकली मार्केटसमोर** इचलकरंजी येथे आरसीसी गाळा ऑफिस, पतसंस्था फायनान्स कंपनी,मेडिकल लॅब इ. साठी भाड्याने देणे आहे. संपर्क–९१७५७८८३९६, ९०९६३३०३७५

**१० X १५** आरसीसी गाळा भाड्याने देणे व सिंगल रूम सर्वसोयीनियुक्त भाड्याने देणे. संपर्क–९९७०२५००८५, शांतीनगर, इचलकरंजी

**१७०० स्क्वे.** फूट आरसीसी सर्वसोयीनियुक्त गोडावून जनता बँकेजवळ भाड्याने देणे. संपर्क–९८९०९०९८००

### विवाह विषयक

**''सप्तपदी''** वधु–वर सुचक केंद्र'' सर्व जातीचे प्रथम, घटस्फोटीत, विधूर, विधवा स्थळे उपलब्ध. मोफत नाव नोंदणी. मो. ९११६३००८९०

### बोअरवेल विषयक

**श्री साई बोअरवेल–** ५'' व ६॥'' बोअर योग्य व खात्रीशीर दरात मारून मिळेल. संपर्क–९८८१३५५८१३, ९९२२७७२०३६

### व्यवसाय

**शेअर मार्केट–** बेसिक्स, इंट्राडे, ऑप्शन सोप्या पध्दतीने व परफेक्ट स्ट्रॅटेजीने शिका. प्रॉफिट फर्स्ट, कल्पना टॉकिजसमोर. मो. ९६६५४०८८२८, ७७६८९५००२१

### यात्रासहल विषयक

**गार्गी टुरिजम–** २१/०५ काशी, अयोध्या, दिल्ली, आग्रा, वैष्णोदेवी, अमृतसरसह उत्तर भारत, २५/०५, चारधाम यात्रासह दक्षिणभारत, नेपाळ, ९५४५२६४२४९, ८१८००००१३८

**१४ मे** काशी, अयोध्या, प्रयाग, सहा ज्योतिर्लिंग, प्रवास १२ दिवस दि.१० जुलै अमरनाथ, काश्मीर, वैष्णोदेवी. १८ दिवस बसने. ९४२०५९२५२४, ९४०३९५३४१२

**राधिका ट्रॅव्हल्स** इचलकरंजी अष्टविनायक दर्शन दि.२८/५/२४ मो. ९८५०४२७५४२

### * आरोग्य विषयक *

**सर्टिफाईड योगा** थेरपिस्ट (सात्वीक आहारतज्ञ) कडून वैयक्तिक योगा व कार्डीओ क्लासेस घेतली जातील. संपर्क–८००७०२९९६८

### * कर्ज विषयक *

**बालाजी कन्स्ट्रक्शन–** सर्व प्रकारचे प्लेन बांधकाम सहीत कर्ज प्रकरणे करू. संपर्क–९५१८७९४१४९

**एलआयसी** हाऊसिंग तुमचे होम लोन साकार करेल. तुमच्या स्वप्नातील घरासाठी तुम्ही आम्हाला संपर्क करा. ९१३०८१३७२०, ७०५८५८३७२०.

**होमलोन, मॉर्गेजलोन,** पत्रा प्रॉपर्टी, बिझनेस लोन सिबील प्रॉब्लेम असेल तरी लोन मिळेल. संपर्क–९५११९२६०९०

**शेती तारण–२** एकर पुढे शेतीवर कर्ज ५ लाखा पर्यंत कर्ज मिळेल. डेअरी दूध विक्रीवर कर्ज मिळेल. ९५९५९१९६२५

**१० लाख** ते ५ कोटी पर्यंतचे कर्ज त्वरीत मिळेल. तसेच दुकानदार व्यापारीकरीता पिग्मीवर लोन मिळेल. संपर्क–७७६७९०७२४२

**पर्सनल,होम,मॉर्गेज,** पर्चेस प्रापर्टी, गोठा प्रकल्प, शेळी पालन, गावठाण प्रॉपर्टी, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, असेसमेंट उतारा, प्लॉट, बीटी, टॉप अप, सर्व प्रकारचे व्हेईकल लोन, प्रोजेक्ट लोन (CMEGP व PMEGP) त्वरीत कर्जमंजुरी व मार्गदर्शन भेटा. के.जी.एन. फायनान्स. मो. ८३२९९२२४४१

**सर्व बिझनेस** धारकांना बिजनेस वाढवण्यासाठी तसेच बँकेत पगार जमा धारकांना १ ते ३० लाखापर्यंत विनातारण कर्ज मिळेल. ९५९५९१९६२५, ९१३०६९००१०


### वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी–विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे–घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी.

व्यवस्थापक



# भाजपला मतदान करून मोदींचे हात बळकट करा : आम.जोल्ले

निपाणी.ता.४ (प्रतिनिधी)

**भाजपची विकासवादी राजवट सहन न करणाऱ्या कॉंग्रेसने राज्य आणि देशाला दिवाळखोरीकडे नेण्याचा प्रयत्न केला आहे.देशाच्या विकासासाठी, सुरक्षा आणि अखंडतेसाठी येत्या निवडणुकीत भाजपला मतदान करून पंतप्रधान मोदींचे हात बळकट करूया, असे अवाहन आम.शशिकला जोल्ले यांनी केले.**

७ मे रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी आमदार शशिकला जोल्ले यांनी भारतीय जनता पक्षाचे उमेदवार अण्णासाहेब जोल्ला यांच्यासाठी निपाणी मतदारसंघातील भिवशी, सौंदलगा, नागनूर, यमगरणी, बुदिहाळ,कोडणी, गायकवाडी येथे प्रचार सभा घेतली.त्याप्रसंगी त्या बोलत होत्या.

आम.जोल्ले पुढे म्हणाल्या, भाजपच्या १० वर्षांच्या राजवटीत पंतप्रधान मोदींनी भारतीयांना कौतुकास्पद असे प्रशासन दिले आहे. भारताला जागतिक नेता बनवण्यात पंतप्रधान मोदींचे योगदान मोठे आहे. शेतकऱ्यांच्या दुरवस्थेला उत्तर देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारने किसान सन्मान निधी योजनेतून वार्षिक सहा हजार दिले, तर येडियुरप्पा मुख्यमंत्री असताना राज्य सरकार चार हजार देत असे. मात्र, कॉंग्रेसची सत्ता येताच शेतकऱ्यांचा ४ हजार बंद केले. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर पंतप्रधान मोदींनी अयोध्येत भव्य श्री राममंदिर उभारून हिंदू समाजाचा सन्मान राखला आहे. अनेक वर्षांपासून भेडसावलेल्या देशातील अनेक समस्या मोदींच्या कारभारात सुटल्या असून, जलजीवन मशिनद्वारे प्रत्येक घरापर्यंत पाणी पोहोचवले जात आहे. उज्वला योजनेंतर्गत सुमारे १३ कोटी गरीब कुटुंबांना मोफत गॅस सिलिंडर देण्यात आले आहेत. मोफत आरोग्यसेवा, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण इत्यादी विकास प्रकल्पांसह देशाला बळकट करत आहेत.

यावेळी सुनील पाटील, शिवाजी परीट, वैभव पाटील, धीरज परीट, नितीन परीट, सुरज परीट, दिपक पाटील, बाळासो बन्ने, राणी परीट, गीता पाटील, मंगला परीट, स्थानिक नेते, मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.




# विरोधकांकडून दिशाभूल करण्याचा प्रकार–मुश्रीफ

कुरुंदवाड, ता.४

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हातातच देश सुरक्षित असून चौफेर प्रगती साधत आहे.विरोधकाकडे मुद्दाच नसल्याने संविधान बदलणार लोकशाही संपणार अशी दिशाभूलीचे व संभ्रमाचे वातावरण पसरविण्यात येत असल्याची टीका पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी केली.**

महायुतीचे उमेदवार धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते.आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर, डॉ.संजय पाटील, राहुल आवाडे रजनीताई मगदुम प्रमुख उपस्थित होते.

मुश्रीफ म्हणाले, डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी देशातील जातीय व्यवस्था व सामाजिक स्थितीचा अभ्यास करुन घटना लिहीली आहे कुणीही घटना बदलू शकणार नाही.त्यामुळे अस्वस्थ व्हायची गरज नाही. हातकणंगले लोकसभा मतदार संघातून खासदार धैर्यशील माने यांना विजयी करा. ते तरुण आणि उमदे आहेत. त्यांनी अतिशय चांगले काम केले आहे.पुन्हा एकदा त्यांना संधी द्या ते आपले कर्तृत्व सिध्द करतील.

आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर म्हणाले,कॉंग्रेसला जे ४०–४५ वर्षात जे जमले नाही ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी करुन दाखवले आहे. देशातील ८० कोटी जनतेला ३ किलो गहू, २ किलो तांदूळ प्रतिव्यक्ती मोफत देण्याचा निर्णय घेतला. ६ जिन्नस १०० रुपयात देण्याचाही निर्णय झाला. शेतकऱ्यांना वर्षाला ६ हजार देण्याची भूमिका घेतली आणि राज्य सरकार ६ हजार रु. देत आहे. त्यातून दलित, मुस्लिम यांना वगळले नाही हे लक्षात घ्या.संविधान लोकशाही राज्यघटना याबाबत समाजात जातीधर्मात तेढ होईल असे वातावरण पसरविले जात आहे.घटनेला नखही लागणार नाही याची खात्री मला व मुश्रीफसाहेबांना आहे.त्यामुळे दलित मुस्लीम इतर मागासवर्गीयांनी घाबरायचं नाही.धैर्यशील माने यांना प्रचंड मताधिक्क्याने निवडून द्या.पंतप्रधान मोदींचे हात बळकट करा. मयुरचे अध्यक्ष संजय पाटील ,युवा नेते राहुल आवाडे, रजनीताई मगदुम यांची भाषणे झाली.भाजप नेते रामचंद्र डांगे यांनी शहरातून धैर्यशील माने यांना मोठे मताधिक्य देण्याचा निर्धार व्यक्त करतानाच खासदार निधी व आमदार निधीतून झालेल्या कोट्यावधीच्या कामाचा आढावा घेतला.माजी नगराध्यक्ष दादासाहेब पाटील, उदय डांगे,चंद्रकांत मोरे,अली पठाण रघु नाईक यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.शरद आलासे यांनी आभार मानले.

# दोडला डेअरीकडून दूध दरात फसवणूक चौकशीची मागणी

पंढरपूर,ता.४(प्रतिनिधी)

**पंढरपूर तालुक्यातील आढीव परिसरातील पंढरपूर–कुर्डूवाडी रस्त्यावरील दोडला दूध डेअरीकडून तालुक्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांची शासनाच्या दूध अनुदानामध्ये फसवणूक झाली असून प्रत्येक शेतकऱ्यांचे प्रती लिटर आठ रुपयाचे नुकसान झाले आहे. गेल्या तीन महिन्यापासून शेतकऱ्यांची लूट सुरू असून, याप्रकरणी दूध उत्पादक शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतल्याचे दिसून आले.**

पंढरपूर तालुक्यातील लक्ष्मी टाकळी परिसरातील सुमारे ५०० शेतकऱ्यांनी, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख महेश साठे, सरपंच संजय साठे यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी येथील दोडला डेअरीमध्ये जाऊन दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या फसवणुकीबाबत विचारणा करत त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आक्रमक भूमिका घेतली यावेळी तालुकाध्यक्ष शिवाजी बाबर व दूध उत्पादक शेतकरी उपस्थित होते. दूध दरावरून दूध उत्पादक शेतकऱ्यांना जर दोडला कंपनी वेठीस धरत असेल तर पंढरपुरातच काय महाराष्ट्रात या कंपन्या चालू देणार नाही. शासनाच्या नियमाप्रमाणे अनुदान न मिळाल्यास यांच्यावर कायदेशीर गुन्हे दाखल करू असा इशाराही महेश साठे यांनी दिला.

## मणेरे चॅरिटेबल ट्रस्टतर्फे महाराष्ट्र, कामगार दिन साजरा

इचलकरंजी,ता.४-

**श्री. डी.ए. मणेरे चॅरिटेबल ट्रस्ट संचलित सौ. कुसुमताई बाल मंदिर, प्राथमिक विद्या मंदिर व मणेरे हायस्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेज इचलकरंजी यांचे संयुक्त विद्यमाने विद्यालयाच्या प्रागंणात महाराष्ट्र व कामगार दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.**



यावेळी या कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक सुधाकरराव मणेरे, संस्थेचे उपाध्यक्ष सुभाष केटकाळे व संस्थेचे समन्वयक अशोक वसगडे, हायस्कूल व कॉलेज प्रा.सौ.वैशाली मंगसुळे, प्राथमिक मुख्याध्यापिका सौ. पुष्पा ऐनापुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरूवात ध्वजपूजन व ध्वजारोहण करून झाली. कार्यक्रमास सूत्रसंचालन सौ. सुमन पाटील व आभार कु.संगीता कुंभार यांनी केले. कार्यक्रमास हायस्कूल व कॉलेज प्राचार्या सौ. वैशाली मंगसुळे, प्राथमिक मुख्याध्यापिका सौ. पुष्पा ऐनापुरे,विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी व पालक उपस्थित होते.

## शेतकऱ्यांच्या श्रमाचे व कामगारांच्या एकजुटीचे 'गोकुळ' प्रतिक-डॉ.शिंदे

कोल्हापूर,ता.४(प्रतिनिधी)-

**गोकुळ दूध संघ शेतकऱ्यांच्या श्रमाचे आणि कामगारांच्या एकजुटीचे प्रतिक आहे, असे उद्‌गार शिवाजी विद्यापीठाचे मराठी अभ्यास मंडळाचे व आयटकचे सदस्य कॉ.डॉ.अरुण शिंदे यांनी काढले.**

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संघ कामगार संघटना आणि संघ व्यवस्थापन यांच्या संयुक्त विद्यमाने गोकुळ प्रकल्प स्थळी कामगार दिन व महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहूणे कॉ. डॉ.अरुण शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी गोकुळचे चेअरमन अरुण डोंगळे उपस्थित होते.यावेळी संघाचे चेअरमन अरुण डोंगळे म्हणाले की, एखादी संस्था प्रगती पथावरती नेण्यासाठी त्या संस्थेच्या कर्मचाऱ्याचे योगदान फार महत्वाचे असते. तेथील कुशल कर्मचारी यांच्यामुळे संस्था बळकट होत असते. चेअरमन यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाचे मराठी अभ्यास मंडळाचे व आयटकचे सदस्य डॉ.अरुण शिंदे यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास योगेश गोडबोले, बोर्ड सेक्रेटरी प्रदीप पाटील,अनिल चौधरी,रामकृष्ण पाटील,जगदीश पाटील, हिमांशू कापडिया, हणमंत पाटील,सदाशिव निकम, मल्हार पाटील, व्ही. डी. पाटील, कॉ लक्ष्मण पाटील, कॉ.दत्ता बच्चे, कॉ.संभाजी शेलार, संघाचे अधिकारी व कर्मचारी आदि उपस्थित होते.

## अंकुश थाटे यांना पीएचडी प्रदान

मिरज,ता.४(प्रतिनिधी)-

**मिरज महाविद्यालयामधील रसायनशास्त्र विभागाकडील सहाय्यक प्राध्यापक अंकुश गौतम थाटे यांना शिवाजी विद्यापीठाने पीएचडी पदवी प्रदान केली.**



थाटे यांनी फॅब्रिकेशन ऑफ डाय सेन्सिटाईज्ड टिटॅनियम डायऑक्साईड-झिंक ऑक्साईड नॅनोस्ट्रक्चर फॉर सोलर इनर्जी हार्वेस्टींग या विषयामध्ये शोधप्रबंध सादर केला होता. त्यांच्या या विषयाकडे वर्तमान गरज म्हणून पाहिले जाते. त्याकरिता त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. यशवंत शिक्षण संस्थेचे चेअरमन, महाविद्यालयाचे प्राचार्य, महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर सेवक तसेच विद्यार्थी वर्गातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## यादव महाराज मठात पारायण सोहळ्याचे आयोजन

कोल्हापूर,ता.४(प्रतिनिधी)-

**श्री सद्‌गुरु रामचंद्र महाराज यादव यांची ४७ वी पुण्यतिथी व श्री गुरु भानुदास महाराज यादव यांच्या तृतीय पुण्यतिथीनिमित्त ता.९ ते ता.१५ मे २०२४ अखेर शिवाजी पेठेतील यादव महाराज मठात श्री ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, प्रवचन, कीर्तन, काकडा, भजन आदी कार्यक्रमांचे आयोजन केले असल्याची माहिती हभप महादेव महाराज यादव यांनी दिली.**

या सोहळ्यामध्ये महाराष्ट्रातील नामवंत प्रवचनकार, कीर्तनकार यांची किर्तन होतील. यामध्ये ता.१४ मे रोजी भव्य दिंडी नगरप्रदक्षिणा सायंकाळी ४ वाजता,ता.१५ मे रोजी सकाळी ८ वाजता श्री ज्ञानेश्वरी पारायण सांगता व १० वाजता ताराबाई रोड ज्योतिबा मंदिर, भवानी मंडप येथे मोठा गोल रिंगण होईल. जुना राजवाडा, बिनखांबी गणेश मंदिर,अर्धा शिवाजी पुतळा, उभा मारुती चौक येथून श्री ज्ञानदेव सदन येथे येईल. निवृत्ती महाराज नामदास संत शिरोमणी नामदेव महाराज यांचे विद्यमान १७ वे वंशज पंढरपूर यांचे काल्याचे किर्तन होईल, यावेळी हभप विठ्ठल काका पाटील अध्यक्ष वारकरी साहित्य परिषद यांची उपस्थिती राहील. या श्री ज्ञानेश्वरी पारायणासाठी भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# शिरोळ तालुक्यात २९३ मतदान केंद्रावर १७५८ कर्मचाऱ्यांची नियुक्ती

### ३ लाख १७ हजार ४९० मतदार बजावणार मतदानाचा हक्क

शिरोळ,ता.४(प्रतिनिधी)-

**लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिरोळ तालुक्यात २९३ मतदान केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. यासाठी १७५८ अधिकारी व कर्मचारी तसेच ३६ झोनल अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.**

शिरोळ तहसील कार्यालयात सीयु - ४१५, बीयु - ७१५ व व्हीई पॅड ३९९ इतके मशीन दाखल झाले असून ते सीलबंद अवस्थेत पोलिसांच्या बंदोबस्तात ठेवण्यात आले आहेत. एकूणच तालुक्यात १ लाख ५८ हजार १५८ पुरुष मतदार तर १ लाख ५८ हजार ६२८ महिला मतदार मिळून ३ लाख १७ हजार ४९० मतदार ७ रोजी होणाऱ्या मतदानामध्ये आपला हक्क बजावणार आहेत. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मोहिनी चव्हाण व



अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अनिलकुमार हेळकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे.

शिरोळ तालुक्यामध्ये ५४ गावांचा समावेश आहे. निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी गेल्या आठ दिवसापासून आंध्रप्रदेश राज्यातील ९६ पोलिसांचे पथक शिरोळ मध्ये दाखल झाले आहेत. याचबरोबर २९३ मतदान केंद्रासाठी १७५८ अधिकारी व कर्मचारी तसेच ३६ झोनल अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. ६ मे रोजी सकाळी नऊ वाजता साहित्याचे वाटप करण्यात येणार असून यासाठी ५४ बसेस, २ कार्गो व ५७ जीप अशा एकुण ११३ वाहनांची सोय करण्यात आली आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर शासनाच्या नियमानुसार विविध सेवा सुविधाही पुरवण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक विभागाकडून देण्यात आली. सध्या टपाली मतदानाची नोंद घेण्याचे काम तहसील कार्यालयात सुरू आहे. त्याचबरोबर ८५ वर्षाच्या पुढील १५३ अपंग तसेच वृद्ध मतदारांपैकी या १३१ जणांनी गृह मतदानाच्या माध्यमातून आपला हक्क बजावला आहे. यातील १४ वृद्ध व अपंग व्यक्ती गृह मतदान नोंदणीनंतर मयत झाले आहेत तर ८ व्यक्ती या परगावी गेले असल्याने १५३ मतदारापैकी १३१ मतदारांनी मतदान केले आहे. दरम्यान या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिरोळ तालुक्यात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासन देखील सज्ज आहे. आंध्रप्रदेश राज्यातील विशेष पोलीस म्हणून ९६ पोलिसांचा फौज फाटा तहसील कार्यालयावर दाखल झाला आहे. याचबरोबर स्थानिक पोलीस प्रशासनाच्यावतीने अतिरिक्त ५०० पोलिसांचा फौज फाटा मागविण्यात आला आहे. यामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सहभाग असून गृहरक्षक दलाचे जवानही निवडणुकीच्या ठिकाणी तैनात असणार आहेत.

## मतमोजणी दिवशीचे आठवडी बाजार रद्द करावा- शेंडगे

कोल्हापूर,ता.४(प्रतिनिधी)-

**जिल्ह्यात कोल्हापूर व हातकणंगले लोकसभा मतदार संघासाठी मंगळवार ता.७ मे २०२४ मतदान होणार आहे. मंगळवार ता. ४ जून २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे.**

या निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा तसेच मतदान व मतमोजणी प्रक्रिया शांततेत, सुव्यवस्थेत पार पाडण्यासाठी ज्या गावामध्ये मतदान व मतमोजणी दिवशी आठवडा बाजार भरतो, त्या गावामध्ये या दिवशी भरणारे आठवडा बाजार रद्द करुन ते अन्य दिवशी भरविण्यात यावेत, असे आवाहन उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी समाधान शेंडगे यांनी केले आहे.

## गोरक्षनाथ पायी दिंडी सोहळ्यास प्रारंभ

चांदोली,ता.४(वार्ताहर)-

**वारणा मोरणा गोरक्षनाथ पायी दिंडी सोहळ्यास सुरुवात झाली.**

दिंडीच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. दिंडीस सोळा वर्षं पूर्ण झाली असून दिंडीमध्ये शित्तुर वारुण,आरळा, सोनवडे,चरण,वाकाईवाडी, नाठवडे, वाकुर्डे,पाडळी, खेडे आदी गावामधून भाविक सहभागी होतात.दिंडी हरिपाठ,काकड आरती,प्रवचन, कीर्तन, भजन करत वाकुर्डे मार्गे गोरक्षनाथ मठ बत्तीस शिराळा येथे जाते.द्वादशीला महाप्रसादाने दिंडीची सांगता होणार आहे.

# पुढे जात राहणे हीच आयुष्याची प्रेरणा-राम नाईक

इचलकरंजी,ता.४-

**संपूर्ण आयुष्यभर आपण शिकत असतो. भेटलेली माणसे,ऐकलेली भाषणे, केलेले काम, आलेले अनुभव यातून आयुष्यभर आपली घडण्याची प्रक्रिया सुरु असते. आयुष्यात चालत रहाणे, पुढे जात राहणे हीच आयुष्याची प्रेरणा असते, असे विचार माजी केंद्रीय मंत्री व माजी राज्यपाल राम नाईक यांनी येथे बोलताना व्यक्त केले.**

येथील आपटे वाचन मंदिराच्या वसंत व्याख्यानमालेत 'मी कसा घडलो' या विषयावर पहिले पुष्प गुंफताना ते बोलत



होते. प्रारंभी राम नाईक यांच्या हस्ते सरस्वती पुजन करुन वसंत व्याख्यानमालेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी पुढे बोलताना श्री.नाईक म्हणाले, जो माणूस बसून राहतो त्याचे भाग्य बसून राहते. जो झोपून राहतो त्याचे भाग्य झोपून राहते. जो उभा राहतो त्याचे भाग्य उभे राहते. जो चालू लागतो त्याचे भाग्य चालू लागते. त्यामुळे आपण सतत चालत राहिले पाहिजे, पुढे जात राहिले पाहिजे. कुणी चांगले काम केले तर त्याचे कौतूक केले पाहिजे,असे सांगून स्वत:च्या ९० वर्षाचा आढावा घेताना ते पुढे म्हणाले, माझ्या आयुष्यात स्वातंत्र्यवीर सावरकर, शामाप्रसाद मुखर्जी, अटलबिहारी वाजपेयी यांच्या भाषणाचा मोठा प्रभाव राहिला. रोज व्यायाम, सुर्यनमस्कार घातले त्यामुळे आजही उत्साहाने कार्यरत आहे. तीन वेळा आमदार, पाच वेळा खासदार आणि पाच वर्षे उत्तरप्रदेश राज्याचा राज्यपाल तसेच केंद्रीय मंत्री पद ही सर्व पदे जनसेवेची कशी होतील यासाठी प्रयत्न केल्याची अनेक उदाहरणे त्यांनी सांगितली.

प्रारंभी ग्रंथालयाच्या अध्यक्षा सुषमा दातार यांनी प्रास्ताविक तर संचालक अ‍ॅड. स्वानंद कुलकर्णी यांनी परिचय करुन दिला. राम नाईक यांना पद्मभुषण पुरस्कार मिळाल्याबद्दल ग्रंथालयाच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. उपाध्यक्षा हर्षदा मराठे यांनी आभार मानले. या व्याख्यानास श्रोत्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## जिल्हा बार असोसिएशनच्या नूतन अध्यक्षांनी कार्यभार स्वीकारला

कोल्हापूर,ता.४(प्रतिनिधी) -

**कोल्हापूर, सांगलीसह सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यातील वकिलांशी चर्चा करून खंडपीठाचा प्रश्न सोडविण्यासाठी प्राधान्य दिले जाईल. तसेच निवडणुकीत जाहीर केलेला जाहीरनामा कृतीतून पूर्ण करू, अशी ग्वाही जिल्हा बार असोसिएशनचे नूतन अध्यक्ष अ‍ॅड. सर्जेराव खोत यांनी दिली. नवीन कार्यकारिणीने बार असोसिएशनचा कार्यभार स्वीकारला.**

कोल्हापूर जिल्हा बार असोसिएशनच्या नवीन कार्यकारिणीचे जिल्हा न्याय संकुलाच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज सभागृहात जुन्या कार्यकारिणीने स्वागत केले. विजयी उमेदवारांचे अभिनंदन करून नूतन अध्यक्ष खोत यांच्याकडे कार्यभार सुपूर्द करण्यात आला.

यावेळी नूतन उपाध्यक्ष उमेश माणगावे, सर्व पदाधिकारी यांच्यासह सुभाष पिसाळ, धनंजय पठाडे, ए. पी. पोवार, संपतराव पवार, प्रशांत देसाई, अशोकराव पाटील आदी उपस्थित होते.

# छ.राजाराम कारखान्याची संपूर्ण एफआरपी अदा

कोल्हापूर,ता.४(प्रतिनिधी)-

**येथील छत्रपती राजाराम साखर कारखान्याने २०२३-२४ च्या हंगाम अखेरीपर्यंतची संपूर्ण रू.१२५.२९ कोटींची ऊस बिले ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या संबंधित बँक खात्यावर जमा केली असल्याची माहिती कारखान्याचे मार्गदर्शक संचालक महादेवराव महाडिक यांनी दिली.**

तसेच हंगाम २०२३-२४ यशस्वी करणेसाठी सर्वच सभासद, शेतकरी, ऊस तोडणी वाहतूक कंत्राटदार, तोडणी मजूर, कारखान्याचे अधिकारी व कर्मचारी यांनी सहकार्य केलेबद्दल सर्वांना धन्यवाद दिले. कारखान्याचा सन २०२३-२४ चा गळीत हंगाम ता. १६/११/२०२३ इ.रोजी सुरू झाला व ता.२१/०३/२०२४ रोजी समाप्त झाला.याकालावधीमध्ये ४,०४, १६२.५१९ मे.टन गळीत झाले आणि ११.६०% साखर उताऱ्यासह ४,६७,२०० क्विंटल साखर उत्पादन झाले. चालू गळीत हंगामात दि. २१/०३/२०२४ अखेर गाळपास आलेल्या संपूर्ण ऊसाची निव्वळ देय एफ.आर.पी. रू.३१००/- प्रति मे.टन प्रमाणे होणाऱ्या ऊस बिलाची संपूर्ण रक्कम रू.१२५.२९ कोटी ऊस पुरवठादार शेतकरी सभासदांच्या बँक खात्यावर जमा केलेली आहे. तसेच कारखान्याची तोडणी वाहतुकीची हंगाम अखेरची संपूर्ण बिले अदा केली आहेत.तरी संबंधीत सर्व ऊस पुरवठादारांनी व तोडणी वाहतुक कंत्राटदारांनी आपआपल्या बँकेशी संपर्क साधून आपले पेमेंट घेऊन जावे, असे आवाहन श्री. महाडिक यांनी केले आहे.

यावेळी कारखान्याचे चेअरमन अमल महाडिक, व्हा. चेअरमन नारायण चव्हाण व सर्व संचालक आणि कार्यकारी संचालक प्रकाश चिटणीस उपस्थित होते.

# केआयटीत विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

कोल्हापूर,ता.४(प्रतिनिधी)-

**केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) कोल्हापूर,अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या स्थापत्य अभियांत्रिकी विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी अ‍ॅप्लिकेशन ऑफ फेरोसिमेंट इन सिव्हिल इंजिनिअरिंग या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा झाली.**



स्थापत्य विभाग व फेरोसिमेंट सोसायटी ऑफ इंडिया यांच्यात सामंजस्य करारावेळी उपस्थित प्रमुख मान्यवर.

या कार्यशाळेमध्ये स्थापत्य विभागाच्या २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यशाळेत फेरोसिमेंट सोसायटी ऑफ इंडिया (पुणे), या संस्थेच्या तज्ञांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांना फेरोसिमेंटची माहिती, निर्मिती व बांधकामातील वापराचे विविध पर्याय या विषयांवर माहिती देण्यात आली. आणि त्याचबरोबर फेरोसिमेंटचा वापर करून प्रात्यक्षिके देण्यात आली. याचबरोबर स्थापत्य विभाग व फेरोसिमेंट सोसायटी ऑफ इंडिया पुणे यांच्यामध्ये सामंजस्य करार संपन्न झाला. या कार्यशाळेला फेरोसिमेंट सोसायटी ऑफ इंडिया, पुणेचे पी. पी. लेले, एन एस जाधव, चंद्रमोहन हंगेकर, आणि गिरीश सांगळे हे तज्ञ उपस्थित होते.

कार्यशाळेचे मुख्य समन्वयक प्रा. स्वप्निल मोहिते व प्रा.संदीप सावंत होते. तसेच स्थापत्य विभाग प्रमुख डॉ.आदित्य खेबुडकर यांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष सुनील कुलकर्णी, उपाध्यक्ष साजिद हुदली, सचिव दीपक चौगुले, संचालक डॉ. मोहन वनरोट्टी आणि रजिस्ट्रार डॉ. मनोज मुजुमदार यांचे कार्यशाळेसाठी प्रोत्साहन व सहकार्य मिळाले.


**आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी**

**वसंत व्याख्यानमाला वर्ष ५२ वे**



पुष्प चौथे - रविवार, दि. ५ मे २०२४
वक्ते-मा. श्री. सत्यरंजन धर्माधिकारी, मुंबई
(माजी न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालय)
विषय - संविधानाची वाटचाल आणि न्यायालयांची भूमिका

स्थळ - डी.के.टी.ई. पटांगण, राजवाडा चौक, इचलकरंजी
वेळ - सायंकाळी ७.०० वाजता

**भाग्यरेखा** DOLBY DIGITAL | लेझर प्रोजेक्टर | QUBE CINEMA NETWORK DIGITAL The Power of Cinema. Delivered.

**शुक्रवार दि. ३ पासून**

रोज ३ खेळ १२,३,६ वा. | रोज १ खेळ ९ वा.

या म्हाताऱ्याला अडवून दाखवा !



जुनं फर्निचर (मराठी)

भागयरेखा मधे पुन्हा महिलांचा घुमणार नाच ग घुमा




नाच ग घुमा (मराठी)

**श्रीहरी** शुक्रवार, ता.३/०५/२४ पासून रोज १ वा.
मस्त रोमॅन्टीक हिंदी चित्र
स्कूल गर्ल
प्रौढांसाठी ४ व ७ वा.
A फ्रेंडस् पार्टी A

**श्रीदत्त** शुक्रवार, ता.३ पासून
रोज ४ खेळ - १ * ४ * ७ व १० वा.
मस्त रोमॅंटीक इंग्रजी चित्रपट
स्लीवर टूब (भाग २)
A शहरात प्रथमच * फक्त प्रौढांसाठी A

**पंचवटी** DOLBY DIGITAL PLUS 7.1 संगीत की बेहतरीन दुनिया मे अत्याधुनिक 2K प्रोजेक्टर **शनिवार दि. ४ पासून**
अ‍ॅडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू राहील
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज २ खेळ ३ व ६ वा. | रोज २ खेळ १२ व ९ वा.
खास महिलांच्या आग्रहास्त



जुनं फर्निचर (मराठी)




नाच ग घुमा (मराठी)

**गुरु** बुधवार ता. १ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
१२.३० व ३.३० वा. | ६.३० व ९.३० वा.



नाच ग घुमा (मराठी)
प्रत्येक स्त्रीने पाहिलाच पाहिजे असा अप्रतिम चित्रपट



जुनं फर्निचर (मराठी)

**RK CINEMAS** 3 SCREEN MULTIPLEX **राधाकृष्ण** 3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
Real 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
74474 40070 | bookmyshow



द फॉल गाय 11.00AM, 01.30PM, 04.15PM,10.30PM
स्वरगंधर्व सुधिर फडके 06.45PM
जुनं फर्निचर 12.30PM, 3.30PM, 7.00PM, 9.45PM
नाच ग घुमा 10.30 AM, 01.00 PM, 04.00 PM, 07.15 PM, 10.00 PM
चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह खासकरुन पिज्जा, पास्ता, सैंडविच, गार्लिक ब्रेड आणि बरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच.

**फॉर्च्युन सिनेप्लेक्स इचलकरंजी**
Now Book Tickets on bookmyshow OR Via www.fortunecineplex.in
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11



नाच गं घुमा (U)(MAR) 10.45am, 12.00, 02.00, 05.30, 07.30, 10.30pm
जुनं फर्निचर (U)(MAR) 11.30am, 01.30, 02.45, 04.45, 08.00, 10.15pm
मैदान (U/A)(HIN) 04.15, 10.30pm
स्वरगंधर्व सुधीर फडके (U)(MAR) 07.30pm
आज पहा कोणताही मुव्ही फक्त 110 रु. मध्ये

# घोटाळे करता अन् सहानुभूती कसली मागता?

## खासदार उदयनराजे भोसले यांचा विरोधकांवर घणाघात

महाबळेश्वर,ता.४(वार्ताहर)-

**पश्चिम महाराष्ट्रात काही लोक दमदाटी करून प्रचार करायचे, त्यांना आम्ही आता जमिनीवर आणले आहे. भ्रष्टाचार लपवून सहानुभूती मिळवण्यासाठी ते जनतेसमोर जात आहेत. अरे घोटाळे करता मग सहानुभूती कसली मागता? असा घणाघात महायुतीचे सातारा लोकसभा उमेदवार खासदार उदयनराजे भोसले यांनी विरोधकांवर केला.**



महाबळेश्वर तालुक्यातील पाचगणी येथे महायुतीतील घटक पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. याप्रसंगी आमदार देवयानी फरांदे, भाजपचे प्रदेश कार्यकारणी सदस्य अविनाश फरांदे, माजी नगराध्यक्ष किसन शिंदे, माजी नगरसेवक कुमार शिंदे, विमल पोर्टे, नारायण बिरामणे, रुपेश बगाडे, अमोल कांबळे, संदीप साळुंखे, प्रीतम कळसकर, आरती झुंजार, शेखर भिलारे, अनिल कांबळे, तानाजी भिलारे, विजय भिलारे, शरद बावळेकर,संभाजी मिलारे, शंकर बावळेकर, विजय नायडू, रवींद्र कुंभारदरे, संतोष आखाडे, यशवंत भिलारे, राजेंद्र बावळेकर, दिलावर बागवान, महेश रसाळ, तानाजी भिलारे, संभाजी भिलारे, विजय मिलारे, अशोक ढेबे यांची उपस्थिती होती.

खासदार उदयनराजे भोसले म्हणाले, काहीजण माझ्या कॉलर उडवण्याच्या स्टाईलबाबत टीका करतात पण लोकांचे काम करतो म्हणून मी कॉलर उडवतो आणि त्याची मला सवय आहे. याउलट माझ्यावर टीका करणाऱ्यांना भ्रष्टाचार करण्याची सवय आहे,असा टोला उदयनराजे यांनी लगावत ते पुढे म्हणाले,पाचगणी, महाबळेश्वर या दोन शहराच्या विकासासोबतच स्थानिक जनतेला ज्या समस्या भेडसावत आहेत, त्या मार्गी लावण्यासाठी निश्चितपणाने भविष्यकाळात प्रयत्न सुरूच ठेवले जाणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा मला अभिमान वाटतो. त्यांनी ठाण्यात राहून देखील आपल्या गावाची नाळ तुटू दिली नाही. महाबळेश्वर आणि पाचगणी या दोन्ही शहरांसह परिसराकडे त्यांचे विशेष लक्ष आहे.

आमदार देवयानी फरांदे म्हणाल्या, मनमोहन सिंग सरकारमध्ये शरद पवार हे कृषिमंत्री असताना शेतकऱ्यांसाठी सन्मान योजना सुरू करण्याचे त्यांना सुचले नाही, ते मोदींच्या नेतृत्वाखालील भाजपने करून दाखवलं. लंडन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे घर भाजपने स्मारक म्हणून जतन केले. आताची लोकसभेची निवडणूक, हे राष्ट्र कुणाच्या हातात सुरक्षित ठेवायचे याच्यासाठी आहे.सुनिल काटकर म्हणाले, महाबळेश्वर खंडाळा हे संपूर्ण मतदारसंघांचा दौरा आमदार मकरंद पाटील यांच्यासोबत केला जाणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे देखील महाबळेश्वरात बैठक घेण्याचे नियोजन केले आहे.

मतदाना दिवशी जास्तीत जास्त मतदान होईल याकडे आमचे लक्ष आहे. महायुतीतील सर्व घटक पक्षाच्या कार्यकर्त्यांनी एकत्र नियोजन करून उदयनराजेंना विजयी करावे, असे आवाहन केले.कुमार शिंदे म्हणाले, भाजप, शिवसेना, रिपाई, मनसे या पक्षांच्या सर्व कार्यकर्त्यांनी कमळ हे चिन्ह घरोघरी पोहोचवले आहे. लोकसभेची निवडणूक ही स्वतःची निवडणूक आहे, असा विश्वास ठेवून कार्यकर्त्यांनी कामाला लागावे.

# महाराष्ट्रात पराभव दिसू लागल्याने मोदी, शहा यांच्या सभा वाढवल्या

पंढरपूर,ता.४(प्रतिनिधी)-

**भाजपला महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकीत पराभव दिसू लागला आहे. त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी महाराष्ट्रातील सभा वाढवल्या आहेत, असा घणाघात महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. पटोले सोलापूर दौऱ्यावर आले होते. यावेळी ते बोलत होते.**



**नाना पटोलेंचा घणाघात**

सोलापुरातून प्रणिती शिंदे निवडून येतील, असा विश्वासही यावेळी पटोले यांनी बोलून दाखवला. पटोलेंनी मोदींसह अमित शहा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देखील धारेवर धरले. यावेळी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, शहर अध्यक्ष चेतन नरोटे, जिल्हा कार्याध्यक्ष नंदकुमार पवार यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.पटोले पुढे म्हणाले, भाजपाने मागील दहा वर्षांत महागाई वाढवली, बेरोजगारी वाढवली. शेतकऱ्यांना उद्ध्वस्त केले. बेरोजगारांचा देश अशी आपली ओळख बनली आहे. गरिबांचे जीवन उद्ध्वस्त केले आहे. या मुद्द्यांकडे लोकांचे लक्ष जाऊ नये म्हणून आता काँग्रेसने ६० वर्षांत काय केले वगैरे म्हणत आहेत.सातत्याने हा प्रयत्न नरेंद्र मोदी, अमित शहा यांच्याकडून केला जात आहे. मोदींच्या सोलापुरातील सभेत पैसे देऊन कर्नाटकांतून लोक आणले गेले होते. तर राहुल गांधींच्या सभेत उत्स्फूर्तपणे लोक आले होते. लोक आता मोदींचे भाषण आणि त्यांचे मुद्दे ऐकून कंटाळले आहेत, असेही पटोले म्हणाले.

नरेंद्र मोदी २०१९ मध्ये सोलापुरात आले होते. तेव्हा त्यांनी लष्कराचे गणवेश शिवण्यासाठी केंद्र उभे करणार म्हणाले होते. सोलापूरमध्ये आता आले तेव्हा त्या वचनावर काहीच का बोलले नाहीत? दोन उड्डाण पुलांचा उल्लेख त्यांनी केला होता. गेल्या पाच वर्षात सोलापूरचा आवाजच दिल्लीत आला नाही. प्रणिती शिंदे या जागरूक उमेदवार आहेत, त्यांना निवडून द्या, असे आवाहन पटोले यांनी केले.

# अभिजीत पाटील यांचा महायुतीला पाठिंबा

## सोलापूर,माढ्यातील उमेदवारांसाठी घोंगडी बैठका सुरू

पंढरपूर,ता.४(प्रतिनिधी)-

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्ह्याचे नेते,विठ्ठल सह साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी सोलापूर आणि माढा लोकसभा मतदार संघातून आपल्या सभासद आणि समर्थक यांचा पाठिंबा महायुतीचे आ.राम सातपुते आणि खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना जाहीर केला आहे. केवळ पाठिंबा देवून न थांबता थेट प्रचार करण्यासाठी गावोगावी घोंगडी बैठकाचे आयोजन सुरू केले आहे.**



पंढरपूर तालुक्यातील श्री विठ्ठल सह साखर कारखाना आणि त्यावर अवलंबून असणारा मोठा वर्ग आहे. ज्यांच्या ताब्यात हा साखर कारखाना असतो त्याच्या पाठीशी विठ्ठल परिवाराची ताकद असते, हा आजवरचा राजकीय इतिहास आहे. यामुळे चेअरमन अभिजीत पाटील यांनी महायुतीच्या उमेदवारांना दिलेला पाठिंबा हा भाजपच्या दोन्ही उमेदवारांना हत्तीचे बळ देणारा ठरणार आहे. या पाठिंब्यामुळे ही निवडणूक एकतर्फी झाल्याचे वातावरण तयार झाले आहे. श्री विठ्ठल सह साखर कारखान्यावर हजारो कुटुंबाचे जीवन अवलंबून आहे. याच साखर कारखान्याची विस्कटलेली घडी बसविण्याचे काम चेअरमन अभिजीत पाटील यांनी केले आहे. याच कारखान्याला अडचणीत टाकून बाजूला गेलेल्या लोकांनी करून ठेवलेला उपद्व्याप निस्तारण्यासाठी भाजपकडून सहकार्य मिळणार आहे.त्यामुळे अभिजीत पाटील यांनी भाजपचे उमेदवारांना पाठिंबा जाहीर केला आहे.

रविवार ता.५ मे रोजी दुपारी १२ वाजता विठ्ठल सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर त्यांच्या उपस्थितीत सर्व सभासद आणि समर्थक कार्यकर्त्यांची मोठी जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. याच दिवशी प्रचाराची सांगता पूर्ण होत आहे. याच दिवशी स्वतः फडणवीस येणार असल्याने या सभेला फार मोठे महत्व येणार आहे.त्यामुळे ही शेवटचीआणि विजयी सभाच ठरणार असल्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी सांगितले आहे.

## सोनवडे प्रिमीयर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

चांदोली,ता.४(वार्ताहर)-

**सोनवडे (ता.शिराळा) येथील शंकरदादा मोहीते स्पोर्टस च्या वतीने बुधवार ता. ८ मे पासून सोनवडे प्रिमीयर लीग-२०२४ या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.**

चांदोली परिसरातील वारणावती येथील वसंतसागर क्रिकेट मैदानावर होणाऱ्या क्रिकेट स्पर्धेचे हे तिसरे वर्ष असून या स्पर्धेमध्ये प्रामुख्याने पृथ्वीबाबा स्पोर्ट्स सोनवडे, भाष्टे वॉरियर्स, शंकर दादा मोहिते युवा मंच खोतवाडी , उदय ११ सोनवडे, प्रकाश (तात्या) स्पोर्ट्स काळोखेवाडी, पाटील वॉरियर्स, रिद्धी सिद्धी स्पोर्ट्स आदी संघ सहभागी होणार आहेत.ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी शंकरदादा मोहीते स्पोर्टस,सोनवडे परिश्रम घेत आहे.

# मतदान केंद्रात आवश्यक सोयीसुविधा देण्यात येणार

## सहा.निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांची माहिती

पंढरपूर,ता.४(प्रतिनिधी)-

**लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून, जिल्ह्यात सोलापूर-४२ (अ.जा.) व माढा-४३ लोकसभा मतदार संघाचे मतदान ता. ०७ मे २०२४ रोजी होणार आहे.**



सोलापूर लोकसभा मतदार संघातील २५२ पंढरपूर विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रात प्रशासनाकडून आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मतदारसंघात विशेष मतदान केंद्र राहणार असून यात आदर्श मतदान केंद्राअंतर्गत महिला, दिव्यांग व युवा व्यवस्थापित मतदान केंद्राचा समावेश असल्याचे प्रांताधिकारी तथा सहा. निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी सांगितले. सोलापूर लोकसभा मतदार संघातील २५२ पंढरपूर विधानसभा मतदारसंघात आदर्श मतदान केंद्रातंर्गत महिला व्यवस्थापित दोन मतदान केंद्र, दिव्यांग व्यवस्थापित एक मतदान केंद्र आणि युवा कर्मचारी व्यवस्थापित दोन मतदान केंद्र ही मतदान केंद्र विशेष राहणार आहेत. मतदान केंद्रात रॅम्प, व्हीलचेअर, प्रथमोपचार पेटी, मदत कक्ष, स्वतंत्र प्रसाधनगृह, हिरकणी कक्ष, उष्माघातापासून वाचण्यासाठी सूचना फलक,आरोग्य सुविधा,पुरेशी प्रकाश व्यवस्था,पिण्याच्या पाण्याची सुविधा व इतर बाबी राहणार आहेत.

**महिला कर्मचारी व्यवस्थापित मतदान केंद्र**

मतदान केंद्र क्र.-१०२-पंढरपूर-द.ह.कवठेकर प्रशाला,पश्चिम बाजूची खोली क्र.१ व मतदान केंद्र क्र.-१८३-मंगळवेढा-न्यु इग्लिश स्कूल,मंगळवेढा पश्चिम बाजूची खोली नं.१४(नवीन इमारत) येथे महिला कर्मचाऱ्यांच्यावतीने चालविण्यात येणारे मतदान केंद्र राहणार आहे.येथील मतदान केंद्रांत संपूर्ण व्यवस्थापन महिलांचे राहणार आहे.

**दिव्यांग कर्मचारी व्यवस्थापित मतदान केंद्र**

मतदान केंद्र २५७-गोणेवाडी-जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,गोणेवाडी, जवाहर योजना इमारत खोली नं.१ येथे दिव्यांग कर्मचाऱ्यांच्यावतीने चालविण्यात येणारे मतदान केंद्र राहणार आहे.येथील मतदान केंद्रांत संपूर्ण व्यवस्थापन दिव्यांग कर्मचाऱ्यांचे राहणार आहे.

**युवा कर्मचारी व्यवस्थापित मतदान केंद्र**

मतदान केंद्र क्र.१६०-तरटगांव कासेगाव-जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पूर्व बाजूची खोली क्र.२, तरटगांव (कासेगांव) व मतदान केंद्र क्र.२७२-लमाणतांडा-माध्यमिक आश्रम शाळा लमाणतांडा जिण्याच्या डाव्याबाजूने खोली नंबर १ येथे युवा कर्मचाऱ्यांच्यावतीने चालविण्यात येणारे मतदान केंद्र राहणार आहे. येथे युवा कर्मचारी व्यवस्थापित मतदान केंद्र राहणार आहे.असे सहा.निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी सांगितले.



कु.धैर्या कुलकर्णीचा सत्कार करताना राजेंद्र चोरगे व इतर शिक्षक वर्ग.

## एव्हरेस्ट बेस कॅम्प सर केल्याबद्दल धैर्या कुलकर्णीचा सत्कार

सातारा,ता.४(प्रतिनिधी)-

**एव्हरेस्ट बेस कॅम्प पूर्ण करणे हे प्रत्येक गिर्यारोहकाचे स्वप्न असते. हे आव्हानात्मक स्वप्न सत्यात उतरवण्याची कामगिरी जिद्द व चिकाटीच्या जोरावर येथील गुरूकुल स्कूलची इयत्ता ६ वीची विद्यार्थीनी धैर्या विनोद कुलकर्णी हिने पहिल्याच प्रयत्नात वयाच्या बाराव्या वर्षी एव्हरेस्ट बेस्ट कॅम्प सर केला.**

कु.धैर्याच्या या यशाबद्दल गुरूकुल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष राजेंद्र चोरगे यांनी तिचा सत्कार केला. यावेळी माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. शीला वेल्हाळ, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ.अनुराधा कदम, माध्यमिक विभागाच्या उपमुख्याध्यापिका सौ.सोनाली तांबोळी, जनसंपर्क अधिकारी विश्वनाथ फरांदे उपस्थित होते.

# साताऱ्यात मतदान जनजागृतीसाठी बाईक रॅली संपन्न

सातारा,ता.४(प्रतिनिधी)-

**सातारा लोकसभा मतदार संघातील मतदान जनजागृती कार्यक्रमांतर्गत सातारा जिल्हा स्वीप कक्षा मार्फत जिल्ह्यात सर्व ठिकाणी सायंकाळी चार ते सहा या वेळामध्ये बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.**



सातारा येथे मतदान जनजागृतीसाठी बाईक रॅली काढत मतदान जनजागृतीची शपथ देण्यात आली.

सातारा जिल्हा मुख्यालयातील बाईक रॅली सातारा जिल्हा परिषदेच्या मैदानातून सुरू झाली. यामध्ये जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी याशिनी नागराजन, सातारा, पोलीस अधीक्षक समीर शेख, अतिरिक्त पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले, जिल्हा परिषद प्रकल्प संचालक संतोष हराळे यांच्यासह प्रशासकीय प्रमुख अधिकारी बाईकवरुन सहभागी झाले होते. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन निलेश घुले, कृषी विकास अधिकारी विजय माईनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत अर्चना वाघमळे, पाणी व स्वच्छता उपमुख्य कार्यकारी अधिकारी क्रांती बोराटे, शिक्षणाधिकारी प्राथमिक शबनम मुजावर, शिक्षणाधिकारी, माध्यमिक प्रभावती कोळेकर, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सपना घोळवे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ,महिला व बालकल्याण रोहिणी ढवळे, गटविकास अधिकारी पंचायत समिती सतीश बुद्धे, तसेच सातारा जिल्हा परिषद सर्व कर्मचारी पंचायत समिती सर्व कर्मचारी, शिक्षक, ग्रामसेवक उपस्थित होते. रॅली सातारा जिल्हा परिषद मैदानातून पोवई नाका मार्गे मोळाचा वाडा,वर्ये,नेले, किडगाव, कळंबे,माळ्याची वाडी, साबळेवाडी कोंडवे मार्गे साताऱ्यात परत आली. रॅलीच्या सुरुवातीला मतदान जनजागृतीची शपथ देण्यात आली.

# कोरोची ग्रा.पं. कर्मचाऱ्याकडेच बोगस नळ कनेक्शन

कोरोची,ता.४(वार्ताहर)-

**कोरोची ग्रामपंचायतीच्या जलस्वराज्य प्रकल्पाकडील कर्मचाऱ्याच्या घरी पिण्याच्या पाण्याचे बोगस नळ कनेक्शन आढळून आल्याने गावात खळबळ उडाली आहे.**

सध्या जोराचा उन्हाळा असल्याने अगोदरच पाण्यासाठी नागरिकांची वणवण सुरु झाली आहे. ज्यांची पाण्याची थकबाकी आहे, त्यांचे नळ कनेक्शन बंद करण्याची मोहीम ग्रामपंचायती मार्फत सुरु आहे. दरम्यान, जलस्वराज्य कर्मचाऱ्याच्या घरीच एक इंची बोगस नळ कनेक्शन जोडल्याचे आढळून आले. हे कनेक्शन केव्हा आणि कोणी जोडलेले आहे. त्याची नोंद ग्रामपंचायतीकडे का केली नाही. केव्हापासून तो कर्मचारी फुकट पाणी घेतो.त्याला कोणाचा वरदहस्त आहे. आणखी कोणा कोणाला अशी बोगस नळकनेक्शन त्याने दिली आहेत. तर ग्रामपंचायतीने संबंधितांवर काय कारवाई केली ? आदी प्रश्न निर्माण झाले आहेत. संबंधित कर्मचाऱ्यावर योग्य ती कारवाई तातडीने करावी, अशी मागणी होत आहे. सध्या गावातील नागरिकांनी मागणी केल्यानुसार जलस्वराज्य प्रकल्पाचे ऑडीट सुरु आहे. त्यातच बोगस कनेक्शन आढळल्याने या प्रकल्पामध्ये असा छुपा भ्रष्टाचार चालू असल्याच्या चर्चा जोर धरत आहेत.



कोरोचीतील जलस्वराज्य प्रकल्पाच्या कर्मचाऱ्याच्या घरी जोडलेले जादाचे बोगस नळकनेक्शन.

**बोगस नळधारकांचे धाबे दणाणले**

कोरोची ग्रामपंचायत प्रशासनाने बोगस नळ कनेक्शन निदर्शनास आल्यावर संबंधित कर्मचाऱ्याला तातडीने निलंबित केले. दरम्यान, याबाबत संबंधित कर्मचाऱ्याने मला ग्रामपंचायतीने परत कामावर नाही घेतले तर मी ग्रामपंचायतमधील इतरांनी घेतलेली बोगस नळ कनेक्शन गावासमोर उघड करणार असल्याचे म्हटले आहे त्यामुळे बोगस नळ कनेक्शन घेणाऱ्यांचे धाबे चांगलेच दणाणले आहे.



## मुस्लिम समाज संजयकाकांनाच मतदान करणार-इनामदार

सांगली,ता.४(प्रतिनिधी)-

**कुणी कितीही विष पेरण्याचा प्रयत्न केला तरी विकासाच्या मुद्यावर मुस्लिम समाज संजयकाकांनाच मतदान करणार आहे याची आम्हाला खात्री आहे,असे प्रतिपादन भाजपा पश्चिम महाराष्ट्र समन्वयक शेखर इनामदार यांनी केले.**

भाजपा महायुतीचे उमेदवार खासदार संजयकाका पाटील यांच्या प्रचारार्थ जनसुराज्य शक्ती पार्टीच्या माध्यमातून सांगलीतील शामरावनगर येथे आयोजित केलेल्या मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी जनसुराज्य युवा शक्ती प्रदेशाध्यक्ष समित कदम, प्रभाकर पाटील, ओंकार जाधव, अलीम पठाण, फारुख जमादार, सलीम पठाण,मिलिंद चींके, वैभव लाटवडे, रमजान मुल्ला, शाहरुख पठाण, तौफिक दड्डी यांच्यासह महायुती घटक पक्षांचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# उदयनराजेंना मोठे मताधिक्य द्या-अजित पवार

## वाई येथे उदयनराजेंच्या प्रचारार्थ सभा

वाई,ता.४(वार्ताहर)-

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जगात विकासपुरुष म्हणून ओळख कायम ठेवण्यासाठी उदयनराजे भोसले निवडून येणे गरजेचे आहे. साताराच्या विकासाचे माझ्यावर सोडा तुम्ही फक्त उदयनराजेंना निवडून द्या, बाकीचा काही विचार करू नका. मी राज्य मंत्रिमंडळातून भरपूर निधी देईन. काहीही झाले तरी उदयनराजेंना मोठे मताधिक्य मिळायला हवे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वाई येथे बोलताना केले.**




वाई येथील प्रचार सभेत बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार.

दरम्यान, उदयनराजेंना निवडून द्या. नितीन (काका) पाटील यांना जूनमध्ये राज्यसभेवर खासदार करण्याची जबाबदारी माझी आहे. अजित पवारांचा हा शब्द आहे, असे ठासून सांगून वाई, खंडाळा, महाबळेश्वर तालुक्यातील नाराजी दूर करण्याचा प्रयत्न अजित पवार यांनी यावेळी केला.वाई येथे महायुतीचे उमेदवार उदयनराजे भोसले यांच्या प्रचारासाठी आयोजित प्रचारसभेत अजित पवार बोलत होते. यावेळी उदयनराजे भोसले, आमदार मकरंद पाटील, देवयानी फरांदे, धैर्यशील कदम, नितीन पाटील, सुनील काटकर, सुरभी भोसले आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी आरपीआयचे अशोक गायकवाड, संजय गायकवाड, नितीन भरगुडे-पाटील यांची भाषणे झाली.

पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाल्यापासून सर्व निवडणुकीमध्ये तुम्ही घड्याळाचा खासदार निवडून दिला. यावेळेस कार्यकर्त्यांच्या माझ्या पक्षाच्या सहकाऱ्यांच्या मनामध्ये ही गोष्ट येणं काही चुकीचा नाही. मात्र विकासासाठी सत्तेबरोबर राहणे गरजेचे असते असे यशवंतराव चव्हाण यांनी सांगितले आहे. त्यांच्या शिकवणीप्रमाणे आम्ही महायुतीमध्ये सामील झालो आहोत. सर्व पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे सांगत ते पुढे म्हणाले, राज्य सरकारचे सहा लाख कोटींचे बजेट माझ्या हातात आहे. महायुतीच्या माध्यमातून साताऱ्यासाठी अधिक विकास कामे उदयनराजेंच्या माध्यमातून करण्याचे काम आम्ही यापुढील काळात करू. साताराचे वैद्यकीय महाविद्यालय पाणी योजना, शहरी विकास, गड किल्ले दुरुस्ती आणि पर्यटनासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे. राज्यामध्ये आपण मोठ्या संख्येने निधी वितरित करत असतो. मात्र यामध्ये केंद्राचा सहभाग मिळवण्यासाठी व गतिमान विकासासाठी स्थिर सरकार असणे गरजेचे आहे आणि स्थिर सरकार फक्त नरेंद्र मोदी देऊ शकतात. त्यांच्या पाठिंब्याकरिता एकेक खासदार दिल्लीला गेला पाहिजे. साताऱ्यातून महायुतीने सर्व तीन घटक पक्षांनी आम्ही उदयनराजेंना दिलेल्या पाठवण्याचा निर्णय घेतला आहे.

महायुतीतील घटक पक्षांमध्ये कोणाचेही कोणतेही गैरसमज नाहीत. सर्वजण मिळून आम्ही प्रचाराचे काम करत आहोत. उदयनराजे हे महायुतीचे प्रमुख उमेदवार आहेत. कोणीही कोणताही दुसरा विचार न करता फक्त त्यांच्या पाठीशी राहावे. वाई-महाबळेश्वर-खंडाळा मतदार संघाला मोठ्या प्रमाणात निधी देण्याचे काम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि मी केले आहे.

यावेळी बोलताना उदयनराजे भोसले यांनी केंद्रात स्थिर सरकार असल्याशिवाय विकास होत नाही, देशात नरेंद्र मोदी हे स्थिर सरकार देऊ शकतात.आपण सर्वांनी त्यांच्या नेतृत्व बरोबर रहावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी मकरंद पाटील यांनी महायुतीतून आपल्या मतदारसंघाला मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला आहे. किसन वीर व खंडाळा कारखान्याला ही मोठ्या प्रमाणात निधी मंजूर केला आहे. आपण सर्वांनी महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे, असे आवाहन त्यांनी केले.

# आसूड हातामध्ये घेत शरद पवारांचा मोदी सरकारवर ताशेरे

## शशिकांत शिंदेच्या विजयाने इतिहासाची पुनरावृत्ती होणार शरद पवार

**सातारा ता,४(प्रतिनिधी) –**

छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा आणि सह्याद्रीच्या कुशीत असलेल्या, धगधगत्या इतिहासाची साक्ष देणाऱ्या सातारा नगरीत शरद पवार यांनी शशिकांत शिंदेंच्या प्रचारार्थ सातारकरांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले. भाषणाच्या सुरुवातीलाच शरद पवारांनी २०१९ च्या लोकसभा निवडणुकीतील पराभवाची आठवण करुन देत उदयनराजेंना टोला लगावला. शरद पवारांनी मंचावर येताच, त्यांच्या हाती शेतकऱ्यांचा आसूड देण्यात आला. त्यामुळे, आसूड हातात येताच त्यांनी मोदी सरकावर हल्लाबोल केला. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेससाठी साताऱ्याची लढत प्रतिष्ठेची बनली. जाणता राजा म्हणून ओळख असणाऱ्या शरद पवारांनी साताऱ्यात आसूड हाती घेत मोदी सरकारवर ताशेरे ओढले आहेत.

शेतकऱ्यांच्या विकासाच्या गप्पा करणाऱ्यांनी फक्त आश्वासनंच दिली असल्याचे पवारांनी सांगताना हुकूमशाहीला गाडायची वेळ आली आहे. देशात संविधान टिकण्यासाठी सर्वांनी एकत्रित येण्याची गरज असल्याचे सांगितले. सातारा लोकसभा निवडणूकीत सर्वसामान्यांचे नेतृत्व उभे राहणे काळाची गरज आहे. निष्ठावंत म्हणून शेतकरी, कामगार, कष्टकरी यांच्या पाठीशी उभे राहणारे सर्वसामान्यांतील नेतृत्व आ.शशिकांत शिंदे आहेत. त्यांच्या विरोधात छत्रपती आहेत, ज्यांचा पराभव याच ठिकाणी झालेल्या एका पावसातल्या सभेने दाखवून दिला. आजची उपस्थिती सर्वसामान्यांच्या पाठीशी आजही असलेली ताकद उद्याचे चित्राची पुनरावृत्ती असणार आहे. आजच्या गर्दीने शशिकांत शिंदेच्या विजयाची नांदी ठरणार यात तिळमात्र शंका नसल्याचे शरद पवार यांनी जाहीर सभेत बोलताना सांगितले. यावेळी विद्यमान खासदार श्रीनिवास पाटील व महाविका आघाडीतील सर्व मान्यवर उपस्थित होते.

नरेंद्र मोदींनी एक ही आश्वासन पूर्ण केले नाही महागाई ही त्यांनी दिलेली देणगी आहे. शेतीत जरा चांगला भाव आला की निर्यात बंदी ठरलेली आहे.भ्रष्टाचाराबाबत सुप्रीम कोर्टाला दखल घ्यावी लागली असल्याचे शरद पवारांनी बोलताना सांगितले. मोदीनी कॅशलेस भ्रष्टाचार देशात आणला. महाराष्टातील जनता गद्दारना फितुरीला माफ करणार नाही. सातारा लोकसभा मतदार संघात आ.शशिकांत शिंदेच्या माध्यातून पुन्हा इतिहास घडेल. मोदींनी देशावर मोठं संकट आणलं आहे. मोदींच्या कालखंडामध्ये चिनच्या प्रश्नाला महत्व दिले नाही आणि हजारो किलोमीटर भारताची जमीन चीनने ताब्यात घेतली. महागाई कमी केली असे मोदी म्हणतात मात्र हे आश्वासन त्यांनी पाळलं नाही असे अनेक मुद्यावर शरद पवारांनी मोदी सरकारला धारेवर धरले.

शेतकऱ्याला संकटातुन बाहेर काढण्यासाठी त्यांनी आश्वासन दिले होते मात्र संपुर्ण शेतीव्यवस्था त्यांनी संकटात आणल्याचे देखील शरद पवार यांनी सांगितले.

## पाटण येथे मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी रॅलीद्वारे जनजागृती

**पाटण,ता.४(प्रतिनिधी)–**

**पाटण मतदारसंघात मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रशासनातर्फे रॅली काढून परिसरात जनजागृती करण्यात आली.**

ही रॅली पाटण, नेरळे, सुळेवाडी, गव्हाणवाडी, नवारस्ता व पुन्हा पाटण शहर अशा मार्गाने काढण्यात आली.रॅलीत तलाठी,ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, पंचायत समिती कर्मचारी आदी सहभागी झाले होते. रॅलीला पंचायत समिती कार्यालयासमोर हिरवा झेंडा दाखवून प्रांताधिकारी सुनील गाढे यांनी नेतृत्व केले.गटविकास अधिकारी यांच्या समवेत रॅलीत सहभाग नोंदवला.

रॅलीचे यशस्वी आयोजन करण्याकरिता गटविकास अधिकारी गोरख शेलार, स्वीपचे समन्वय अधिकारी राजश्री बने, तहसीलदार अनंत गुरव यांनी परिश्रम घेतले.दरम्यान, घरापासून उदरनिर्वाहासाठी मुंबई–पुणे येथे असले तरी मंगळवार ता.७ रोजी ज्यांची नावे मतदार यादीत आहे,त्या सर्वांनी मतदानासाठी अवश्य वेळ काढावा व लोकशाही मजबूत करण्यासाठी आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी सुनील गाढे यांनी केले आहे.

मतदान करताना निर्भयपणे मतदान करावे, कुठल्याही आमिषाला अथवा प्रलोभनाला बळी पडू नये, असेही आवाहन करण्यात आले.

दै. महासत्ता वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!
सर्व सुविधा! तत्पर सेवा!
**मे.हिमालय ऑटो सर्व्हिस.**
दत्तवाड.
भारत पेट्रोलियमचे पेट्रोल-डिझेल व लुब्रीकंटसचे अधिकृत वितरक
उत्कृष्ट लुब्रीकंटस्, अतिउच्च दर्जाचे पेट्रोल-डिझेल विक्री
आमची वैशिष्टे- * सुविधा-एटीएम/डेबीट/क्रेडीट कार्डवर विक्री *२४ तास मोफत हवा व शुद्ध पिण्याचे पाणी *मोफत प्रसाधनगृहाची सोय * क्लोज सर्किट कॅमेरामध्ये शिस्तबद्ध विक्री *पेट्रोल-डिझेलची क्वॉलिटी (दर्जा) तपासण्यासाठी फिल्टर पेपर व डेन्सीटी टेस्ट(घनता) *पेट्रोल-डिझेलची क्वॉन्टीटी तपासण्यासाठी कॅलिब्रेटेड फ्लास्कची सोय
संपर्क–धुपदाळे ब्रदर्स,दत्तवाड,ता.शिरोळ.मो.९८९०९७३५७१

दै. महासत्ता वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!
**जवाहर सहकारी बँक लिमिटेड, हुपरी**
कल्लाप्पाण्णा आवाडे नगर, कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सह. साखर कारखाना साईट, हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.
फोन : (०२३०) २४५१०३७, २४५१०३८
३१ मार्च २०२४ अखेर बँकेची सांपत्तिक स्थिती
ऑडीट वर्ग सतत 'अ'

| ठेवी | ढोबळ नफा | कर्जे |
|---|---|---|
| ११९ कोटी ५३ लाख | १ कोटी ६६ लाख | ६८ कोटी ७३ लाख |

सर्व प्रकारच्या रु. ५ लाखापर्यंतच्या ठेवीवर विमा संरक्षण.
आर.टी.जी.एस., एन.ई.एफ.टी, ए.टी.एम., सी.टी.एस, क्लिरिंग सुविधा
श्री. उत्तम दौ. कुंभार – जनरल मॅनेजर
श्री. नंदकुमार वि. हावळ – मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री.आप्पासाहेब भि. पाटील – व्हा. चेअरमन
श्री. रावसाहेब बा. पाटील – चेअरमन
सर्व संचालक मंडळ, सभासद व सेवक वर्ग.

दै. महासत्ता वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!
कागल परिसरातील अग्रगण्य महाविद्यालय.
दि.कागल एज्युकेशन सोसायटी संचलित
**डी.आर.माने महाविद्यालय कागल.**
१) कला,वाणिज्य,विज्ञान (वरिष्ठ व कनिष्ठ) महाविद्यालय. २) बी.सी.ए.विभाग३) एम.ए. व एम.कॉम. विभाग ४) मेडीकल लॅब टेक्निशियन ५) एक्स-रे टेक्निशियन ६) डेअरी टेक्नॉलॉजी ७) इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी ८) ऑप्थॉल्मिक टेक्निशियन ९) ऑटो टेक्निशियन १०) यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ (बी.ए.,बी.कॉम.)
डॉ.निला जोशी – प्राचार्या
डॉ.श्री.प्रविण चौगुले – कॅम्पस डायरेक्टर

आपली बँक.. पैसाफंड बँक !
**आप्पासाहेब नाईक (दादा)श्री पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि.हुपरी**
ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर ४१६ २०३
फोन (०२३०) २४५००२२,२४५००५८
Fax No. 0230-2450016 , Email : hopaisafund@gmail.com
लोकसेवक कै.आ.बा.नाईक (दादा)
संस्थेची सांपत्तीक स्थिती : ठेवी : रु. 138 कोटी | कर्जे रु. 97 कोटी
आकर्षक व्याजदराने अनेक ठेव प्रकार

| ठेव प्रकार | मुदत | नियमित व्याजदर | ज्ये.ना.व्याजदर |
|---|---|---|---|
| स्पेशल मुदत ठेव | ४६ दिवस ते ९० दिवस | ५.५० | ६.०० |
| मुदत बंद ठेव | ९१ दिवस ते ६ महिने | ६.०० | ६.५० |
| | ०७ महिने ते १२ महिने | ६.५० | ७.०० |
| | १३ महिने ते २४ महिने | ७.७५ | ८.२५ |
| | २५ महिने ते ३६ महिने | ८.०० | ८.५० |
| | ३७ महिन्यांच्या पुढे | ८.२५ | ८.७५ |
| कल्पवृक्ष मुदतबंद ठेव रु.१०००/- ठेव ठेवलेनंतर | १३ महिने नंतर | रु. १०८७/- | रु. १०९२/- |
| | २५ महिने नंतर | रु. ११८०/- | रु. ११९२/- |
| | ३७ महिने नंतर | रु. १२८६ /- | रु. १३०५/- |
| दाम दुप्पट ठेव | ---- | ८.२५ ८ वर्षे ६ महिने | ८.७५ ८ वर्षे |

शेती विषयक कर्ज, उद्योग विषयक कर्ज वाहन तारण कर्ज, घर तारण व घर बांधणी कर्ज १३.५०%
सोने तारण कर्ज (प्रतिग्रॅम रु.४५५०) ११.५०%
बँकेच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विशेष... अमृत महोत्सवी ठेव :
प्रतिवर्षी रक्कम रु. 15,000 अथवा मासिक रु.1275
याप्रमाणे 5 वर्षे गुंतवलेनंतर 6 वर्षानंतर मिळणारी रक्कम रु.१ लाख
शेती व शेतीपूरक कर्ज, उद्योग कर्ज, घर तारण व घर बांधणी , वाहन तारण कर्ज
विशिष्ठ कर्ज प्रकारास १ व २.६०% व्याज सवलत !
शामराव आ.गायकवाड – उपाध्यक्ष | शिवराज स.नाईक बी.ए., जी.डी.सी.ॲण्ड ए. – कार्यकारी संचालक | आण्णासो भा.भोजे – अध्यक्ष

दै. महासत्ता वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!
**मा.शहाजहान ताजुद्दीन**
तहसिलदार
सिव्हील इंजि.ॲण्ड गव्ह.कॉन्ट्रक्टर,
अकिवाट,ता. शिरोळ

दैनिक महासत्ता वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा
since 1935 SUB – SUB का साथ, आपका विकास
सर्वात स्वस्त कर्ज*
सोने तारण कर्ज | गृह कर्ज | वाहन कर्ज | शैक्षणिक कर्ज | MSME कर्ज | धन्वंतरी कर्ज
*अटी व शर्ती लागू
**सांगली अर्बन को–ऑप. बँक लि., सांगली**
प्रधान कार्यालय : ४०४, खणभाग, सांगली ४१६ ४१६ | शेड्युल्ड को–ऑप. बँक
अधिक माहितीसाठी आमच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा | संपर्क मोबा. 7888009718
www.sangliurbanbank.in | Visit us sangliurbanbank.in

आनंदाच्या प्रत्येक क्षणी
**वारणा**®

'वारणा'ची दर्जेदार उत्पादने :
• श्रीखंड • आंबा श्रीखंड • बासुंदी • तूप (घी) • दूध • दूध पावडर • टेट्रा पॅक दूध • फ्लेवर्ड मिल्क • टेबल बटर • चीज • मोझरेला चीज • चीज क्युब • चीज स्लाईस • पनीर • दही • ताक • लस्सी • काजू कतली • म्हैसूरपाक • रसगुल्ला • गुलाबजामुन • मिक्स फ्रुट जॅम • कुकीज्
**श्री वारणा सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघ लि.**
तात्यासाहेब कोरेनगर, पोस्ट वारणानगर, जि. कोल्हापूर - 416 113. महाराष्ट्र (भारत)
फोन : +91 2328-224181 ते 224186, +91 2328-222396 (मार्केटिंग डिव्हिजन), वाशी : (022) 40781666-67
www.waranamilk.com marketing@waranamilk.com Mumbai Branch : vashi@waranamilk.com

दै. महासत्ता वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!
**राजे विक्रमसिंह घाटगे को–ऑप. बँक लि.,कागल.**

| दि. ३१/०३/२०२४ अखेर सांपत्तिक स्थिती (अनऑडीटेड) | | |
|---|---|---|
| १. | भाग भांडवल | रु. ५.२३ कोटी |
| २. | राखीव निधी | रु. ४४.९९ कोटी |
| ३. | एकूण ठेवी | रु. ५०८.२३ कोटी |
| ४. | एकूण कर्जे | रु. २७६.६४ कोटी |
| ५. | मिश्र व्यवसाय | रु. ७८४.८७ कोटी |
| ६. | एकूण गुंतवणूक | रु. २५५.७७ कोटी |
| ७. | ढोबळ नफा | रु. ५.६३ कोटी |
| ८. | निव्वळ नफा | रु. २.८३ कोटी |
| ९. | सी. डी. रेशो | ५४.४३% |
| १०. | सी. आर. ए. आर. | १२.३४% |
| ११. | निव्वळ एन. पी. ए. | 0.00% |
| १२. | पी. सी. आर. रेशो | १२२% |


मा. श्रीमंत समरजितसिंहजी घाटगे (दादा)
चेअरमन, श्री छत्रपती शाहू साखर कारखाना लि.,कागल

मा. श्री. एम. पी. पाटील – अध्यक्ष
श्री. विनायक चव्हाण – मुख्य कार्यकारी अधिकारी
मा. श्री. नंदकुमार माळकर – उपाध्यक्ष
* संचालक मंडळ *
मा. श्री. राजेंद्र जाधव, मा. श्री. आप्पासो हुच्चे, मा. श्री. आप्पासाहेब भोसले, मा. श्री. प्रकाश पाटील, मा. श्री. रविंद्र घोरपडे, मा. श्री. रणजित पाटील, मा. श्री. उमेश सावंत, मा. सौ. कल्पना घाटगे, मा. श्री. अनिल मोरे (तज्ञ संचालक), मा. ॲड. बाबासाहेब मगदूम (तज्ञ संचालक), मा. श्री. हरीदास भोसले (व्यवस्थापक प्रशासक)
सर्व सभासद व सेवक वर्ग


**कर्मवीर भाऊराव पाटील नागरी सहकारी पतसंस्था मर्या; सांगली.** KBP
Symbol of Trust
प्रधान कार्यालय–कोल्हापूर रोड,सांगली • फोन नं. : ०२३३–२३२३९२६
कर्मवीर पतसंस्थेच्या मदतीने, चला आपले जग बदलूया...
सभासदांना आधुनिक बँकींग व तत्पर सेवा देणारी सभासदांच्या विश्वासाची,गतिमान अर्थसंस्था...
कर्मवीर पतसंस्था...
सांपत्तिक स्थिती :
भागभांडवल ▸ ३४ कोटी ८५ लाख
स्वनिधी ▸ १०६ कोटी २९ लाख
गुंतवणूक ▸ ३३९ कोटी ६६ लाख
ठेवी ▸ १०९० कोटी ६९ लाख
कज ▸ ८११ कोटी १४ लाख
खेळते भांडवल ▸ १२८७ कोटी ७३ लाख
शाखा ▸ ६२
सभासद ▸ ६४०००
नफा ▸ २६ कोटी ०१ लाख
खास वैशिष्ट्यै:
▸ व्यवसाय २००० कोटीपेक्षा अधिक
▸ ठेवी ११०० कोटीकडे वाटचाल...
▸ ३७ वर्षाची अविरत यशस्वी सेवा
▸ ६२ शाखांतून आधुनिक सेवा
▸ ISO मानांकन प्राप्त संस्था
▸ ऑनलाईन कोअर बँकींग सेवा
▸ मोबाईलवर बँकींग सुविधा
▸ संस्थेचा IFSC code -ICIC0000104
▸ SMS BANKING /NEFT/RTGS/D.D.सुविधा
▸ QR Code पेमेंट ची सुविधा
▸ प्रत्येक व्यवहाराची माहिती एसएमएसद्वारे मिळण्याची सुविधा.
▸ लॉकर सुविधा उपलब्ध
▸ सतत ऑडिट वर्ग–अ
▸ सर्व शाखा CCTV व अलार्म सुरक्षेने सज्ज
IMPS सुविधा (मोबाईलद्वारे 24x 7-365 दिवस पैसे ट्रान्सफर करण्याची जलद सुविधा)
मा.श्री.अनिल श्रीपाल मगदूम – मुख्य कार्यकारी अधिकारी
मा.डॉ.अशोक आण्णा सकळे – व्हा.चेअरमन
मा.श्री.रावसाहेब जिनगोंडा पाटील – चेअरमन
मा.ॲड.एस.पी.मगदूम – संचालक; मा.डॉ.रमेश वसंतराव ढबू – संचालक; मा.श्री. अे.के.चौगुले(नाना) – संचालक; मा.श्री. वसंतराव धुळाप्पाण्णा नवले – संचालक; मा.डॉ. एस.बी.पाटील (मोटके) – संचालक; मा.डॉ.चेतन आप्पासाहेब पाटील – संचालक
मा.श्रीमती भारती आप्पासाहेब चोपडे – संचालिका; मा.सौ.चंदन नरेंद्र केटकाळे – संचालिका; मा.श्री.आप्पासो दादू गवळी – संचालक; मा.श्री. बजरंग भाऊसो माळी – संचालक; मा.श्री.अमोल विनायक रोकडे – संचालक; मा.डॉ.नरेंद्र आनंदा खाडे – तज्ञ संचालक; मा.श्री.लालासो भाऊसो थोटे – तज्ञ संचालक

## वैष्णवी कांबळे यांची उपसरपंचपदी निवड

गारगोटी,ता.४(प्रतिनिधी)–

खानापूर (ता.भुदरगड) येथील ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सौ.वैष्णवी राजेंद्र कांबळे यांची बिनविरोध निवड



झाली. निवड सभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ. शोभा गुरव या होत्या.

प्राचार्य अर्जुन आबिटकर, आनंदराव आबिटकर, बाळासो भोपळे, विष्णू पाटील यांचेसह सदस्य राजेंद्र पाटील,अमर भोपळे, संदीप गुरव, शीलाताई घरपणकर, शोभा मांगले, कृष्णात गुरव, संभाजी घरपणकर, मारुती पाटील यांच्यासह ग्रामस्थ कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक ग्रामसेवक ढेकळे यांनी तर आभार युवराज नाईक यांनी मानले.

# मोदींना पंतप्रधान करण्यासाठी धैर्यशील मानेंना निवडून द्या

## – मुरलीधर जाधव

हुपरी,ता.४ –

**देशाचे यशस्वी व कणखर नेतृत्व नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार धैर्यशील माने हेच योग्य व सक्षम पर्याय आहेत. मतदारसंघाचा सर्वांगिण विकास व देशाच्या प्रगतीचा रथ पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात अविरतपणे पुढे नेण्यासाठी धैर्यशील माने यांना प्रचंड मताधिक्याने निवडून द्या, असे आवाहन गोकुळ दूध संघाचे संचालक मुरलीधर जाधव यांनी केले.**



२०२४ ची लोकसभा निवडणूक अत्यंत महत्वाची निवडणूक असून देशाला एका वेगळ्या उंचीवर घेवून जाणारी व देशाचे भवितव्य घडवणारी निवडणूक आहे. गेल्या १० वर्षाच्या काळात सर्व क्षेत्रात व सर्वच घटकांना सोबत घेत विकासाचा रथ जोरदारपणे पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात घौडदौड करत आहे. सामान्य माणसांच्या आयुष्यात आनंद देण्यासाठी, त्यांचे जीवन अधिक सुखकर होण्यासाठी अनेक निर्णय व धोरणे स्वीकारत विकसित भारताची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी केंद्र व राज्य सरकार प्रयत्नशील आहे. त्यामुळे हा विकासरथ अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुतीचे उमेदवार खासदार धैर्यशील माने यांनाच विजयी करावे, असे मत मुरलीधर जाधव यांनी व्यक्त केले.

देशातील तमाम देशप्रेमी नागरिकांना अभिप्रेत असे कलम ३७० रद्द करणे व जगाला हेवा वाटेल असे भव्य राम मंदिर अयोध्येत उभे राहिल्याने देशहितासाठी पुढील काळात अनेक निर्णय घेण्याची धमक पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वातील सरकारच सक्षमपणे घेवू शकते. त्यामुळे पंतप्रधान मोदींनी दिलेला 'अब की बार, ४०० पार' व महाराष्ट्रात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'महाराष्ट्रात महायुती ४५ + पार' चा नारा यशस्वी करणेसाठी हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार धैर्यशील माने यामध्ये असणे ही मतदासंघांतील आपणां सर्वांची जबाबदारी आहे. त्यामुळे त्यांना धनुष्यबाण चिन्हासमोरील बटण दाबून विजयी करावे व आपली सेवा करण्याची संधी द्यावी, असे आवाहनही गोकुळचे संचालक मुरलीधर जाधव यांनी केले.

## मतदानासाठी नियुक्त असलेल्या

# अधिकारी, कर्मचाऱ्यांनी बजावला मतदानाचा हक्क

इचलकरंजी,ता.४–

हातकणंगले लोकसभा मतदारसंघ अंतर्गत इचलकरंजी विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शनिवारी येथील व्यंकोबा मैदानजवळील डीकेटीई हायस्कूल याठिकाणी मतदानाचा हक्क बजावला.

निवडणूक कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी आणि कर्मचारी यांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी त्यांना त्यांच्या नेमणुकीच्या ठिकाणीच मतदान करणेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. मात्र पर जिल्ह्यात असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानासाठी त्यांच्या मतदान केंद्रावर जाता येत नसल्याने त्यांच्यासाठी कामाच्या नियुक्त ठिकाणी मतदान केंद्राची सुविधा निर्माण करण्यात आली होती. त्याठिकाणी शनिवारी सकाळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मोसमी चौगुले, महानगरपालिका उपायुक्त प्रसाद काटकर, उपनिबंधक सदाशिव जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी विकास खोळपे, मुख्य लेखा परीक्षक आरती खोत पाटील यांच्यासह निवडणूक कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेल्या वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी, पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी मतदान केले. यामध्ये बारामती, सांगली, माढा आदी लोकसभा मतदारसंघातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

प्रारंभी केंद्र अधिकारी यांनी मतदानासाठी आलेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. चौगुले यांनी मतदान केंद्रातील कर्मचाऱ्यांना पुष्प देऊन त्यांचे अभिनंदन केले.



मतदानाचा हक्क बजावल्यानंतर मतदानाची खूण दाखवताना अधिकारी वर्ग. (छाया.–छोटूसिंग)




# शेट्टींच्या आंदोलनामुळे शेतकऱ्यांच्या पदरात चार पैसे – दत्तप्रसाद सरूडकर

शिराळा,ता.४(प्रतिनिधी)–

**राजू शेट्टी यांच्या आंदोलनामुळे आमच्या सारख्या शेतकऱ्यांच्या पदरात चार पैसे येतात, म्हणून मी राजू शेट्टी यांच्या पाठीशी उभा आहे. असे सांगत सत्यजीत पाटील सरूडकर यांचे बंधू दत्तप्रसाद पाटील–सरूडकर यांनी राजू शेट्टी यांना पाठिंबा दिला. ते येथील प्रचार सभेत येऊन त्यांनी आपला पाठिंबा दर्शवला.**

यावेळी बोलताना दत्तप्रसाद पाटील म्हणाले, मी राजू शेट्टी यांच्या आंदोलनाचा चाहता आहे. यांच्या सारखी माणसे संसदेत जायला हवीत. संसदेत आवाज दाबला जातो. खासदारांना बोलू दिले जात नाही. म्हणून आपल्याला बोलणारा खासदार हवा आहे. लढणारा खासदार हवा आहे. जगात फुकट काही मिळत नाही. अन्यायाविरूध्द बंड करून उठले तरच तुम्हाला न्याय मिळणार आहे. शेट्टी यांनी ३० वर्षे संघर्षात घालवलेली आहेत. कोणीही उठेल मी काम न करता निवडून येईल, असे सांगून हवा निर्माण केली जात आहे. संसदेत जाऊन भावनिक होऊन चालत नाही. तर अबोला असलेल्या संसदेत तुमचा आवाज घुमला पाहिजे. तो आवाज फक्त राजू शेट्टीच तुमचा आंवाज बनू शकतात. शाहूवाडी तालुक्यातील दुर्गम भागातील शेतकऱ्यांना शेट्टी यांच्या शिवाय वालीच नाही. त्यांच्या आंदोलनामुळे आम्हाला न्याय मिळाला आहे. सर्वसामान्य जनता त्यांच्या पाठीशी राहतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी स्वाभिमानी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. जालंधर पाटील, संदीप जगताप, राजेंद्र गड्ड्यान्नावर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## मारहाणीत युवक जखमी

कोल्हापूर ता.४(प्रतिनिधी)–

कदमवाडी येथील एका हॉस्पिटलजवळ चहाच्या टपरीवर चहा पिण्यासाठी थांबलेले अमृत सतीश बिडू (वय ३३, रा. नागाळा पार्क, कोल्हापूर) यांना सौरभ कागिनकर उर्फ माका (रा. कदमवाडी) याने मारहाण केली. विनाकारण शिवीगाळ आणि मारहाण केल्याबद्दल जखमी अमृत यांनी कागिनकर याच्या विरोधात शाहूपुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी संशयित कागिनकर याच्यावर गुन्हा दाखल केला.

## पूर्ववैमनस्यातून एकास मारहाण

कोल्हापूर ता.४(प्रतिनिधी)–

**रंकाळा येथील जाऊळाचा गणपती मंदिराजवळ बोलवून घेऊन शरद महादेव पोवार (वय ३५, रा. पट्टणकोडोली, ता. हातकणंगले) यांना सात ते आठ जणांनी पूर्ववैमनस्यातून मारहाण केली. हा प्रकार गुरुवारी (दि. २) रात्री साडेआठच्या सुमारास घडला.**

याबाबत पोवार यांनी जुना राजवाडा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून, संशयित हल्लेखोर सुशांत शिवप्रसाद कोरे, मानव साठे, सुशांत कोरे (तिघे रा. पन्हाळा) यांच्यासह अनोळखी तीन ते चार जणांवर गुन्हा दाखल झाला.

# डीकेटीई आणि बांग्लादेशची सीबीयुएफटी युनिर्व्हसिटी यांच्यात सामंजस्य करार

इचलकरंजी,ता.४–

**डीकेटीईचा बांग्लादेशमधील सीबीयुएफटी युनिर्व्हसिटी फॅशन अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी यांच्याशी सामंजस्य करार झाला असून करारामुळे डीकेटीई इन्स्टिटयुट व सीबीयुएफटी विद्यापीठांशी शिक्षण आणि संशोधन याबाबत आदान–प्रदान करण्यात आले. संशोधनातून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढीस लावणे हा दृष्टीकोन डोळयासमोर ठेवून यापूर्वी डीकेटीईने २८ नामांकित आंतरराष्ट्रीय विद्यापीठांशी विद्यार्थी कल्याणासाठी सामंजस्य करार केलेले आहेत.**




डीकेटीई आणि बांग्लादेशची सीबीयुएफटी युनिर्व्हसिटी यांच्यात सामंजस्य कराराप्रसंगी घेतलेले छायाचित्र.

बांग्लादेश मधून शैक्षणिक, औद्योगिक, प्लेसमेंटस, अ‍ॅडमिशन या संबंधीत वरचेवर सेवा देण्यासाठी यापूर्वी डीकेटीईला निमंत्रित केले गेले होते. डीकेटीईचे आंतरराष्ट्रीय शैक्षणिक कार्याचा आढावा घेतल्यानंतर सीबीयुएफटी युनिर्व्हसिटी फॅशन अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजीचे व्हॉईस चान्सलर यांनी डीकेटीई समोर कराराचा प्रस्ताव मांडला.

त्यासअनुसरुन सीबीयुएफटी युनिर्व्हसिटी फॅशन अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी बांग्लादेशमधील डायरेक्टर आयक्युएसी, प्रा. काझी नझमुल हुडा, डीन– मुशुहर रेहमान व प्रा. इमान बिस्वास यांनी डीकेटीईस भेट दिली व डीकेटीई आणि सीबीयुएफटी यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला. या सामंजस्य करारावेळी डीकेटीईच्या मानद सचिव डॉ. सपना आवाडे, ट्रस्टी रवी आवाडे, प्र. संचालिका प्रा.डॉ. एल. एस.आडमुठे,डॉ. एम. वाय. गुडियावर व इतर प्राध्यापक उपस्थित होते. डॉ. एस. एस. लवटे यांनी डे. डायरेक्टर डॉ. यु.जे.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करार यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले.

## दुचाकी चोरणाऱ्या तिघांना अटक

सांगली,ता.४ (प्रतिनिधी)–

महाराष्ट्रासह कर्नाटकातील विविध ठिकाणाहून दुचाकी चोरणाऱ्या तिघांच्या आंतरराज्य टोळीला सांगली पोलिसांकडून अटक करण्यात आली. त्यांच्याकडून ११ लाख ५० हजार रूपयांच्या १९ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. विजय पुंडलीक माने (वय ४०, रा. दानोळी, ता. शिरोळ), मुऱ्याप्पा नरसिंग हाबगोंडे (वय ३०, रा. जिरग्याळ, ता. जत, जि. सांगली), अन्सार अक्रम बुरान (वय २१, रा. कागवाड, जि. बेळगाव) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

हार्दिक शुभेच्छा



मा. डॉ. राजेंद्र पाटील - यड्रावकर
माजी राज्यमंत्री, आमदार, मा. डॉ. राजेंद्र पाटील (यड्रावकर) यांना ५५ व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
मे. डेक्कन पॉलीमर्स
रबर गुडसचे उत्पादक व विक्रेते, जयसिंगपूर.

हार्दिक शुभेच्छा!



मा. डॉ. राजेंद्र पाटील - यड्रावकर
माजी राज्यमंत्री, आमदार, मा. डॉ. राजेंद्र पाटील (यड्रावकर) यांना ५५ व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
मे. रामचंद्र अ‍ॅण्ड कंपनी
कप्लींगचे अधिकृत विक्रेते, सांगली

हार्दिक शुभेच्छा



माजी राज्यमंत्री, आमदार, मा. डॉ. राजेंद्र पाटील (यड्रावकर) यांना ५५ व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
मा. डॉ. राजेंद्र पाटील - यड्रावकर
मे. ईलाईट इंजिनिअर्स
व्हि. डी. पाटील व सचिन रायनाडे
शुगर मिल स्पेअर्स व इक्युपमेंटचे उत्पादक व सप्लायर्स, जयसिंगपूर.

हार्दिक शुभेच्छा



आमचे आदरणीय लोकप्रिय आमदार डॉ. राजेंद्र पाटील – यड्रावकर यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
मा. डॉ. राजेंद्र पाटील - यड्रावकर
ज्युबिली डाईंग अ‍ॅण्ड प्रिटींग घोडावत ग्रुप

हार्दिक शुभेच्छा



माजी राज्यमंत्री, आमदार, मा. डॉ. राजेंद्र पाटील (यड्रावकर) यांना ५५ व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
मा. डॉ. राजेंद्र पाटील - यड्रावकर
मे. जिनश्री टेक्नो फॅब
(फॅब्रिकेशन कॉन्ट्रॅक्टर, यड्राव)

हार्दिक शुभेच्छा



डॉ. राजेंद्र पाटील - यड्रावकर
शिरोळ तालुक्याचे लोकप्रिय आमदार डॉ. राजेंद्र पाटील– यड्रावकर यांना वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा!
शुभेच्छुक
सौ. रेखा अर्जुन जाधव, लोकनियुक्त सरपंच
मा. श्री. हयातचांद हसन जमादार, उपसरपंच
सर्व ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी व ग्रामस्थ
हेरवाड ग्रामपंचायत, हेरवाड

हार्दिक शुभेच्छा!




डॉ. राजेंद्र पाटील - यड्रावकर
शिरोळ तालुक्याचे लोकप्रिय आमदार डॉ. राजेंद्र पाटील– यड्रावकर यांना वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा!
शुभेच्छुक
मा. श्री. धनपाल भाऊ मरजे, चेअरमन
मा. श्री. वसंत दत्तू मांजरे, व्हा. चेअरमन
सर्व संचालक, सभासद व कर्मचारी वर्ग
बुबनाळ सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित, बुबनाळ
मा. श्री. विद्यासागर धनपाल मरजे (आण्णा), चेअरमन
मा. श्री. बापूसो गणपती राजमाने, व्हा. चेअरमन
सर्व संचालक, सभासद व कर्मचारी वर्ग
स्व. शामराव पाटील-यड्रावकर विविध कार्यकारी विकास सेवा संस्था मर्यादित, बुबनाळ

दैनिक महासत्ता वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!
श्री दुधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि.,
बिद्री (मौनीनगर) ता.कागल, जि.–कोल्हापूर



श्री.के.पी.पाटील
अध्यक्ष




श्री.गणपतराव गुंडू फराकटे
उपाध्यक्ष


संचालक मंडळ
सन २०२३ ते २०२८

श्री.के.पी.पाटीलसो–चेअरमन
श्री.गणपतराव गुंडू फराकटे– व्हा.चेअरमन
श्री.प्रविणसिंह विश्वनाथ पाटील–संचालक
श्री.सुनिलराज सुरेशराव सुर्यवंशी – संचालक
श्री.धनाजी रामचंद्र देसाई – संचालक
श्री.राजेंद्र पांडुरंग पाटील – संचालक
श्री. पंडीतराव दत्तात्रय केणे – संचालक
श्री.उमेश नामदेवराव भोईटे – संचालक
श्री.मधुकर कुंडलिक देसाई – संचालक
श्री. केरबा नामदेव पाटील – संचालक
श्री. दत्तात्रय श्रीपती पाटील – संचालक
श्री. सत्यजित दिनकरराव जाधव –संचालक
श्री. राहुल बजरंग देसाई – संचालक
श्री. राजेंद्र कृष्णाजी मोरे – संचालक
श्री. रंगराव विठ्ठल पाटील – संचालक
श्री. दिपक ज्ञानू किल्लेदार – संचालक
श्री. रवींद्र आण्णासो पाटील – संचालक
श्री. राजेंद्र पांडुरंग भाटळे – संचालक
श्री. संभाजीराव बापूसो पाटील (एस.बी.)–संचालक
श्री. फिरोजखान जमालसो पाटील – संचालक
श्री. रणजित आनंदराव मुडूकशिवाले – संचालक
श्री. रामचंद्र शंकर कांबळे – संचालक
सौ. क्रांती उर्फ अरुंधती संदिप पाटील – संचालिका
सौ. रंजना आप्पासो पाटील – संचालिका
श्री. सिद्राम रावसाहेब खिलारी – संचालक
श्री. फत्तेसिंग रामसिंग भोसले–पाटील – तज्ञ संचालक
श्री. आर.डी.देसाई – व्यवस्थापकीय संचालक
श्री. के.एस.चौगले – कार्यकारी संचालक











## टिचकी

मतदान आलं तोंडावर,
उमेदवाराने घेतली माघार
पक्षनेतृत्वाची झाली कोंडी
जिंकण्याआधीच पदरात हार



## व्यक्तीवेध

# कॉन्स्टेबल ते खासदार

अठराव्या लोकसभा निवडणुकीचे दोन टप्पे पूर्ण झाले आहेत. राजकीय पक्ष आपापल्या निवडणूक प्रचारात आणि तिसऱ्या टप्प्याच्या तयारीत व्यस्त आहेत. ७ मे रोजी तिसऱ्या टप्प्यात गुजरातमधील सर्व २६ जागांसाठी एकाच दिवशी निवडणूक होणार आहे. गुजरातमधील नवसारी ही लोकसभा ही देशभरात प्रसिद्ध आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अत्यंत जवळचे असलेले गुजरात भाजपचे अध्यक्ष सीआर पाटील यांना पुन्हा एकदा या लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. सध्याही ते तिथून खासदार आहेत. अमित शहा यांच्यानंतर सीआर पाटील यांची गुजरातमधील भाजपच्या सर्वात मोठ्या उमेदवारांमध्ये गणना केली जात आहे.

२०२० मध्ये प्रदेशाध्यक्ष झाले त्यांच्यातील उत्कृष्ट व्यवस्थापन



कौशल्य लक्षात घेऊन भाजपाने जुलै २०२० मध्ये पाटील यांच्याकडे भाजप गुजरात राज्याची जबाबदारी सोपवली. २०२२ च्या गुजरात विधानसभा निवडणुकीत भाजपने ऐतिहासिक विजय नोंदवला होता. याचे श्रेय पीएम मोदींना देण्यात आले. त्यावेळी मीडियाने सीआर पाटील यांच्या नेतृत्वाचेही कौतुक केले होते. पाटील हे पंतप्रधान मोदींच्या कोअर टीमचा एक भाग आहेत. वाराणसीत पंतप्रधानांच्या निवडणुकीची महत्त्वाची जबाबदारीही पाटील यांनी दीर्घकाळ सांभाळली आहे.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत सीआर पाटील यांनी नवसारी जागेवर विजयाचे सर्व विक्रम मोडीत काढले होते. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत सर्वाधिक मतांनी विजयी झालेले पाटील खासदार झाले. त्या निवडणुकीत सीआर पाटील यांना ९,७२,७३९ मते मिळाली. तर त्यांचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे उमेदवार धर्मेश पटेल यांचा ६,८९,६८८ मतांनी पराभव झाला.

सीआर पाटील हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सर्वात खास नेते मानले जातात. त्यांचे पूर्ण नाव चंद्रकांत रघुनाथ पाटील. पाटील यांनी सर्वाधिक मताधिक्याने विजयी होण्याचा नवा विक्रम केला आहे. १९५५ मध्ये महाराष्ट्रातील जळगाव येथे जन्मलेल्या सीआर पाटील यांनी १९८९ मध्ये भाजपमध्ये प्रवेश केला. भाजपमध्ये येण्यापूर्वी पाटील यांनी १९७५ च्या सुमारास गुजरात पोलिसातील कॉन्स्टेबलची नोकरी केली. पोलीस खात्यात असतानाच पोलिसांच्या समस्या सोडवण्यासाठी सीआर पाटील यांनी एक संघटना स्थापन केली होती. पण सरकारी खात्यामध्ये संघटना स्थापन करणे त्यांच्या वरिष्ठांच्या पचनी पडलं नाही. त्यामुळे त्यांना निलंबितही करण्यात आलं. त्यामुळे सीआर पाटील यांनी नोकरीला रामराम ठोकलात्यानंतर एका सहकारी बँकेचे संचालनही ते करत होते. त्यांनी सुरतमध्ये दीर्घकाळ पक्षाचे काम केले. २००९ मध्ये पाटील यांना तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी पहिली संधी दिली होती. नवसारीतून लढून सीआर पाटील पहिल्यांदाच संसदेत पोहोचले. पाटील यांना पहिल्याच निवडणुकीत ४ लाख २५ हजारांहून अधिक मते मिळाली होती. त्यांनी काँग्रेसचे उमेदवार धनसुख राजपूत यांचा १.३२ मतांनी पराभव केला.

गुजरातमधील पटेल, जैन, शाह आणि मेहतांच्या गराड्यात मराठमोळे सीआर पाटील यांनी आपलं वेगळं स्थान निर्माण केलंय गुजरातमधील भाजपच्या सर्वात श्रीमंत राजकारण्यांमध्ये पाटील यांची गणना होते. गुजरात इलेक्शन वॉच असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सच्या मते, पाटील यांच्याकडे ४४.६ कोटी रुपयांची संपत्ती आहे, तर त्यांच्यावर ५.६८ कोटी रुपयांचे कर्ज आहे. ते गुजरातमधील सर्वाधिक संपत्ती असलेले खासदार मानले जातात.

सी. आर. पाटील यांनी गुजरातच्या प्रदेशाध्यक्षपदी विराजमान झाल्यानंतर राज्यभरातल्या मतदारसंघांमध्ये पेज कमिटींची स्थापना केली. या पेज कमिटींद्वारे कार्यकर्त्यांची मते जाणून घेण्याचे सत्र सुरू केले. अख्ख्या गुजरातमध्ये वादळी दौरे सुरु केले. कोरोना काळात सीआर पाटील यांनी केलेल्या कार्याचं तर अख्ख्या गुजरातेत कौतुक झालं.

२०२२ ची विधानसभा निवडणूक ही सीआर पाटील यांच्या आयुष्यातली सर्वात मोठी परीक्षा होती. कारण समोर काँग्रेससोबत नव्याने आलेल्या आम आदमी पक्षाचं आव्हान होतं. टीका चौफेर सुरु होती, पण सीआर पाटील यांचा तोल कधीच ढळला नाही. ते जीव तोडून प्रचार करत राहिले आणि त्याचा परिणाम समोर आहे.

भिवंडी लोकसभा मतदारसंघात २००९ मध्ये येथे पहिल्यांदाच लोकसभेची निवडणूक झाली होती. या निवडणुकीत काँग्रेसने सुरेश तावरे यांना तर भाजपने जगन्नाथ पाटील यांना उमेदवारी दिली होती. तर मनसेने देवराज म्हात्रे यांना उमेदवारी जाहीर केली. या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या सुरेश तावरे यांना १,८२,७८९ तर भाजपच्या जगन्नाथ पाटील यांना १,४१,४२५ मते मिळाली होती. काँग्रेस आणि भाजपच्या विजय आणि पराभवात ४१ हजार ३६४ मतांचा फरक होता. यंदा बऱ्याच काथ्याकुटानंतर भिवंडी लोकसभा मतदार संघाचे चित्र स्पष्ट झाले. भाजपच्या कपिल पाटील यांच्यासमोर शरद पवार गटाने स्थानिक नेते बाल्या मामा उर्फ सुरेश म्हात्रे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे कपिल पाटील यांच्यासमोर आव्हान उभे राहिले असून, इतर लोकसभा मतदारसंघाप्रमाणे भिवंडी लोकसभा निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# भिवंडीमध्ये यंदा होणार 'कांटे की टक्कर'

भिवंडी लोकसभा मतदारसंघ हा ४८ मतदार संघापैकी एक आहे. हा मतदार संघ ठाणे जिल्ह्यात येतो. हा परिसर भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेच्या प्रशासन क्षेत्रात येतो. भिवंडीच्या ऐतिहासिक परिस्थितीबद्दल सांगायचे तर, मुघलांनी त्यांच्या राजवटीत येथे ईदगाह बांधला होता, त्याला आता ईदगाह चौक असे म्हणतात. येथे हातमागाची संख्या प्रचंड आहे. कापड निर्मितीसाठी हे शहर प्रसिद्ध आहे. या जागेच्या राजकीय परिस्थितीबद्दल बोलायचे झाले तर २००९ मध्ये येथे पहिल्यांदाच लोकसभेची निवडणूक झाली होती. या निवडणुकीत काँग्रेसने सुरेश तावरे यांना तर भाजपने जगन्नाथ पाटील यांना उमेदवारी दिली होती. तर मनसेने देवराज म्हात्रे यांना उमेदवारी जाहीर केली.

२००९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या सुरेश तावरे यांना १,८२,७८९ तर भाजपच्या जगन्नाथ पाटील यांना १,४१,४२५ मते मिळाली होती. तर मनसेचे देवराज मात्रे यांना १,०७,०९० मते मिळाली. काँग्रेस आणि भाजपच्या विजय आणि पराभवात ४१ हजार ३६४ मतांचा फरक होता.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने कपिल पाटील यांना रिंगणात उतरविले होते. तर काँग्रेसने विश्वनाथ रामचंद्र पाटील आणि मनसेने सुरेश गोपीनाथ म्हात्रे यांना रिंगणात उतरवले होते. तर भाजपचे कपिल पाटील यांना ४,११,०७० मते मिळाली. तर काँग्रेसचे विश्वनाथ रामचंद्र पाटील यांना ३,०१,६२० मते मिळाली. विजय आणि पराभवामध्ये सुमारे १,०९,४५० मतांचा फरक होता. तसेच २०१९ च्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने कपिल पाटील यांना उमेदवारी दिली. त्याचवेळी काँग्रेसने सुरेश काशिनाथ तावरे यांना उमेदवारी दिली. वंचित बहुजन आघाडीने अरुण दामोदर



सावंत यांना उमेदवारी दिली. निवडणुकीत भाजप उमेदवाराला ५,२३,५८३ मते मिळाली, तर काँग्रेसला ३,६७,२५४ मते मिळाली. विजय आणि पराभव यातील फरक १,५६,३२९ मतांचा होता, तर एकूण १०,०५,६०५ मते पडली.

पूर्वीच्या डहाणू आणि ठाणे लोकसभा मतदार संघातील काही भाग मिळून भिवंडी मतदार संघ तयार करण्यात आला आहे. भिवंडी लोकसभा मतदार संघात भिवंडी पूर्व,भिवंडी पश्चिम, शहापूर,कल्याण पश्चिम,भिवंडी ग्रामीण आणि कल्याण पश्चिम असे सहा मतदार संघ येत असून यातील भिवंडी पूर्व मधून समाजवादी पक्षाचे रईस शेख सोडले तर इतर पाचही मतदार




संघात युतीचे आमदार आहेत जवळपास ३५ लाख लोकसंख्या आणि तब्बल २० लाखापेक्षा जास्त मतदार असलेल्या भिवंडी मतदार संघात,तब्बल चार लाखापेक्षा जास्त मुस्लिम मतदार असून त्या खालोखाल साडेतीन लाखा पेक्षा जास्त आगरी, कोळी, तर कुणबी मतदार हे ३ लाखाच्या आसपास असून आदिवासी अडीच लाखापेक्षा जास्त आहेत. त्यामुळे विजयाचा फॅक्टर सर्वच जाती धर्माची मते याठिकाणी असल्याचे चित्र आहे. मुस्लिम समाज लोकसभा निवडणुकीत काँग्रेसमागे उभा राहतो असा आजवरचा अनुभव आहे. आगरी समाजाची मते काँग्रेस, भाजपमध्ये विभागली जातात.

यंदा बऱ्याच काथ्याकुटानंतर भिवंडी लोकसभा मतदार संघाचे चित्र स्पष्ट झाले. भाजपच्या कपिल पाटील यांच्यासमोर शरद पवार गटाने स्थानिक नेते बाल्या मामा उर्फ सुरेश म्हात्रे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे कपिल पाटील यांच्यासमोर आव्हान उभे राहिले असून, इतर लोकसभा मतदारसंघाप्रमाणे भिवंडी लोकसभा निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

भिवंडी लोकसभा मतदारसंघातून २००९ मध्ये काँग्रेसचे सुरेश टावरे हे निवडून आले होते. २०१४ आणि २०१९ मध्ये याठिकाणी भाजपचे कपिल पाटील हे निवडून आले असे असले तरी याठिकाणी काँग्रेसच्या उमदेवाराला दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली होती. या मतदार संघात काँग्रेस पक्षाचे पारंपारिक मतदार आहेत. त्यामुळे ही जागा काँग्रेसला मिळावी, असा आग्रह पदाधिकाऱ्यांनी धरला होता. परंतु महाविकास आघाडीच्या जागावाटपात भिवंडीची जागा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वाट्याला गेल्याने काँग्रेसचे पदाधिकारी नाराज होते आणि यातूनच त्यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा) यांच्या प्रचाराकडे पाठ फिरवली होती. तसेच काँग्रेसचे माजी खासदार सुरेश टावरे आणि काँग्रेसचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांनी सुरेश म्हात्रे यांच्याविरोधात उघडपणे नाराजी व्यक्त करत त्यांचा प्रचार करणार नसल्याचे म्हटले होते. यामुळे भिवंडीत महाविकास आघाडीत अलबेल नसल्याचे चित्र होते. काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या नाराजीचा फटका निवडणुकीत बसण्याची शक्यता लक्षात घेऊन महाविकास आघाडीच्या नेत्यांनी भिवंडीतील नेत्यांमध्ये समेट घडविण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. त्याचबरोबर काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांकडून भिवंडीतील नाराज पदाधिकाऱ्यांची समजूत काढण्यात येत होती. अखेर प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी नाराज पदाधिकाऱ्यांची चर्चा करून त्यांची समजुत काढल्याचे चित्र आहे.

कोणतीही राजकीय घराणेशाही नसलेले बाल्या मामा यांनी आपल्या राजकीय जीवनाला शिवसेना पक्षातून सुरुवात केली. पक्षात विविध पदे भूषवली आणि जनमानसात एक ओळख निर्माण केली. २००७ मध्ये त्यांच्या पत्नीने कोन जिल्हा परिषद मतदार संघातून पहिली निवडणूक लढवली आणि मोठ्या मतांनी जिंकली. २००९ मध्ये खुद्द बाल्या मामा यांनी विधानसभा निवडणुकीत नशीब आजमावले. मात्र, त्यावेळी त्यांना पराभव पत्करावा लागला. मात्र, त्यांनी पुन्हा २०१४ मध्ये मनसे कडून भिवंडी लोकसभा निवडणुकीत उभे राहत त्यांनी लाखभर मते घेत चांगली लढत देण्याचा प्रयत्न केला. या सलग दोन पराभवाने खचत न जाता त्यांनी २०१७ मध्ये कोन जिल्हा परिषद मतदार संघातून निवडणूक लढवली आणि यावेळी जिंकली. याच जोरावर त्यांना २०१८ मध्ये जिल्हा परिषद बांधकाम सभापती पदाची जबाबदारी देण्यात आली. या काळात त्यांनी अनेक लोकाभिमुख कामे केली आणि

### दृष्टिक्षेप मागील मतदानावर

| पक्ष | उमेदवार | २०१९ |
|---|---|---|
| भाजपा | कपिल पाटील | ५,२३,५८३ |
| काँग्रेस | सुरेश तावरे | ३,६७,२५४ |
| वंचित | अरुण सावंत | ५१,४५५ |
| **पक्ष** | **उमेदवार** | **२०१४** |
| भाजपा | कपिल पाटील | ४,११,०७० |
| काँग्रेस | विश्वनाथ पाटील | ३,०१,६२० |
| मनसे | सुरेश म्हात्रे | ९३,६४७ |

## भिवंडी लोकसभा मतदारसंघ

भिवंडी लोकसभा मतदार संघात आपली ओळख निर्माण केली.

दुसरीकडे २०१४ पासून या मतदारसंघातून भाजपचे खासदार कपिल पाटील हे निवडून येत आहेत. यंदाही त्यांना भाजपने पुन्हा उमेदवारी दिली आहे. परंतु मुरबाडचे भाजप आमदार किसन कथोरे आणि कपिल पाटील यांच्यात शीतयुद्ध सुरू असल्याचे सातत्याने समोर येत असून कथोरे हे पाटील यांना निवडणुकीत मदत करणार का असा प्रश्न उपस्थित होत होता. त्यानंतर दोन्ही नेत्यांमध्ये मनोमिलन झाल्याचेही समोर आले होते. तसेच मध्यंतरी शिंदेच्या सेनेचे ठाणे ग्रामीण जिल्हाप्रमुख मारुती धिर्डे यांनी पत्रकार परिषद घेऊन कपिल पाटील यांच्यावर आरोप केले होते. भिवंडी मतदारसंघ शिवसेनेलाच द्यावा अन्यथा आम्ही आगामी निवडणुकीमध्ये भाजपा उमेदवाराचे काम करणार नसल्याचा इशारा त्यांनी दिला होता. यामुळे यंदाची निवडणूक पाटील यांच्यासाठी सोपी नाहीये.

भिवंडी लोकसभा मतदार संघात पिण्याच्या पाण्याची खूप मोठी समस्या अजूनही तशीच असून कपिल पाटील यांना ती सोडविण्यात हवे तसे यश मिळाले नसल्याचे चित्र आहे. प्रचंड मोठी वाहतूक कोंडी, लोकल रेल्वेची सेवा, महिलांना विशेष लोकल फेऱ्या किंवा लोकलच्या वाढीव फेऱ्या त्याच प्रमाणे रेल्वे स्टेशनची दुरवस्था, सुसज्ज खेळाचे मैदान, मागील पाच वर्षात केंद्राच्या माध्यमातून एखादा मोठा प्रकल्प ज्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होऊन बेरोजगार तरुणांना नोकरी मिळू शकेल असा एखादा प्रकल्प कपिल पाटील यांनी आणला नसल्याचे दिसून येत आहे. यासह नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दी.बा पाटील यांचे नाव देण्यासाठी कपिल पाटील यांनी घेतलेला पुढाकार मात्र त्या हवे तसे यश मिळाले नसल्याचे दिसून येत असल्याने विरोधक हा ही मुद्दा प्रचारासाठी मोठा मुद्दा म्हणून वापरला जाणार असल्याचे बाल्या मामा यांनी सांगितले. त्यामुळे सलग दोन टर्म असलेले खासदार कपिल पाटील आणि आघाडीचे उमेदवार बाल्या मामा उर्फ सुरेश म्हात्रे या दोन्ही स्थानिक उमेदवारांध्ये काटे की टक्कर होणार असल्याचे चित्र भिवंडी लोकसभा मतदार संघात दिसून येत आहे.

## फ्लॅशबॅक

# इंदिरा गांधी आणि स्विस बँकेतील पैसा

देशाच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यावर निवडणूक खर्चासाठी स्विस बँक खात्यातून ६० कोटी रुपये काढल्याचा आरोप होता. या प्रकरणावरून देशात आणि परदेशात मोठा वाद निर्माण झाला होता. केवळ भारतीय राजकीय वर्तुळातच नाही तर स्वित्झर्लंडच्या संसदेतही याविषयी बराच गदारोळ झाला होता.

३१ डिसेंबर १९७९ रोजी प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, तत्कालीन पंतप्रधान चौधरी चरण सिंह यांनी भुवनेश्वरमधील भाषणादरम्यान इंदिरा गांधींच्या स्विस खात्यातून पैसे काढल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. यानंतर भारत सरकारने स्विस अधिकाऱ्यांकडे चौकशीची मागणी केली. तथापि,



अधिकारक्षेत्रातील गुंतागुंतीमुळे निधीचा मागोवा घेणे अत्यंत आव्हानात्मक बनले.

सुरुवातीला ४० कोटी रुपये काढल्याची चर्चा होती मात्र नंतर खरी रक्कम ६० कोटी रुपये असल्याचे उघड झाले. लखनऊच्या हजरत महल पार्कमध्ये चरणसिंह यांनी एका निवडणूक रॅलीला संबोधित करताना, इंदिरा आणि संजय गांधींनी १०,००० जीप खरेदी करण्यासाठी वापरलेल्या पैशाच्या स्रोतावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी मुंबईत येणाऱ्या परकीय पैशाच्या प्रवाहावरही प्रकाश टाकला. तसेच तो कोठून येत आहे आणि याच ानिवडणुकीच्या अखंडतेवर होणारा परिणाम याबद्दल चिंता व्यक्त केली.

## दृष्टीक्षेप

# चौथ्या टप्प्यातील उमेदवारांची प्रतिज्ञापत्रे काय दर्शवतात?

देशात लोकसभेच्या निवडणुका १९ एप्रिल ते १ जून या कालावधीत सात टप्प्यांत होणार आहेत. पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यासाठी मतदान झाले आहे. तिसऱ्या आणि चौथ्या टप्प्यासाठी उमेदवारी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. दरम्यान, असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सने चौथ्या टप्प्यात निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या प्रतिज्ञापत्रांचे विश्लेषण केले आहे. या टप्प्यात एकूण १७१७ उमेदवार रिंगणात आहेत. यापैकी १७१० उमेदवारांच्या प्रतिज्ञापत्रांचे विश्लेषण करण्यात आले आहे. सात उमेदवारांची प्रतिज्ञापत्रे स्पष्ट नसल्यामुळे त्यांच्या प्रतिज्ञापत्रांचे विश्लेषण होऊ शकले नाही.

एडीआरने जारी केलेल्या विश्लेषणात म्हटले आहे की पहिल्या टप्प्यातील १७१० उमेदवारांपैकी ३६० जणांवर फौजदारी खटले प्रलंबित आहेत. तर ४७६ उमेदवार कोट्यधीश आहेत. एडीआरच्या अहवालात काय आहे ते जाणून घेऊया?

उमेदवारांची गुन्हेगारी पार्श्वभूमी

१७१० उमेदवारांपैकी ३६० (२१ टक्के) उमेदवारांनी स्वत:वर फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत. १७१० उमेदवारांपैकी २७४ (१६ टक्के) उमेदवारांनी स्वतःविरुद्ध गंभीर गुन्हे दाखल केले आहेत. १७ उमेदवारांनी स्वत:च्या विरोधात गुन्हे दाखल केले आहेत. ११ उमेदवारांनी स्वतःविरुद्ध खुनाचे गुन्हे घोषित केले आहेत तर ३० उमेदवारांनी खुनाच्या प्रयत्नाचे गुन्हे घोषित केले आहेत. महिलांवरील अत्याचाराचे गुन्हे दाखल झालेले ५० उमेदवार आहेत. या ५० उमेदवारांपैकी पाच उमेदवारांवर बलात्काराचा गुन्हा दाखल आहे. याशिवाय एकूण ४४ उमेदवार असे आहेत की ज्यांच्यावर भडकाऊ भाषणाचे गुन्हे दाखल आहेत.

पक्षनिहाय आकडेवारी काय?

चौथ्या टप्प्यातील तीनही



एमआयएम उमेदवारांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. त्याचवेळी शिवसेनेचे तीनपैकी दोन, बीआरएसचे १७ पैकी १०, काँग्रेसचे ६१ पैकी ३५, भाजपचे ७० पैकी ४०, टीडीपीचे १७ पैकी नऊ, बीजेडीचे चारपैकी दोन, भाजपचे ४ पैकी दोन आरजेडीच्या चार, शिवसेनेच्या (यूबीटी) उमेदवारांपैकी दोन, वायएसआर काँग्रेसच्या २५ पैकी १२, टीएमसीच्या आठपैकी तीन आणि सपाच्या १९ पैकी सात उमेदवारांवर गुन्हे दाखल आहेत.

उमेदवारांची मालमत्ता लेखा

१७१० पैकी २८ टक्के म्हणजेच ४७६ उमेदवार करोडपती आहेत. भाजपचे सर्वाधिक ६५ उमेदवार करोडपती आहेत. निवडणूक प्रतिज्ञापत्रात या उमेदवारांनी एक कोटीहून अधिक संपत्ती जाहीर केली आहे. लोकसभा निवडणुकीच्या २०२४ च्या चौथ्या टप्प्यात, प्रत्येक उमेदवाराकडे सरासरी ११.७२ कोटी रुपयांची संपत्ती आहे. पक्षनिहाय आकडेवारी पाहिल्यास भाजपच्या ७० उमेदवारांची सर्वाधिक सरासरी मालमत्ता १०१.७७ कोटी रुपये आहे.

सर्वात श्रीमंत उमेदवार

चौथ्या टप्प्यात सर्वाधिक संपत्ती जाहीर करणारे उमेदवार चंद्रशेखर पेमसानी आहेत. आंध्र प्रदेशातील गुंटूर येथील टीडीपी उमेदवाराने ५७०५ कोटी रुपयांची एकूण संपत्ती जाहीर केली आहे. या बाबतीत भाजपचे कोंडा विश्वेश्वर रेड्डी दुसऱ्या क्रमांकावर आहेत. तेलंगणातील चेवला मतदारसंघातून निवडणूक लढवणाऱ्या रेड्डी यांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रात ४५६८ कोटी रुपयांची संपत्ती जाहीर केली आहे. तिसरे सर्वात श्रीमंत उमेदवार टीडीपी प्रभाकर रेड्डी वेमिरेड्डी आहेत. आंध्र प्रदेशातील नेल्लोर मतदारसंघातून निवडणूक लढवणाऱ्या प्रभाकर यांच्याकडे ७१६ कोटी रुपयांची संपत्ती आहे. तर २४ उमेदवारांनी आपली संपत्ती शून्य असल्याचे जाहीर केले आहे. तर तीन उमेदवारांनी त्यांची मालमत्ता अनुक्रमे ७ रुपये, ८३ रुपये आणि ९० रुपये जाहीर केली आहे.

## हॉट सीट

# साक्षी महाराजांच्या मतदारसंघात...

उन्नाव लोकसभा मतदारसंघातून एनडीएचा प्रमुख घटक भाजपने खासदार साक्षी महाराज यांना तिसऱ्यांदा उमेदवारी दिली आहे, तर 'इंडिया' आघाडीचा प्रमुख पक्ष असणाऱ्या समाजवादी पक्षाने यावेळी माजी खासदार अन्नू टंडन यांना संधी दिली आहे. काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या टंडन यांना सपाने यापूर्वीच पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस म्हणून घोषित केले आहे, तर लोकसभा निवडणुकीत 'एकला चलो'ची घोषणा करणाऱ्या बसप प्रमुखांनी या लढतीला तिरंगी बनवले आहे. अशोक पांडे हे पक्षाचे उमेदवार असले तरी सपा-भाजपमध्येच निवडणूक लढली जाणार असा अंदाज सर्वजण बांधत आहेत.

---

स्वातंत्र्यानंतर निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यापासून पहिल्यांदाच २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा उमेदवार उन्नावमध्ये लढणार नाहीये. त्याऐवजी काँग्रेस सोडून सपामध्ये



दाखल झालेल्या अन्नू टंडन यांना भारतातील प्रमुख पक्ष समाजवादी पक्षाकडून उमेदवारी देण्यात आली आहे. २००९ मध्ये अन्नू टंडन काँग्रेसच्या तिकिटावर विजयी होऊन उन्नावमधून पहिल्या महिला खासदार म्हणून संसदेत पोहोचल्या होत्या. यावेळी त्या सपाच्या तिकीटावर भाजपच्या साक्षी महाराजांना आव्हान देत आहेत.

१९५२ ते २०२४ या ७२ वर्षांच्या राजकीय काळात उन्नाव लोकसभा मतदारसंघातून नऊ वेळा निवडणूक जिंकलेल्या काँग्रेस पक्षाच्या चार प्रतिनिधींमध्ये पंडित विशंभर दयालू त्रिपाठी (दोनदा), लीलाधर अस्थाना (पोटनिवडणूक), कृष्णदेव त्रिपाठी (दोनदा), माजी केंद्रीय मंत्री झेडआर अन्सारी (तीन वेळा) आणि अन्नू टंडन एकदाच संसदेत पोहोचले आहेत. फक्त १९७७ मध्ये जनता पक्षाचे उमेदवार म्हणून स्वर्गीय चौ राघवेंद्र सिंह, १९८९ मध्ये जनता दलाचे स्वर्गीय अन्वर अहमद आणि १९९९ मध्ये समाजवादी पक्षाचे दिवंगत दीपक कुमार यांना येथील मतदारांनी खासदार केले होते. ब्रजेश पाठक (उत्तर प्रदेशचे सध्याचे उपमुख्यमंत्री) २००४ मध्ये बहुजन समाज पक्षाकडून पहिल्यांदा उन्नावचे खासदार झाले. याशिवाय, सध्या केंद्र आणि राज्यात सत्तेत असलेल्या भाजपचे देवीबक्स सिंह आणि साक्षी महाराज तीनदा (एकूण पाच वेळा) खासदार झाले आहेत.

एकंदरीत उन्नावच्या बहात्तर वर्षांच्या लोकशाही व्यवस्थेत लोकसभा निवडणुकीची शिडी चढून १९९९ ते २०२४ (गेली चोवीस वर्षे) येथे बाहेरच्या खासदारांची राजवट चालू आहे. यावेळीही भाजपचा उमेदवार निवडून दिल्यास हॅटट्रीकचे विजेतेपदही बाहेरच्यांच्या हाती येईल, असा विश्वास उन्नावच्या जनतेला आहे. याआधी झेडआर अन्सारी आणि माजी खासदार देवी बक्स सिंग यांनी उन्नावमधून हॅटट्रीक केली आहे.

एटा जिल्ह्यातील मूळ रहिवासी असलेल्या साक्षी महाराज यांना २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत उन्नावमधून उमेदवार बनवण्यात आले होते आणि राज्याच्या पश्चिम पट्ट्यातील मथुरा आणि फर्रुखाबाद लोकसभा मतदारसंघाचे त्यांनी प्रतिनिधित्व केले होते.